सभापतीस्थानी - माननीय सभापती.

अधिवेशनाचा शुभारंभ " **वंदे मातरम्** " या गीताच्या गायनाने झाला.

पृ.शी./मु.शी. : सदस्यांचा परिचय व शपथविधी.

श्री. हर्षवर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, उस्मानाबाद, बीड व लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित श्री. दिलीपराव दगडूजी देशमख यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करून देताना मला अतिशय आनंद होत आहे.

श्री. दिलीप दगडूजी देशमुख यांनी शपथ घेतली.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, परभणी, हिंगोली स्थानिक प्राधिकारी संस्था मतदार संघातर्फे निर्वाचित श्री. सुरेशदादा सखाबा देशमुख यांचा आपणास व आपल्या मार्फत सभागृहास परिचय करून देताना मला अतिशय आनंद होत आहे. तसेच त्यांचा आज वाढदिवस आहे त्यामुळे मी या निमित्ताने त्यांचे अभिनंदन करतो.

श्री. सुरेशदादा सखाबा देशमुख यांनी शपथ घेतली.

****

(यानंतर श्री. सरफरे .... बी 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्दयासंबंधी

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एका महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे...

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मला देखील औचित्याचा मुद्दा उपस्थित करावयाचा आहे...

सभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर यांना प्रश्नोत्तरांचा तास संपल्यानंतर औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी मी परवानगी देईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा वेगळा आहे...

सभापती : माननीय सदस्यांना औचित्याचा मुद्दा उपस्थित करण्यासाठी मी परवानगी देतो. पहिल्यांदा प्रश्नोत्तरांचा तास होऊ द्या. त्यानंतर आपण आपला औचित्याचा मुद्दा उपस्थित करावा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

निवृत्तीवेतनाच्या बाबतीत विधानमंडळ सदस्यातील

भेदभाव संपुष्टात आणणे

(१) * १७३२९ श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , डॉ. एन. पी. हिराणी : सन्माननीय **संसदीय कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निवृत्ती वेतन अदा करण्याच्या प्रयोजनासाठी मुळ कार्यकाल भोजतांना निवृत्त विधानसभा सदस्य व निवृत्त विधानपरिषद सदस्य यांच्यातील भेदभाव संपुष्टात आणण्याच्या विचाराधिन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) निवृत्त राज्यसभा सदस्य व निवृत्त लोकसभा सदस्य यांच्यामध्ये असा भेदभाव केला जात नाही हे खरे आहे काय,

(३) १९९९ पूर्वी निवृत्त विधानसभा सदस्य व निवृत्त विधानपरिषद सदस्य यांच्यामध्येसुध्दा असा भेदभाव केला जात नव्हता हेही खरे आहे काय,

(४) खरे असल्यास सदरहू भेदभाव संपुष्टात आणण्यासाठी शासनाने काय कारवाई केलेली आहे,

(५) कारवाई केलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हर्षवर्धन पाटील : (१) नाही.

तथापि, प्रचलित अधिनियमात उचित सुधारणा करण्यासाठी आवश्यक तो प्रस्ताव मंत्रीमंडळाच्या विचारार्थ सादर करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे.

(२) होय.

(३) विधानमंडळ सदस्यांना सन १९९९ पूर्वी त्यांची ५ वर्षाची सेवा पूर्ण झाल्यानंतर निवृत्तीवेतन व त्यानंतरच्या त्यांच्या अधिक काळाच्या सेवेकरिता प्रत्येक वर्षासाठी नियत दराने जादा निवृत्तीवेतन अनुज्ञेय होते.

(४) वरील भाग-१ प्रमाणे कार्यवाही चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही. यू. डायगव्हाणे : सभापती महोदय, विधान परिषद सदस्य निवृत्त झाल्यानंतर त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या संदर्भात 6 एप्रिल रोजी अशासकीय विधेयकाव्दारे सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी माननीय सदस्य म्हणाले होते की, या सदनातील माननीय सदस्यांवर हा जो अन्याय झालेला आहे तो दूर करणे आवश्यक आहे. असे होता कामा नये परंतु ते चालले आहे, म्हणून हा अन्याय दूर करण्याकरीता शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे असे त्यावेळी आश्वासन दिले गेले. आणि आज मात्र याठिकाणी उत्तर देतांना म्हटले आहे की, "प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या विचारार्थ सादर करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे". म्हणजे याचा अर्थ असा की, अजून प्रस्ताव मान्य झालेला नाही. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, हे अधिवेशन संपण्यापूर्वी यासंबंधी सकारात्मक निर्णय घेणार काय?

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी या सदनामध्ये आश्वासन दिले होते त्याप्रमाणे निश्चित स्वरुपामध्ये त्यामध्ये बदल करावयाचा आहे. त्याबाबत संसदीय कार्य विभागाच्या वतीने प्रस्ताव मान्य केला आहे, आणि तो विधी व न्याय विभागाकडे पाठवावयाचा आहे. मंत्रिमंडळापुढे कोणतीही नोट ही विधी व न्याय विभागामार्फत सादर केली जाते. आज या संदर्भात मी विधी व न्याय विभागाच्या मंत्र्याबरोबर बोललो आहे. त्यांची मान्यता घेऊन तातडीने हा प्रस्ताव मंत्रिमंडळापुढे आणला जाईल. आणि तो मंजूर करुन त्या संदर्भात दुरुस्ती करुन योग्य तो बदल केला जाईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ही लहानशी सवलत आहे ती देणे न देणे हा प्रश्न वेगळा आहे. परंतु विधान परिषद सदस्य आणि विधान सभा सदस्य यांच्यामध्ये कोठल्याही प्रकारे डिस्क्रिमिनेशन असता कामा नये. अशाप्रकारचे विधेयक संमत झाले ते चूक झाले कां? आतापर्यंत सभागृहाची परंपरा राहिली आहे. या ठिकाणी माननीय उपमुख्यमंत्री उपस्थित आहेत. आम्हाला सवलत मिळाली तरी ती आम्हाला नको कारण तिचे आम्हाला महत्व वाटत नाही. परंतु आपण या सभागृहाचे सदस्य त्याचप्रमाणे पिठासीन अधिकारी आहात. विधानसभेचे माननीय अध्यक्ष आणि आपल्यामध्ये सारखेपणा आहे. याबाबतीत राज्यसभेचे माननीय सभापती आणि लोकसभेचे माननीय अध्यक्ष यांना डिफाईन केले आहे. त्यांना पूर्णपणे समान अधिकार आहेत. अशापरिस्थितीत आपणा दोघांमध्ये डिस्क्रिमिनेशन होणे योग्य वाटते कां? आपण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 17329...

श्री. नितीन गडकरी....

प्रत्येक वेळी मंत्रिमंडळाची मान्यता घेऊ असे सांगता, आमच्यावर मेहरबानी करता कां? विधी व न्याय विभागाबाबत आपण सांगत आहात, आम्हाला ते काही कळत नाही. आम्हाला खालचा दर्जा देऊन आपण आमचे डिमोशन करीत आहात. आपल्या अस्मितेसाठी मी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला आहे. म्हणून माझी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, आपण आणि आम्ही समान आहोत. माननीय श्री. शरद पवार साहेब या सदनाचे सदस्य राहिले आहेत, माननीय श्री. छगन भुजबळ राहिले आहेत. माननीय मुख्यमंत्री यांनी देखील या सभागृहामध्ये येण्याचा प्रयत्न केला परंतु ते येऊ शकले नाहीत. माननीय उपमुख्यमंत्री श्री. आर. आर. पाटील साहेब आपला मतदारसंघ पुनर्रचित झाल्यानंतर आपण सुध्दा या सभागृहामध्ये येऊ शकाल. म्हणून या सभागृहातील माननीय सदस्यांचे डिस्क्रिमिनेशन सहन करण्यासारखे नाही. याकरीता मला आपणाकडून संरक्षण पाहिजे. हे अधिवेशन संपण्यापूर्वी हे झालेले डिस्क्रिमिनेशन ताबडतोब दूर झाले पाहिजे व तसे निवेदन आपण केले पाहिजे.

श्री. हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, मी एवढेच सांगतो की, माननीय सदस्यांनी याठिकाणी डिस्क्रिमिनेशनचा मुद्दा उपस्थित केला. वास्तविक पाहता पूर्वी अशी पध्दत होती की, पाच वर्षाची टर्म संपल्यानंतर आपण सदस्यांना पेन्शन लागू करीत होतो. परंतु त्यानंतर आपण विधेयक अमेंड केले. आणि आता या सभागृहाच्या माननीय सदस्यांनी सदस्य म्हणून शपथ घेतल्यानंतर He is entitled for pension अशाप्रकारची अमेंडमेंट केली. आपणास माहीत आहे की, विधानसभेचा कालावधी 5 वर्षाचा आणि विधानपरिषदेचा कालावधी सहा वर्षाचा आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17329 (पुढे सुरु....

श्री.हर्षवर्धन पाटील (पुढे सुरु....

लोकसभा आणि राज्य सभेचा कालावधी अनुक्रमे पाच आणि सहा वर्षाचाच आहे, म्हणून डिस्क्रीमिनेशन केलेले आहे. विधान परिषदेच्या सदस्यांकरिता एक वर्षाचा कालावधी कमी केलेला होता. आता ही दुरुस्ती मान्य केलेली आहे. अधिवेशन संपण्यापूर्वी त्यास मंत्रिमंडळाची मान्यता घेऊन या सदनामध्ये याबाबतचे विधेयक आणले जाईल.

प्रा.बी.टी.देशमुख : या संबंधाने माननीय मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यानंतर थांबायला पाहिजे. परंतु एक चुकीची गोष्ट रेकॉर्डवर आली म्हणून मी सांगू इच्छितो. राज्यसभा आणि लोकसभा सदस्यांच्या बाबतीत सुरुवातीपासून आजपर्यन्त कधीही भेदभाव केला गेलेला नव्हता. महाराष्ट्रामध्ये सुध्दा विधानसभा आणि विधान परिषद सदस्यांच्याबाबतीत सन 1999 पूर्वी असा भेदभाव नव्हता. त्यानंतर भेदभाव झालेला आहे. म्हणून हा प्रश्न उपस्थित झाला. भेदभाव नाही असे सांगितले जात असेल तर माझ्याकडे यासंबंधातील कायद्याची प्रत आहे. सन्माननीय मंत्री महोदयांनी आता जे उत्तर दिलेले आहे, ते समाधानकारक आहे. परंतु दुसरी चूक रेकॉर्डवर राहू नये म्हणून मी नमूद केले. अशाप्रकारचा भेदभाव 1999 पूर्वीही नव्हता, परंतु 1999 नंतर भेदभाव झाला. तो दूर करण्याचा भाग आहे.

श्री.हर्षवर्धन पाटील : तो दूर करण्याचे मान्यच केलेले आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : हा विषय तसा खूप गंभीर नाही. परंतु मत्री महोदय म्हणतात ते बरोबर नाही. यामध्ये वित्तीय बोजा येणार आहे, त्यामुळे मंत्रीमंडळाची मान्यता पाहिजे,असे असेल तर ठीक आहे. परंतु या ठिकाणी चुकीची दुरुस्ती करण्यासाठी मंत्रिमंडळाची मंजुरी घ्यावयाची आहे. त्यामुळे याला एवढे मोठे स्वरुप देण्याची आवश्यकता नाही. लोकसभा आणि राज्य राज्यसभेच्या सदस्यांच्याबाबतीत 'पे कमिटी' आहे त्यांच्याकडे या सगळ्या गोष्टी जातात. तसे आपल्याकडे नाही. आपल्याकडे मंत्रिमंडळाकडे जावे लागते. जी चूक झालेली आहे ती दुरुस्त करण्यासठी मंत्रिमंडळाकडे जावयाचे आहे. हे अधिवेशन तीन आठवडे चालेल, असे गृहित धरतो. तेव्हा यासंबंधात तीन आठवड्यात निर्णय केला तर प्रश्न मिटेल. या कालावधीमध्ये निर्णय केला जाणार आहे काय ?

(उत्तर आले नाही.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विजेच्या टंचाईवर मात करण्यासाठी कोयना विद्युत प्रकल्पातून जास्तीत जास्त विज निर्मिती करण्याबाबत

(2) * 18585 श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जगन्नाथ शेवाळे , श्रीमती मंदा म्हात्रे : तारांकित प्रश्न क्रमांक 14653 ला दिनांक 17 मार्च, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील विजेच्या तीव्र टंचाईवर मात करण्यासाठी कोयना विद्युत प्रकल्पातून जास्तीत जास्त विज निर्मिती व्हावी यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय,

(2) असल्यास, कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रश्न (1) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रश्नी करण्यात येत असलेला पाठपुरावा त्याच्या फलनिष्पत्तीची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (1) अंशत: पूर्ण झाली आहे.

(2) आतापर्यंत 1960 मे.वॅट चे चार टप्पे पूर्ण करण्यात आले आहेत. टप्पा-5 मध्ये हुंबरली उदंचन (पंप स्टोअरेज) व आणखी एक लेक टॅप घेऊन डाव्या तिरावर सिंचनासाठी अतिरिक्त सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा वापर करुन विद्युतगृह निर्मितीचे नियोजन आहे.

(3) अ) कोयना प्रकल्प टप्पा 1 ते 4 पूर्ण झाले आहे.

ब) कोयना धरण पायथा विद्युतगृह (डावा तीर) चे काम हाती घेण्यात आले आहे.

क) कोयना प्रकल्प टप्पा-5 (हुंबरळी प्रकल्प) प्रस्तावित आहे परंतु, हुंबरळी प्रकल्पाचे काही क्षेत्र कोयना अभयारण्यात येत असल्यामुळे पर्यावरण विभागाच्या मान्यतेअभावी प्रकल्पाचे काम सुरु करण्यास विलंब होत आहे. या संदर्भात केंद्रशासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

श्री.जितेंद आव्हाड : सभापती महोदय, पहिल्यांदाच महाराष्ट्रामध्ये विजेची टंचाई निर्माण झालेली आहे. कोयना विद्युत प्रकल्पाने यामध्ये महत्वाची भूमिका बजावलेली आहे. उपप्रश्न तीन (ब) मध्ये म्हटलेले आहे की, "कोयना धरण पायथा विद्युतगृह (डावा तीर) चे काम हाती घेण्यात आले आहे." ते काम कधी पूर्ण होणार आहे ? कोयना प्रकल्प टप्पा-5 (हुंबरळी प्रकल्प)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड पुढे सुरु... ता.प्र.क्र.18585 (पुढे सुरु.....

प्रस्तावित आहे परंतु, हुबरळी प्रकल्पाचे काही क्षेत्र कोयना अभयारण्यात येत असल्यामुळे पर्यावरण विभागाच्या मान्यतेअभावी विलंब होत आहे, असे म्हटलेले आहे. त्यास केव्हापर्यन्त मान्यता मिळून प्रकल्प कार्यान्वित होणार आहे आणि त्यातून किती विद्युत निर्मिती होणार आहे ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, कोयना धरण पायथा विद्युतगृहाचे काम मे 2007 पर्यन्त पूर्ण होणार आहे. त्यानंतर कोयना प्रकल्प टप्पा-5 (हुंबरळी प्रकल्प) प्रस्तावित आहे परंतु हुंबरळी प्रकल्पाचे काही क्षेत्र कोयना अभयारण्यात येत असल्यामुळे पर्यावरण विभागाची मान्यता घेतल्याशिवाय प्रकल्प करणे शक्य होणार नाही. अभयारण्यातून हा प्रकल्प वगळण्याच्यादृष्टीने जे काही सोपस्कर करावयाचे आहेत ते शासन येणाऱ्या काळात करणार आहे.

श्री.जितेंद्र आव्हाड : किती विद्युतनिर्मिती होणार आहे ? याचे उत्तर आले नाही.

डॉ.सुनील देशमुख : कोयना टप्पा 1,2,3, 4, आणि कोयना पायथा विद्युतगृह यामधून एकूण 1960 मेगा वॅट विद्युत निर्मिती होणार आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मूळ प्रश्न असा विचारण्यात आलेला होता की, राज्यातील विजेच्या तीव्र टंचाईवर मात करण्यासाठी कोयना विद्युत प्रकल्पातून जास्तीत जास्त वीज निर्मिती व्हावी यासाठी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झाली आहे काय ?

यानंतर श्री.बरवड....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीपत्र नाही

या ठिकाणी शासनाच्या वतीने असे उत्तर देण्यात आले आहे की, "अंशत: पूर्ण झाली आहे." शासन नक्की कोणत्या प्रकारची कार्यवाही करीत आहे ? अंशत: पूर्ण झाली म्हणजे नेमके कधीपर्यंत पूर्ण होणार आहे ? ते पूर्ण करण्यासाठी शासनाला किती कालावधी लागेल ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, मी सांगितले की, कोयना प्रकल्पा टप्पा 4 चे काम मे, 2007 पर्यंत पूर्ण होणार आहे आणि म्हणून अंशत: पूर्ण झाले असे म्हटले आहे. मी आधी सांगितले की, कोयना प्रकल्प टप्पा 1, 2, 3 आणि 4 आणि कोयना पायथा विद्युत निर्मिती केंद्र त्यातून 1960 मेगावॅट वीज निर्माण होणार आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर मागे घेतो. खरे म्हणजे टप्पा 1, 2, 3 आणि 4 मध्ये 1920 मेगावॅट वीज निर्मिती सुरु आहे. धरण पायथा विद्युत केंद्राच्या ठिकाणी 40 मेगावॅट एवढी क्षमता आहे. कोकणाकडे जे पाणी जाते त्यातून म्हणजे टप्पा 1, 2, 3 आणि 4 मधून 1920 मेगावॅट आणि जे पाणी शेतीसाठी म्हणून नदीला सोडतो त्यावर 40 मेगावॅट अशी 1960 मेगावॅट वीज निर्मिती करीत आहोत. पाचव्या टप्प्याच्या संदर्भात मी उत्तर दिले. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाचे 8.2.2006 रोजी काम सुरु करण्याकरिता ना हरकत प्रमाणपत्र मिळालेले आहे आणि आता ते काम सुरु करीत आहोत. कोयना पाचवा टप्पा म्हणजे हुंबरळी प्रकल्पामध्ये 400 मेगावॅट वीज निर्मिती होणार असली तरी ती वीज निर्मिती पीक अवरमध्ये करण्याचा आपला प्रयत्न आहे. आपण कोयनेतून उचलेले पाणी एका ठिकाणी नेऊन साठवतो त्यावर निर्माण होणाऱ्या विजेकरिता आपल्याला 425 मेगावॅट वीज निर्मितीसाठी जो खर्च येतो तेवढा खर्च येणार आहे. पीक अवरमध्ये 400 मेगावॅट वीज तयार करणार. आधी 425 मेगावॅट वीज उपलब्ध नसल्यामुळे ज्यावेळी राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर वीज तयार होईल आणि पीक अवरमध्ये आणखी वीज लागेल त्यावेळी याचा निर्णय होणार आहे. परंतु हा निर्णय घेत असताना त्या ठिकाणी कोयना अभयारण्याचे एक प्रकरण आहे. ते प्रकरण केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाकडे मान्यतेसाठी गेले आहे. त्याचा पाठपुरावा करुन त्यांचा क्लिअरंस घेऊन ठेवत आहोत. आपण घाटघरला पीक अवरमध्ये वीज निर्मिती करण्यासाठी वापर करतो त्याप्रमाणे कोयनेच्या प्रकल्प टप्पा 5 च्या बाबतीत आपला प्रयत्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MHM/ SBT

ता. प्र.क्र. 18585 .....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, हुंबरळी प्रकल्पातून 400 मेगावॅट वीज मिळणार आहे आणि ती वीज पीक अवरमध्ये घेण्याकरिता आपल्याला 425 मेगावॅटसाठी जेवढा खर्च लागतो तेवढा खर्च लागणार आहे. एका धरणातील पाणी दुसरीकडे घ्यावयाचे आणि त्यासाठी जास्त पैसा खर्च करुन वीज तयार करावयाची आहे. त्या ठिकाणी अभयारण्याचा प्रश्न सुध्दा आहे. त्याची कॅपिटल कॉस्ट काढली तर ही वीज साडेआठ ते नऊ रुपये प्रति युनिट पेक्षा जास्त महाग पडणार आहे. एवढा पैसा खर्च करणे तसेच अभयारण्याच्या बाबतीत परवानगी मिळविणे कठीण काम आहे. या प्रकल्पामध्ये पीक अवरसाठी एवढा पैसा खर्च करणे हे आर्थिकदृष्ट्या व्हायेबल आहे की, नाही ? ही बाब शासनाने तपासली आहे काय ? काही वेळा असे प्रकल्प मंजूर होतात. टेंभू प्रकल्पामध्ये साडेसात रुपये प्रति युनिट असा विजेचा दर आहे. ते करावयास पाहिजे परंतु शेवटी ते करीत असताना विजेचा सपोर्ट लागणार आहे. त्याची इकॉनॉमिक व्हायेबिलिटी पाहिल्यानंतर ती वीज किती रुपयांमध्ये पडणार आहे याचा अभ्यास शासनाने केला आहे काय ?

श्री. अजित पवार : शासनाने अभ्यास केलेला आहे. आजच्या घडीला ते अजिबात व्हायेबल नाही. ज्यावेळी राज्य शासन वीज निर्मितीबाबत परिपूर्ण होईल त्याचवेळी आपण हा प्रकल्प घेऊ शकतो. त्यामुळे आता हा प्रकल्प घेण्याचा आमच्यापुढे अजिबात विचार नाही. परंतु उद्या म्हणजे समजा 2009-10 मध्ये, जे काही खाजगी विद्युत निर्मिती प्रकल्प आहेत आणि जे प्रकल्प राज्य शासनाने हातामध्ये घेतलेले आहेत त्या सगळ्या प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर वीज निर्मिती सुरु झाली आणि ठराविक वर्षामध्ये ज्यावेळी मागणी जास्त राहणार नाही, ज्यावेळी आपल्याकडे वीज सरप्लस राहील त्यावेळी आपण याचा विचार करणार आहोत.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोयना धरण पायथा विद्युतगृह (डावा तीर) आणि हुंबरळी प्रकल्पाचे काम हाती घ्यावयाचे आहे. कोयना धरण पायथा विद्युतगृह (डावा तीर) याद्वारे आपण जे पाणी सांगली या भागाला देतो त्यामधून 80 मे.वॅ. वीज निर्मिती करु शकतो. सदर 80 मे.वॅ. वीज निर्मितीचा प्रकल्प व्हायबल आहे. 5व्या टप्प्याच्या संदर्भात आपण सध्या तरी विचार करीत नाही.

श्री. अरविंद सावंत : कोयना विद्युत प्रकल्पाचे 4 टप्पे पूर्ण होऊन आता आपण 5 वा टप्पा घेत आहोत. माझ्या माहिती प्रमाणे कोयना प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. या प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन किती काळपासून प्रलंबित आहे ?

डॉ. सुनील देशमुख : माननीय सदस्यांनी यासाठी वेगळा प्रश्न विचारावा.

श्री. अरविंद सावंत : प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न अतिशय महत्वाचा आहे.

सभापती : माननीय सदस्यांनी अन्य मार्गाने हा प्रश्न उपस्थित करावा.

प्रा. जोगेंद्र कवाडे : वन कायद्यामुळे वन जमिनीवरील तसेच झुडपी जंगल परिसरातील वीज निर्मितीचे, जलसिंचनाचे, धरणाचे अनेक प्रकल्प प्रलंबित राहिलेले आहेत.हुंबरळी प्रकल्पाचा काही भाग कोयना अभयारण्यामध्ये येत असल्यामुळे प्रकल्पाचे काम सुरु करण्यास विलंब होत आहे. मग या प्रकल्पाचा आराखडा तयार करताना या प्रकल्पाचा भाग अभयारण्यामध्ये येत असल्याचा विचार तेव्हा केला गेला नाही काय ? तसा विचार केला गेला असेल तर अभयारण्याचा भाग हुंबरळी प्रकल्पासाठी लवकरात लवकर कसा मुक्त होईल यादृष्टीने शासनाने काय कार्यवाही केलेली आहे ?

श्री. अजित पवार : ज्यावेळी कोयना धरण झाले त्यावेळी हुंबरळी प्रकल्प डोळयासमोर नव्हाता. पिक अवरमध्ये अधिक वीज निर्मिती कशी करता येईल याचा विचार जेव्हा सुरु झाला त्यावेळी हुंबरळी प्रकल्पाचा प्रस्ताव करण्यात आला. याठिकाणी 400 मे.वॅ. वीज निर्मितीसाठी सव्वाचारशे मे.वॅ.चे पाणी उचलावे लागणार आहे. हा प्रकल्प आपण करणार आहोत. अभयारण्याच्या जमिनीबाबतचे क्लिअरन्स घेऊन ठेवणार आहोत. पुढे वीज सरप्लस झाली आणि एमएसईबीने परवानगी दिली तर सव्वाचारशे मे.वॅ. वीज कमी दराने उपलब्ध होईल.

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर यांच्या अंतर्गत कार्यरत असलेल्या विणकरांना न्याय मिळण्याबाबत

(३) * १७३३९ श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री.सागर मेघे : सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ नागपूर यांच्या अंतर्गत गेल्या ३०-३२ वर्षापासून कार्यरत असलेल्या विणकर कामगारांना गेल्या ४-५ वर्षापासून नियमित वेतन दिल्या गेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त विणकर कामगारांनी स्वेच्छा निवृत्ती योजना लागू करुन १ लक्ष रुपये एक मुस्त रक्कम देण्याची तसेच कामगारांकडे असलेले दिवाळी व ईद अग्रीम राशी माफ करण्याबाबत इ.मागण्यांबाबतचे निवेदन मार्च, २००६ मध्ये शासनाकडे दिलेले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कर्मचाऱ्यांना स्वेच्छानिवृत्तीचा निधी उपलब्ध करुन देण्याचा विचाराधिन असलेल्या प्रस्तावावर शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) उक्त विणकरांकडे असलेली अग्रीम राशी माफ करण्याबाबतचा प्रस्ताव हातमाग महामंडळाने शासनाकडे सादर केला आहे काय,

(५) प्रश्न क्र.३ व ४ प्रकरणी शासनाने निर्णय घेतला आहे काय, असल्यास त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर श्री.सतिश चतुर्वेदी यांच्याकरिता : (१) होय.

(२) विणकरांना रु.१ लक्ष सानुग्रह अनुदान देण्याचे निवेदन शासनाकडे प्राप्त झाले आहे परंतु अग्रीम राशी माफ करण्याचा प्रस्ताव प्राप्त झालेला नाही.

(३) नाही.

(४) नाही.

(५) नाही.

(६) विणकरांनी रु.१ लक्ष एकरकमी सानुग्रह अनुदान देवून असंलग्न करण्याची विनंती केली आहे यात खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक तरतूद उपलब्ध करुन द्यावी लागेल जरी विणकरांनी १ लक्ष ची मागणी केली असली तरी प्रत्यक्ष किती सानुग्रह अनुदान द्यावे याबाबत देखील निर्णय घ्यावयाचा आहे यासाठी मा.मंत्री (वस्त्रोद्योग) हे सर्व संबंधितांची बैठक घेणार आहेत.

श्री. नितीन गडकरी : हातमाग विणकर अतिशय हलाखीच्या स्थितीत आहेत. महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ हे बंद पडण्याच्या मार्गावर आहे. विणकरांना काम मिळत नाही. त्यांच्यावर उपासमारीची वेळ आलेली आहे. एक तर शासनाने त्यांना काम द्यावे नाही तर स्वेच्छा निवृत्ती वेतन द्यावे. हे विणकर उपासमारीमुळे आत्महत्या करण्यास प्रवृत्त झालेले आहेत. तेव्हा त्यांना स्वेच्छा वेतन योजना लागू करण्याच्या बाबतीत शासन लवकरात लवकर किती दिवसात निर्णय घेणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : माननीय मंत्री महोदय विणकरांच्या प्रश्नाच्या बाबतीत एक बैठक घेऊन निर्णय घेणार आहेत. त्यावेळी महामंडळाच्या कर्मचा-यांच्या व्हीआरएसच्या बाबतीत देखील निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : मी गेली तीन वर्षे या प्रश्नाचा सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

...नंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जनता साडी-धोती योजना होती ती बंद झाली. सांगली भागात पॉवरलूम होते, तेथील हातमाग व्यवसाय मोडीत निघाले आहेत. माझी मंत्रीमहोदयांना विनंती आहे, विणकर लोक माझ्या घरी येतात, त्यांची शरीर प्रकृती अतिशय कृश झालेली पहावयास मिळते. त्यांना महिन्याला 500 ते 600 रुपये देखील उत्पन्न मिळत नाही. ते आपल्या मुलांची लग्ने करु शकत नाहीत. खायला मोताद झालेले आहेत. शासनाने महामंडळ चालवावे असे मी म्हणत नाही. मला असे कळले आहे की, वस्त्रोद्योग विभागाने अर्थ मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर केला आहे. सुप्रीम कोर्टाचे देखील जज्जमेंट आलेले आहे. युती सरकारच्या काळात आम्ही योजनेतून विणकरांसाठी पैसे दिले होते. महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी गोल्डन शेक हॅण्ड योजना राबविण्याचा प्रयत्न केला होता. आता वस्त्रोद्योग विभागाने पाठविलेला प्रस्ताव वित्त मंत्रालयाने मंजूर केला असेल तर वस्त्रोद्योग मंत्री व अर्थमंत्री यांची संयुक्त बैठक घेण्यात यावी. यामध्ये शासनाचा खर्च कमी होणार आहे. मागील लक्षवेधी सूचनेसंबंधी हेच उत्तर दिले गेले होते. हा प्रश्न पुढे जाण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करणार आहात? दोन वर्षापासून हेच उत्तर दिले जात आहे?

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, साधारणपणे 8 हजार विणकर महामंडळाशी संलग्न होते. 4 हजार लोकांना 15 हजार रुपयांप्रमाणे मदत देऊन महामंडळापासून असंलग्न केले आहे. मध्यंतरी बैठक बोलावण्यात आली होती परंतु ती पुढे ढकलण्यात आली. दोन महिन्याच्या काळात वस्त्रोद्योग मंत्री स्तरावर बैठक घेण्यात येईल, त्या बैठकीस सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांना देखील बोलावण्यात येईल आणि न्याय देण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, हा प्रश्न दर अधिवेशनामध्ये उपस्थित होतो. विणकर आत्महत्या करण्याच्या परिस्थितीत आहेत. माझी विनंती आहे, शासनाने दिलेले उत्तर चुकीचे आहे असे मी म्हणत नाही, त्या उत्तराला माझा आक्षेप नाही. मंत्रीमहोदयांशी चर्चा करुन विणकरांची उपासमार होत आहे त्यांना स्वेच्छानिवृत्ती योजना लागू करण्याच्या दृष्टीने अधिवेशन संपण्यापूर्वी निर्णय घेण्यात यावा, तोपर्यंत हा प्रश्न राखून ठेवावा. चर्चा करुन न्याय देता येईल. यापूर्वी 3 अधिवेशनात या विषयावरील प्रश्नाला हेच उत्तर दिले गेले आहे. वस्त्रोद्योग मंत्री स्वत: वित्तमंत्र्यांशी चर्चा करतील आणि गरीब विणकरांना न्याय देऊ शकतील. त्यामुळे वित्तमंत्र्यांशी चर्चा करुन उत्तर दिले तर न्याय मिळू शकतो. एवढे मंत्रीमहोदय करतील काय?

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, यापूर्वी सांगितल्याप्रमाणे वस्त्रोद्योग मंत्री यांच्याकडून वित्तमंत्र्यांना निमंत्रण देऊन संयुक्त बैठक घेतली जाईल. दोन गोष्टी यामध्ये एकत्रित आहेत. महामंडळाच्या कर्मचा-यांसाठी व्हीआरएस योजना आणि विणकरांना संलग्न ठेवावयाचे की नाही याबाबतचा प्रश्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, स्पेसिफिक उत्तर दिले पाहिजे. किती दिवसात निर्णय केला जाईल?

श्री.नितीन गडकरी : 10 हजार विणकरांना न्याय मिळाला पाहिजे.

सभापती : आपण ज्या पध्दतीने प्रश्नाचे गांभीर्य सांगितले आहे, मी स्वत: याबाबत लक्ष घालून माझ्या दालनामध्ये बैठक बोलावतो. वित्तमंत्री येतील आणि वस्त्रोद्योग विभागाचे कॅबिनेट मंत्री सुध्दा असतील, विरोधी पक्षनेते आणि आपण अशी संयुक्त बैठक अधिवेशन काळात घेण्यात येईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डोमीहिरा (ता.जव्हार, जि.ठाणे) धरणाच्या कामामध्ये झालेला भ्रष्टाचार

(४) * १८५३१ श्री. रामनाथ मोते , श्री. विनोद तावडे , श्री. नितीन गडकरी , श्री. जितेंद्र आव्हाड , प्रा. जोगेंद्र कवाडे , श्रीमती मंदा म्हात्रे , श्री. राजेंद्र जैन , श्री. वसंतराव चव्हाण , श्री. सदाशिवराव पोळ , प्रा. फौजीया खान , श्री. लक्ष्मण जगताप , श्री. जगन्नाथ शेवाळे : तारांकित प्रश्न क्रमांक १३७४८ ला दिनांक १७ मार्च, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोमीहिरा (ता.जव्हार, जि.ठाणे) धरणाच्या कामामध्ये झालेल्या कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याप्रकरणी प्राप्त झालेल्या चौकशी अहवालाची छाननी पूर्ण करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधिता विरुध्द पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप छाननी पूर्ण झाली नसल्यास सद्यस्थिती काय आहेत ?

डॉ.सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (१) मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडून प्राप्त अहवालाची छाननी चालू असून त्यांच्याकडून अधिक माहिती मागविली आहे व अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, ठाणे यांचे कडूनही या प्रकरणी अन्वेषण करण्यात येत असून, अन्वेषण अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, मुंबई यांचेकडून अधिक माहिती मागविली असून अद्याप अप्राप्त आहे. तसेच दक्षता पथक ठाणे कडून अन्वेषणाचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, आदिवासी भागातील जव्हार तालुक्यातील डोमीहिरा प्रकल्पासंबंधीचा प्रश्न आहे. यापूर्वी दोन वेळा हा प्रश्न सभागृहात उपस्थित झाला होता. १३ डिसेंबर, २००५ आणि १७ मार्च, २००६ रोजी आणि आता पुन्हा प्रश्न सभागृहात आलेला आहे. मागील उत्तरापर्यंत या संदर्भातील अहवाल आला त्याची छाननी झाली नाही असे उत्तर दिले होते. आता शासनाने हे मान्य केले आहे की, जो अहवाल आला त्याची छाननी झाली आहे. या धरणाच्या कामामध्ये कोट्यावधी रुपयांचा जो गैरव्यवहार झाला आहे तो शासनाने मान्य केला आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 18531....

श्री. रामनाथ मोते...

सभापती महोदय, यासंदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न असा आहे की, या प्रकरणामध्ये आर्थिक गैरव्यवहार करणा-या अधिका-यांची नावे काय आहेत? तसेच ज्या अधिका-यांनी या अहवालाची छाननी केली होती त्या अधिका-यांनी या गैरव्यवहाराच्या संदर्भात कोणकोणते मुद्दे , कोणकोणते आक्षेप उपस्थित केले होते तसेच या गैरव्यवहाराचे स्वरुप काय होते ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, तत्कालीन कार्यकारी अभियंता श्री. आर.एस.कुलकर्णी, श्री. निकंबे,कार्यकारी अभियंता तसेच श्री. कांबळे- उपअभियंता व श्री. पांचाळ हे शाखा अभियंता अशी या प्रकरणातील अधिका-यांची नावे असून या प्रकरणामध्ये आर्थिक गैरव्यवहार झालेला नसून यामध्ये प्रशासकीय अनियमितता दिसून आलेली आहे.

श्री. विनोद तावडे : या प्रकरणामध्ये प्रशासकीय अनियमितता कोणती झालेली आहे? तसेच संबंधित अधिका-यांनी कोणती प्रशासकीय अनियमितता केलेली आहे? या प्रकरणामध्ये प्रशासकीय अनियमिता झालेली आहे असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितलेले आहे त्यामुळे या अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई केली आहे असे म्हटलेले आहे त्यामुळे संबंधितांवर केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईचे स्वरुप नक्की कोणते होते?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकरणामध्ये प्रशासकीय अनियमितता झालेली आहे असे अहवालात म्हटलेले आहे. एखादे काम झाल्यानंतर त्या कामाचे मोजमाप ज्युनिअर इंजिनिअर करीत असतो व ते रेकॉर्ड डेप्युटी इंजिनिअर व्हेरिफाय करीत असतो व त्यानंतर एक्झेक्यूटीव्ह इंजिनिअर 5 टक्के कामाची तपासणी करतो आणि काम जर बरोबर असेल तर ते व्हेरिफाय करुन ठेकेदाराला चेक देत असतो. परंतु या ठिकाणी ज्युनिअर इंजिनिअरने कामाचे मोजमाप घेतले परंतु डेप्युटी इंजिनिअरने त्या कामाचे व्हेरिफिकेशन केले नाही. तसेच एक्झेक्यूटीव्ह इंजिनिअरने 5 टक्के कामाची तपासणी केली नव्हती अशा प्रकारे या प्रकरणामध्ये प्रशासकीय अनियमितता झालेली आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या कामाची छाननी झालेली असून हे काम चालू आहे. त्यामुळे या कामाच्या संदर्भात किती दिवसात अंतिम रिपोर्ट प्राप्त होणार आहे? हे अधिकारी त्याच जागेवर काम करीत असतील तर पूर्वी जो अनागोंदी कारभार चालू होता तो तसाच चालू राहील त्यामुळे कामाची छाननी किती दिवसात पूर्ण होणार आहे? तसेच या प्रकरणातील संबंधित अधिकारी आता कोठे काम करीत आहेत? हे अधिकारी जर त्याच ठिकाणी काम करीत असतील तर या अहवालाची छाननी व्यवस्थित कशी काय होईल?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात छाननी होऊन त्यासंदर्भातील संपूर्ण अहवाल शासनाला सादर झालेला आहे. या प्रकरणामध्ये श्री. आर.एस.कुलकर्णी यांचे निलंबन करण्यात आलेले आहे तसेच श्री. निकंबे आणि कांबळे व पांचाळ यांची बदली करण्यात आलेली आहे.

डॉ. नीलम गो-हे : सभापती महोदय, या ठिकाणी गोलमाल उत्तरे दिली जात आहे. सोलापूरचे प्रकरण आपल्या सर्वांना ठावूक आहे. या अधिका-यांची बदली त्याच जिल्हयात झाली असेल तर त्याचा काही सुध्दा उपयोग होणार नाही. त्या अधिका-यांची बदली दुस-या ठिकाणी झाली पाहिजे. विरोधी पक्षाच्या सदस्यांना समाधान होईल अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी दिले पाहिजे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी संबंधित अधिका-यांची बदली झालेली आहे का असा प्रश्न विचारल्यामुळे अधिका-यांची बदली झालेली आहे असे उत्तर दिलेले आहे परंतु संबंधित अधिका-यांची बदली कोठे झालेली आहे याची माहिती आता माझ्याजवळ नाही. परंतु संबंधित अधिकारी सध्या या ठिकाणी नाहीत.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, या ठिकाणी सांगण्यात आलेले आहे की, संबधित अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18531.....

श्री.रामनाथ मोते .....

याचा अर्थ ही गंभीर बाब आहे. तसेच अन्य कोणत्या प्रकारचे आक्षेप घेण्यात आलेले आहेत ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्रिमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे या प्रकरणात सर्वश्री आर.एस.कुलकर्णी, निकंबे, कांबळे आणि पांचाळ हे चार अधिकारी होते. श्री.आर. एस.कुलकर्णी यांनी ठाणे जिल्ह्यात असताना एका कामामध्ये भ्रष्टाचार केला होता. तो विषय विधानसभेमध्ये चर्चेला आला होता, त्यावेळी त्यांना दोषी धरण्यात येऊन सस्पेंड केलेले आहे. त्यावेळी सर्वश्री निकंबे, कांबळे आणि पांचाळ यांना सस्पेंड केलेले नाही. या संदर्भातील तक्रार माननीय राज्यपाल महोदयांकडे केली गेली होती. तेव्हा दक्षता पथक परीमंडळ यांचेमार्फत चौकशी करुन त्याबाबतचे निष्कर्ष विभागाकडे आलेले आहेत. त्या निष्कर्षानुसार सर्वश्री निकंबे, कांबळे आणि पांचाळ हे अधिकारी दोषी असल्याचे आढळून आले. तेव्हा या तीनही अधिकाऱ्यांना सस्पेंड करण्यात येईल. याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी मुद्दा उपस्थित केला होता की, कोणते निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत ? " अधिकाऱ्यांनी नियमांचे पालन केलेले नाही, नियमांचे उल्लंघन केलेले आहे, यामध्ये रकमेचा भ्रष्टाचार झालेला नाही"असा निष्कर्ष देण्यात आलेला आहे. एकंदरीत संपूर्ण बाब लक्षात घेता हे प्रकरण अधीक्षक अभियंता यांचे पातळीवर तपासण्यास सांगितले होते, परंतु यामध्ये काही आर्थिक भ्रष्टाचार झालेला आहे किंवा कसे याची शहानिशा करण्यासाठी आता हे प्रकरण मुख्य अभियंता यांच्या पातळीवर तपासण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अलिबाग तालुक्यातील गणेशपट्टी या पुनर्वसन गावासाठी नागरी सुविधा पुरविण्याबाबत

(5) * 17345 श्री. जयंत पाटील , प्रा. शरद पाटील : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील पूररेषेखालील गणेशपट्टी या गावाचे तिनविरा धरणाजवळ पुनर्वसित करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(2) शासनाने दिलेल्या जागेमध्ये गणेशपट्टी येथील बाधीत शेतकऱ्यांनी घरे बांधून तेथे सुमारे 5 ते 6 वर्षापासून राहत असूनही त्यांना रस्ते, पाणी, स्वच्छतागृह या सारख्या अत्यावश्यक नागरीक सुविधा पुरविण्यात आल्या नाहीत हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, विलंबाची कारणे काय आहेत व उक्त सुविधा त्वरीत पुरविण्याबाबत काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता : (1) होय.

(2) अंशत: खरे आहे.

(3) मौजे गणेशपट्टी,ता.अलिबाग, जि.रायगड येथील पुरग्रस्तांना केलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी केलेल्या कार्यवाहीस दिनांक 20/6/2006 अन्वये कार्योत्तर मंजूरी देण्यात आलेली आहे आवश्यक नागरी सुविधा पुरविण्याबाबत सुधारीत अंदाजपत्रके मागविण्यात आली आहेत.

श्री.जयंत प्र पाटील : सभापती महोदय, 1989 सालच्या महापूरामध्ये या गावांचे पुनर्वसन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. परंतु अजूनपर्यंत त्या लोकांना जागा देण्यात आलेली नाही. जी जागा देण्यात आली ती गावापासून दहा कि.मी.च्या अंतरावर आहे. तेथील लोकांना नागरी सुविधा पुरविण्यात आलेल्या नाहीत. तेव्हा नागरी सुविधा देण्याबाबतचे एस्टीमेट शासन किती कालावधीत पूर्ण करणार आहे ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, मौजे गणेशपट्टी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील पूरग्रस्तांना केलेल्या भूखंडाच्या वाटपाबाबत जिल्हाधिकारी, रायगड यांनी केलेल्या कार्यवाहीस दिनांक 20.6.2006 रोजी कार्योत्तर मंजुरी दिलेली आहे. सन 2003 मध्ये या कामाचे 24.44 लाख इतके एस्टीमेट करण्यात आले होते. आता आवश्यकता वाटल्यास रिएस्टीमेट तयार करुन ताबडतोब कामाला सुरुवात करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17345....

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, तेथील शेतकऱ्यांना सहा वर्षापूर्वी घरे दिलेली आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी स्पेसिफीक प्रश्न विचारला होता की, नागरी सुविधा पुरविण्याबाबत विलंबाची कारणे काय आहेत ? परंतु माननीय मंत्रिमहोदय मुख्य प्रश्नाला बगल देऊन एस्टीमेटबद्दल सांगत आहेत. तेव्हा मंत्रिमहोदय नागरी सुविधा देण्यास विलंब का झाला याचे उत्तर देतील काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, तेथील लोकांना जागा देण्यात आली होती. 42 जणांपैकी 20 जणांनी स्वत: घरे बांधली आहेत. तेथील लोकांना नागरी सुविधा पुरविण्यास विलंब झाला ही गोष्ट खरी आहे. तेथील लोकांना नागरी सुविधा पुरविण्यास जवळपास 6-7 वर्षे उशीर झाला. परंतु आता एस्टीमेटला मंजुरी देऊन सहा महिन्यांत नागरी सुविधा देण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन 1989 पासून 2006 पर्यंत पूरग्रस्तांना दिलेल्या जागेवर शासनाने किती खर्च केला आहे ?

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, त्याठिकाणी खर्च केला नाही, ही वस्तुस्थिती आहे. म्हणूनच आपण रि-इस्टीमेट मागवून त्यास ताबडतोबीने मंजुरी देऊन नागरी सुविधा पुरविण्याचे काम त्याठिकाणी चालू करणार आहोत.

श्री.विलास अवचट : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये माननीय मंत्रिमहोदय मान्य करीत आहेत की, विलंब झालेला आहे. मग, विलंबाची कारणे काय ? याला कोण जबाबदार आहे ? जबाबदार अधिकाऱ्यांवर आपण कोणती कारवाई करणार ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, याठिकाणी पुनर्वसन करीत असताना महाराष्ट्र जमीन महसूल संहिता नियम 1970 च्या नियम 30 अन्वये भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे. त्यासाठी शासकीय मान्यता लागत होती म्हणून जिल्हाधिकाऱ्यांनी प्रस्ताव पाठविला, त्यानंतर त्यासाठी 6 वर्षे विलंब लागला, ही वस्तुस्थिती खरी आहे.

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : कृपया सन्माननीय सदस्यांनी शांत रहावे. या प्रश्नाच्या बाबतीत माननीय मंत्रिमहोदयांना माझी एवढीच सूचना आहे की, धरणग्रस्तांच्या पुनर्वसनास आपण सर्वोच्च प्राधान्य देत असतो, त्या दृष्टीने त्याठिकाणच्या पुनर्वसित लोकांचा प्राधान्याने प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी स्वत: लक्ष घालण्याची आवश्यकता असून त्यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी या प्रश्नाच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांचे समाधान करावे. कारण हा प्रश्न 16 वर्षे प्रलंबित आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, खाडीमध्ये 1997 मध्ये उधाण आले होते. त्याठिकाणी कायमची भिंत बांधण्यासाठी व इतर सगळया प्रक्रियेसाठी उशीर झाला. त्यामुळे त्याठिकणचे अंशत: पुनर्वसन राहिले आहे. राहिलेले पुनर्वसन 6 महिन्यांत केले जाईल.

(सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील हे जागेवर उभे राहून मोठयाने बोलण्याचा प्रयत्न करतात.)

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांना उप प्रश्न विचारण्यास मी परवानगी देतो.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, त्याठिकाणी समुद्र नाही. (..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.17345....

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला एवढेच म्हणावयाचे आहे की, दोन-तीन दिवसांपूर्वीच माननीय पंतप्रधानांनी विदर्भासाठी जे पॅकेज जाहीर केले, त्यामुळे हे मंत्री गोंधळून गेलेले आहेत. दुसरी गोष्ट अशी की, जेथे माननीय डॉ.पतंगराव कदम या मंत्रिमहोदयांचीच फाईल गेल्या अनेक वर्षांपासून अडकलेली आहे, ती क्लिअर होत नाही. मग, सर्वसामान्यांचे प्रश्न कसे क्लिअर होणार ?

सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपला उप प्रश्न विचारावा.

श्री.जयंत प्र. पाटील : अध्यक्ष महाराज, त्याठिकाणी समुद्र, खाडी वा नदीही नाही. त्यामुळे त्याठिकाणी भिंत वगैरे कुठे बांधण्याचा प्रश्नच येत नाही. चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी बोलत आहे. माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तरामध्ये दुरुस्ती करावी, अशी माझी विनंती आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, समुद्रामध्ये उधाण आले होते. त्यामुळे घरांचे व शेतीचे नुकसान झाले. त्याठिकाणी पुनर्वसन करण्यास वेळ लागला असला तरी आता शासनाने स्वतंत्र प्राधिकरण तयार केले असून त्यामार्फत यासाठी पैशांची व्यवस्था करण्यात येईल. आता प्राधिकरण तयार झाल्यामुळे पुनर्वसनाचे प्रश्न ताबडतोबीने निकालात निघणार आहेत. त्यामुळे त्या माध्यमातून आम्ही हाही प्रश्न ताबडतोब निकालात काढू.

नंतर श्री.रोझेकर.....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

ठाणे जिल्हयात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्याबाबत

(६) * १८३२५ श्री. गोविंदराव आदिक , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात ८० गावांना व ५६१ गाव-पाडयांना पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाल्याने ग्रामस्थ पाण्याशिवाय हैराण झाले असल्याचे सध्या बैलगाडया व टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात असल्याचे माहे मे, २००६ रोजी वा त्यादरम्यान आढळून आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे जिल्ह्याला सुरळीत पिण्याचा पाणी पुरवठा त्वरित सुरु करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.अजित पवार : (१) अंशत : खरे आहे. माहे २००६ अखेर ठाणे जिल्हयात एकूण १०६ गावे व २०७ पाड्यांना टँकरद्वारे व बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

(२) व (३) ठाणे जिल्हयातील संभाव्य टंचाईग्रस्त २६७ गावे व ४८१ वाड्यांच्या पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ टंचाई कृती आराखडे तयार करण्यात आले असून त्यानुसार प्रत्यक्षात पाणी टंचाई निर्माण झालेल्या गावे/वाड्यांसाठी ९५ विंधण विहिरीची कामे पूर्ण करण्यात आली आहेत. तसेच, नळ पाणी पुरवठा योजनेच्या विशेष दुरुस्तीच्या ८८ प्रस्तावास मंजूरी देण्यात आली असून सदरहू कामे प्रगतीपथावर आहेत. याशिवाय पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झालेल्या भागात आवश्यकतेनुसार टँकर/बैलगाडीद्वारे पाणी पुरवठा करण्यात येत आहे.

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, हा प्रश्न आदिवासी जिल्हा म्हणून ओळखल्या जाणा-या ठाणे जिल्हयातील पिण्याच्या पाण्यासंबंधीचा आहे. या जिल्हयामध्ये 100 इंचापेक्षा जास्त पाऊस पडत नाही. यामुळे वर्षानुवर्षांपासून तेथील आदिवासी समाज पिण्याच्या पाण्यापासून वंचित आहे. दरवर्षी पिण्याच्या पाण्यासाठी टँकर किंवा बैलगाडीच्या माध्यमातून पाणीपुरवठा करावा लागतो, अशी तेथील अवस्था आहे. याच जिल्हयांमध्ये पाण्याचे मोठे साठे तयार करुन मुंबई व आसपासच्या 6 नगरपालिका क्षेत्रामध्ये अतिशय चांगल्या पध्दतीच्या पिण्याच्या पाण्याची सोय शासनाने उपलब्ध करुन दिलेली आहे. ज्या ठिकाणी पाणी उपलब्ध आहे तेथील पाणी शहरांना देण्यात येते. शहरातील लोकांना पाणी देण्याबाबत कुणाचीही तक्रार असण्याचे कारण नाही. परंतु, ज्या परिसरातून शहरांना पाणी पुरविण्यात येते तेथील आदिवासी जनतेसाठी पिण्याच्या पाण्याच्या योजना केल्या तर हा प्रश्न कायमचा सुटू शकतो. तेंव्हा, अशा प्रकारच्या योजना शासन घेणार काय ?

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.18325 पुढे सुरु</u>.....

श्री.अजित पवार : सभापती महोदय, ठाणे जिल्हयामध्ये जी धरणे आहेत किंवा पाण्याचे साठे आहेत त्या धरणातील, साठयांतील 100 टक्के पाणी आपण वेगवेगळया शहरांना पाणी पुरवठा करण्यासाठी आरक्षित केले आहे. या आरक्षित केलेल्या पाण्यामधून शहरांना पाणी देऊन जर पाणी शिल्लक राहिले व तेथील जवळपासच्या गावांना पाणी उपलब्ध करुन देणे सोयीचे असेल तर सन्माननीय सदस्य, श्री.गोविंदराव आदिक यांनी जो मुद्दा मांडला तशा पध्दतीने निश्चितपणे विचार करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी, ठाणे जिल्हयासंदर्भात जो प्रश्न विचारला आहे त्यासंदर्भात असे सांगू इच्छितो की, आजच्याघडीला त्या ठिकाणी 1 टँकर सुरु आहे. मधल्या काळामध्ये जेंव्हा मोठया प्रमाणावर पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाला होता त्यावेळी 95 विंधण विहिरींचा कार्यक्रम घेण्यात आला होता व तो कार्यक्रम आता पूर्ण करण्यात आला आहे. पाणी पुरवठा योजनांच्या दुरुस्तीचे एकूण 88 प्रस्ताव मंजूर करण्यात आले होते. तसेच, पाणी टंचाई भासू नये म्हणून यापैकी 70 कामे पूर्ण करण्यात आले आहेत व जवळपास सव्वा दोन कोटी रुपये यावर खर्च करण्यात आला आहे. यापुढे टँकरचे प्रमाण वाढू नये म्हणून व तेथील लोकांना तेथेच हक्काचे पाणी उपलबध व्हावे, अशा प्रकारच्या पाणी पुरवठा योजना हाती घेण्यात येतील. यासाठी मात्र स्थानिक लोकांना 10 टक्के लोकवर्गणी भरावी लागेल व 90 टक्के खर्च शासनाकडून केला जाईल. आदिवासी भाग असेल तर 5 टक्के लोकवर्गणी भरावी लागेल व 95 टक्के खर्च शासनाकडून केला जाईल.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील टंचाईग्रस्त गावांमध्ये कुपोषणग्रस्त मोखाडा व जव्हार या तालुक्यातील 32 गावे व 35 पाडे यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय ? असल्यास, नवसंजीवन योजना व आदिवासी उपाययोजनेअंतर्गत पाणी पुरवठयाच्या योजना हाती घेऊन मोखाडा व जव्हार हे तालुके कायमस्वरुपी टंचाईमुक्त करण्याचा प्रयत्न का करण्यात आला नाही ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, पाठीमागच्या काळामध्ये कुठलीही पिण्याच्या पाण्याची योजना करीत असतांना 100 टक्के खर्च राज्य शासनाकडून केला जात होता. श्रमदान व लोकवर्गणीमधून यामधील काही हिस्सा मिळाला पाहिजे हे धोरण निश्चित

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.18325 पुढे सुरु.....</u>

श्री.अजित पवार.....

झाल्याने जर आदिवासी भागामध्ये पिण्याच्या पाण्याची योजना घ्यावयाची असेल आणि ते जर 5 टक्के लोकवर्गणी भरण्यास तयार असतील व संबंधित ग्रामपंचायत ठराव करुन रक्कम उपलब्ध करुन देणार असेल तर उर्वरित 95 टक्के राहिलेली रक्कम पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून घालून या योजना पूर्ण करण्याची शासनाची तयारी आहे. त्याकरिता त्या त्या गावांनी पुढे आले पाहिजे, हेही मला या ठिकाणी लक्षात आणून द्यावेसे वाटते.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18325.....

श्री.अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी असा प्रश्न विचारला होता की, मोखाडा आणि जव्हार मधील 33 गावे यामध्ये अंतर्भूत आहेत काय आणि असतील तर तेथे कायम स्वरुपी पाण्याची कोणती योजना शासन आखणार आहे, या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही. माझा प्रश्न असा आहे की, आदिवासींची जेवणाची देखील सोय नसते. आदिवासी लोकवर्गणीची 5 टक्के रक्कम भरु शकत नाहीत. जवाहर, मोखाडा आणि मेळघाट हे कुपोषण ग्रस्त भाग आहेत, हे शासनाला माहीत आहे. म्हणून शासन मोखाडा आणि जव्हारमध्ये 5 टक्के लोकवर्गणीची अट शिथील करुन शंभर टक्के निधी खर्च करुन पाण्याची योजना तयार करेल काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, तसे करता येणार नाही. आदिवासी भागामध्ये 5 टक्के रकमेऐवजी 1 टक्के रक्कम आदिवासींनी भरावी आणि 4 टक्के श्रमदान करावे. त्यानंतर 95 टक्के रक्कम राज्य शासन खर्च करेल. जवाहर तालुक्यामध्ये 19 गावे आणि 33 वाडया व मोखाडा तालुक्यामध्ये 28 गावे आणि 45 वाडयांमध्ये मागच्या काळामध्ये टँकरने पाणी पुरवठा करण्यात येत होता. काही ठिकाणी बैलगाडयांनी देखील पाणी पुरवठा करण्यात येत होता. पाण्याचे दुर्भीक्ष लक्षात घेता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने तेथे अधिक निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविलेले आहे. तेथील स्थानिक लोकांना 1 टक्के लोकवर्गणी भरावी लागेल. यासंदर्भात दोन्ही सभागृहांमध्ये चर्चा झालेली आहे. शासन शंभर टक्के रक्कम भरुन पाणी पुरवठा योजना करु शकत नाही.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माझी माननीय मंत्री महोदयांना अशी विनंती आहे की, ठाणे जिल्हयामध्ये काही भाग अतिदुर्गम आहे, तसाच नंदूरबार जिल्हयामध्ये देखील आहे. आता शासनाने असा नियम केला आहे की, गाव हगणदारी मुक्त असेल तरच त्या गावाला पिण्याच्या पाण्याची योजना मंजूर करता येईल. त्या गावाला पाण्याची टंचाई असून सुध्दा ते गाव हगणदारी मुक्त नसल्यामुळे आपण तेथे पिण्याच्या पाण्याची योजना करु शकत नाही. म्हणून शासन ही अट शिथील करील काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.18325.....

श्री.गोविंदराव आदिक : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी उत्तर देतांना असे सांगितले की, नळ योजना आणि पाणी पुरवठा योजना शंभर टक्के रक्कम भरुन शासनामार्फत राबविता येणार नाहीत. 1 टक्के लोकवर्गणी आदिवासी भरु शकत नाहीत. शंभर टक्के खर्चाने या योजना झाल्या पाहिजेत, हा भाग वेगळा आहे. माझा प्रश्न असा आहे की, ज्या नळ योजना इ ालेल्या आहेत त्या आता बंद पडलेल्या आहेत. काही योजनांवर 50 ते 60 टक्के खर्च झालेला असून देखील पिण्याचे पाणी मिळू शकत नाही. त्यांचे कारण असे आहे की, त्या योजनेमध्ये दोष आहे किंवा तेथील पाण्याचा सोर्स आटलेला आहे. पाणी उपलब्ध नसल्यामुळे कितीही खर्च केला तरी काही उपयोग होत नाही. जेथे पाण्याचे साठे आहेत तेथून शहराला पाणी पुरवठा केला जातो. हा सर्व भाग डोंगराळ असल्यामुळे तेथे पाण्याचा साठा करण्यासाठी जागा उपलब्ध आहे म्हणून शासन तेथे पिण्याच्या पाण्याच्या नवीन योजना हाती घेण्याचा विचार करील काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, 2-3 दिवसांपासून पाऊस सुरु झालेला असल्यामुळे आता ठाणे जिल्हयामध्ये पाण्याची टंचाई नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मे आणि पावसाळा सुरु होण्याच्या आधी म्हणजे जून महिन्याच्या सुरुवातीच्या काळामध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई तीव्रतेने जाणवते. तेथील नळ पाणी पुरवठा योजना नादुरुस्त होत्या म्हणून तेथील जनतेला पिण्याचे पाणी मिळाले नाही, यासंदर्भातील संपूर्ण माहिती जिल्हापरिषदेला सूचना देऊन मागविण्यात येईल आणि पावसाळा संपल्यानंतर त्या ठिकाणच्या पिण्याच्या पाण्याच्या योजना नादुरुस्त असतील तर .....

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

त्या व्यवस्थित कार्यान्वित कशा केल्या जातील आणि ज्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या असतील त्या त्यांना सांगून तेथील यंत्रणा दुरूस्त करून दिल्या जातील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, मोखाड्यामध्ये आज अशी परिस्थिती आहे की, तेथील ग्रामीण रूग्णालयाला पाणी दिले गेले तर गावात पाणी मिळत नाही. आता आपण 1 टक्का लोकवर्गणीसाठी आग्रह धरीत आहात पण तेथे गावांमध्ये पाणी मिळत नाही म्हणून संताप आहे ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा आपण ही 1 टक्का लोकवर्गणी जी प्रस्तावित केलेली आहे ती संपूर्णपणे आदिवासी कुपोषित भागासाठी माफ करणार काय ?

श्री. अजित पवार : नाही.

प्रा. जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, आपल्या नळयोजनांसाठी आमचा आदिवासी भाग जो आज कुपोषणग्रस्त देखील आहे, अन्नासाठी मोताद असा हा आदिवासी भाग आहे. त्यामुळे पाणी पुरवठा योजना करण्यासाठी 5 टक्के लोकवर्गणीची अट शिथिल करून आपण या आदिवासी भागातील गावांनी किमान 1 टक्का तरी लोकवर्गणी द्यावी असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. पण ही 1 टक्का वर्गणी देखील हे आदिवासी देऊ शकणार नाही. म्हणून माझी आपणास या निमित्ताने विनंती आहे की, आदिवासी विभागाचा जो निधी आहे त्यातील 1 टक्का निधी यासाठी आपल्याकडे वळविता येऊ शकणार नाही का ? तसे केल्यास त्यातून आपणास हे काम करता येऊ शकणार आहे. तरी त्यादृष्टीने आपण विचार कराल का ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य प्रा. कवाडे यांनी जी सूचना येथे मांडलेली आहे ती तपासून पाहण्यात येईल आणि आदिवासी विभागाशी या संबंधात चर्चा करून योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न निश्चितपणे केला जाईल.

****

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकणातील खाजण जमिनीची दुरुस्ती करण्याबाबत

(7) * 17346 **श्री. विनोद तावडे, श्री. मधुकर चव्हाण, श्री. नितीन गडकरी, श्री. अरविंद सावंत, श्री. दिवाकर रावते, श्री. विलास अवचट, डॉ. नीलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक 14394 ला दिनांक 12 एप्रिल, 2006 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय **खार जमीन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) कोकणातील खाजण जमिनीची दुरुस्ती करण्याबाबत कोकणातील 4 जिल्ह्यातील 25 योजनांचा रु.14.90 कोटी किंमतीचा माहे सप्टेंबर, 2005 मध्ये सचिव मदत कार्य व पुनर्वसन महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर केलेला नवा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, त्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा त्याचे स्वरुप काय आहे,
(3) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. दयानंद म्हस्के, श्री. बाळासाहेब थोरात यांच्याकरिता : (1) कोकणातील खाजण जमिनीची दुरुस्ती करण्याबाबत कोणताही प्रस्ताव या विभागाकडे प्राप्त झालेला नाही. तथापि राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्पांतर्गत कोकणातील 4 जिल्हयांसाठी समुद्राच्या/खाडीजवळच्या बांधाचे नुतनीकरणाचा रु.14.90 कोटीचा प्रस्ताव मुख्य अभियंता जलसंपदा विभाग कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून प्राप्त झालेला आहे. हा प्रस्ताव जागतिक बँकेच्या मदतीने अंमलात आणणाऱ्या प्रकल्पाचा एक भाग आहे.
(2) प्रस्तावाची छाननी पूर्ण झालेली असून केंद्र शासनाकडून प्राप्त झालेली मार्गदर्शक तत्वे अंतर्भूत करण्यात आली आहेत. हा प्रस्ताव लवकरच केंद्र शासनाकडे मान्यतेसाठी सादर केला जाईल.
(3) वरील प्रमाणे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आजचा हा 7 वा प्रश्न आहे. या 7 पैकी 4 प्रश्न हे गेल्या 3-4 अधिवेशनामध्ये आलेले होते आणि फुटबॉलप्रमाणे ते प्रत्येक अधिवेशनामध्ये पुढे ढकलले जायचे. आमचा अहवाल तयार आहे, अहवाल तयार झाला की, पाठविण्यात येईल, अहवालाची छाननी करीत आहोत वगैरे वगैरे सांगितले जाते. सभापती महोदय, गेल्या वेळी याच प्रश्नावर जे उत्तर दिले होते त्यात आपण म्हटले होते की, सचिव, मदत व पुनर्वसन कार्य यांचेकडे हा प्रस्ताव अंतिम टप्प्यावर असून लौकरच तो केंद्र सरकारकडे सादर करण्यात येईल. तेव्हा माझा या संबंधात नेमका प्रश्न असा आहे की, केंद्र सरकारकडे हा प्रस्ताव लौकरच पाठविण्यात येईल असे म्हणून आणखी किती दिवस आपण घालविणार आहात. यातून लोकांच्या शेतजमिनींचे नुकसान होण्याची, त्यांच्या जमिनीमध्ये खारे पाणी जाते त्यामुळे मोठ्ठे नुकसान होते ते आपल्या लक्षात येत नाही. तेव्हा आता तरी निश्चित अशा ठराविक मुदतीच्या आत आपण हा प्रस्ताव पाठवू असे सांगणार आहात का ? ..... एल 3 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दयानंद म्हस्के : सभापती महोदय, ठाणे, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या चार जिल्ह्यांमध्ये हे काम आहे. परंतु यामध्ये जो पैसा येणार आहे तो जागतिक बँकेकडून केंद्र सरकार कडे आणि केंद्र सरकारकडून महाराष्ट्र सरकारकडे येणार आहे आणि राष्ट्रीय चक्रीवादळ निवारण प्रकल्पांतर्गत हे काम होणार आहे. ...

श्री. विनोद तावडे : पण त्यासाठी आपण जो प्रस्ताव केंद्राला सादर करावा लागतो आहे तो अजून सादरच केलेला नाही. ...

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी या निमित्ताने माननीय मंत्री महोदयांना विचारू इच्छितो की, आपण हा प्रस्ताव केंद्र सरकारकडे सादर केला आहे काय ? असल्यास तो केव्हा सादर केला आहे ?

श्री. दयानंद म्हस्के : सभापती महोदय, या संबंधात केंद्र सरकारकडून ज्या सूचना आलेल्या आहेत त्यांचा विचार करून तो प्रस्ताव आपण पुन्हा सादर करणार आहोत.

सभापती : माननीय मंत्री महोदयांना मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्यांनी आताच आपल्याला सांगितले आहे की, यापूर्वीचे आपले उत्तरही असेच आहे. केंद्र सरकारकडे हा प्रस्ताव लवकरच पाठविणार आहोत असे आपण म्हटले आणि नंतर पुन्हा सांगितले की, परत आलेला प्रस्ताव आपण पाठविणार आहोत. तेव्हा यामध्ये निश्चित उत्तर आपले कोणते आहे ?

श्री. दयानंद म्हस्के : सभापती महोदय, 18.5.2006 ला त्या बाबतीत एक बैठक झालेली आहे आणि केंद्र सरकारकडून ज्या सूचना या संबंधात आलेल्या आहेत त्यांचा विचार करून पुन्हा केंद्र सरकारकडे प्रस्ताव आपण पाठविणार आहोत.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, शासनाकडून 14 कोटी 90 लाखाचा हा प्रस्ताव जायचा आहे. आता आपल्याकडून केंद्र सरकारकडे जर हा प्रस्ताव जात नाही तर मग केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याऐवजी राज्य सरकारच्या निधीतून हा प्रस्ताव आपण पूर्ण करणार काय ?

(यानंतर श्री. सरफरे ..... एम 1 ..

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, जागतिक बँकेकडून या करिता मदत मिळणार आहे. आणि राज्य शासन त्यामध्ये 25 टक्के वाटा घालणार आहे. त्या निधीमध्ये काम पूर्ण होईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी उत्तर दिले की, 75 टक्के निधी आमच्याकडे आल्यानंतर आम्ही प्रस्ताव करु. आपण प्रस्ताव पाठविल्याशिवाय ते आपल्याला निधी पाठविणार काय? जागतिक बँकेकडून केंद्र सरकारकडे जो निधी आला आहे तो बाकीच्या राज्यांनी घेतला आहे, परंतु आपले राज्य मात्र झोपले आहे. मंत्रिमहोदय अगोदर पैसे येऊ द्या, नंतर प्रस्ताव पाठवू अशाप्रकारची चुकीची माहिती देत आहेत. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, आपण हा प्रस्ताव केव्हा पाठविणार आहात याची तारीखनिहाय माहिती सांगा.

श्री. दयानंद मस्के : सभापती महोदय, प्रस्ताव लवकरात लवकर पाठविण्यात येईल.

सभापती : मी हा प्रश्न राखून ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विदर्भातील बंद असलेल्या साखर कारखान्यांचे शासनाचे तसेच वित्त संस्थांचे असलेले कर्ज वसूल करण्याबाबत

(८) * १८७७६ श्री. दिवाकर रावते , श्री. विलास अवचट , श्री. सुरेश जेथलिया , श्री. गोपीकिसन बाजोरिया , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. रणजितसिंह मोहिते-पाटील , प्रा. जोगेंद्र कवाडे : तारांकित प्रश्न क्रमांक १५०६६ ला दिनांक १७ मार्च, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील बंद असलेल्या साखर कारखान्याचे शासनाचे तसेच वित्त संस्थांचे असलेले कर्ज वसुल करणे इत्यादीबाबत साखर आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यावर निर्णय घेतला आहे काय, असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर,डॉ. पतंगराव कदम यांच्याकरीता : (१) होय.

(२) अहवाल अद्याप शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, मला आपल्या अनुमतीने प्रश्न क्रमांक १ च्या उत्तरामध्ये पुढीलप्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे. "विदर्भातील बंद असलेल्या साखर कारखान्याचे शासनाचे तसेच वित्तीय संस्थांचे असलेले कर्ज वसूल करणे इत्यादीबाबत साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली .... याच्याऐवजी विदर्भातील साखर कारखान्यांच्या कार्यक्षेत्रात ऊस लागवड कार्यक्रमाची आखणी करणे त्याचप्रमाणे पुनर्वसन कार्यक्रमाचा समावेश करणे याकरिता साखर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली असून तिचा अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अहवाल शासनाच्या विचाराधीन आहे असे मंत्रिमहोदयांनी सांगितले. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्तेमुळे परिस्थिती गंभीर बनली आहे. याकरीता तातडीची निकड म्हणून या अहवालावर लवकरात लवकर विचार होऊन शासन त्यासंबंधी निर्णय केव्हा घेणार आहे?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, याबाबतीत शासन स्तरावर कार्यवाही चालू असून लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, शासन गंभीर नाही आणि मंत्रिमहोदय देखील गंभीर नाहीत. यावर्षी सुध्दा माझ्या साखर कारखान्यामध्ये ६ हजार एकरामध्ये ऊस लावला. परंतु आमच्या एकाही शेतकऱ्याला बँकेने कर्ज दिले नाही. आपण नागपूरला पत्रकार परिषद घेऊन कार्यक्रमाची घोषणा केली, समिती घोषित केली. एक फुटक्या कवडीची मदत सुध्दा ऊस लावण्यासाठी केलेली नाही. माननीय श्री. पतंगराव कदम आपण काही तांत्रिक कारणांमुळे दिल्लीमध्ये होता त्यावेळी नागपूरला पत्रकार परिषद झाली. मंत्रिमंडळातील आपले सहकारी आपले मानसिक स्वास्थ्य खराब करीत असल्यामुळे आपल्याला हल्ली जास्त वेळ दिल्लीला राहावे लागते. आपण सांगितल्यानंतर देखील एक एकरामध्ये ऊस लागला नाही. तेव्हा आपण किती दिवसात मदत करणार आहात हे सांगाल कां?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन २००२ मध्ये विदर्भातील १६ कारखान्यांना ऊस लागवडीकरीता प्रत्येकी दोन-दोन कोटी दिले आहेत.त्यानंतर किती साखर निर्माण झाली, आणि किती कारखाने चालले ? याचा देखील विदर्भातील नेत्यांना विचार केला पाहिजे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण मला संरक्षण दिले पाहिजे.

सभापती : आपण प्रश्न विचारल्यानंतर मंत्रिमहोदयांना त्यांचे उत्तर पूर्ण करु दिले पाहिजे. आपण त्यांचे उत्तर ऐकून घ्यावे त्यानंतर मी आपणास प्रश्न विचारण्यास परवानगी देतो.

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, सन २००२ मध्ये राज्य शासनाच्या हमीवर राज्य सहकारी बँकेने ३२ कोटी रुपये त्यांना ऊस लागवडीसाठी दिले. जसजशी कर्जफेड होईल त्याप्रमाणे दरवर्षी पुन्हा कर्ज द्यावयाचे होते. परंतु त्यांच्याकडून काहीही साखर निर्माण झाली नाही, कारखाने चालले नाहीत. सहकारी क्षेत्रामध्ये १६ कारखाने आहेत व खाजगी क्षेत्रामध्ये ५ साखर कारखाने आहेत. १६ कारखान्यांपैकी जवळ जवळ ७ कारखाने अवसानयात गेले आहेत, ३ कारखान्यांना इंटेरियम ऑर्डर दिली आहे, आणि पॅकेजमध्ये ३ कारखाने आहेत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य सरकार आणि केंद्र सरकार यांचे पॅकेज फक्त 3 कारखान्यांना 15 वर्षाच्या कर्जफेडीसाठी पात्र आहे, बाकीच्या कारखान्यांनी 30-40 वर्षाची कर्जफेडीसाठी मुदत देण्यात यावी म्हणून काल पंतप्रधानांना निवेदन दिलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मला संरक्षण द्यावे. एकूण 10 कारखाने अवसायानामध्ये गेलेले आहेत, त्यांना शासनाने मोठ्या मनाने दोन-दोन कोटी रुपये दिलेले आहेत. मी माझ्या कारखान्याच्याबाबतीत हिशोब केला तर कारखान्याच्या क्षेत्रामध्ये 25 एकराच्या पुढे ऊस लावू शकतो. माझ्याकडे सगळी माहिती तयार आहे. मला एका बँकेनेही मदत केली नाही तर मी खाजगी उद्योजकांडून दोन कोटी रुपये घेऊन जॉईन्ट व्हेन्चर मधून काय केलेले आहे. सहा हजार एकरामधील ऊस घेतलेला आहे, तो 25 हजार एकर क्षेत्रापर्यन्तचा ऊस घेऊ शकतो. मी कापसावर उपाय म्हणून हा ऊस लावतो आहोत. परंतु त्यामध्ये आपण भेदभाव करत आहात. अवसायानामध्ये आलेल्या कारखान्यांना आपण दोन-दोन कोटी रुपयांची मदत देता. ही मदत माझ्या साखर कारखान्यांना मिळणार नाही तर ऊस लावणाऱ्या शेतकऱ्यांना ती मिळणार आहे काय ?.

सभापती : प्रश्न विचारा. प्रश्नोत्तराचा तास वेळेनुसार संपल्यानंतर देखील विदर्भाचा महत्वाचा प्रश्न आहे,हे लक्षात घेऊन मी परवानगी दिलेली आहे.

श्री.नितीन गडकरी : मी आपला आभारी आहे. मला एवढीच विनंती करावयाची आहे की, विदर्भामध्ये ऊसाचे पीक वाढले पाहिजे म्हणून खाजगी कारखान्यांना परवानगी दिली. माझा प्रश्न असा आहे की, अवसायानामध्ये आलेंल्या कारखाने आहेत, त्यांना दोन-दोन कोटी रुपयाची मदत दिली. त्याप्रमाणे खाजगी कारखान्यांना मदत दिली तर त्या कारखान्याच्या क्षेत्रामध्ये ऊस लावणारे शेतकरी आहेत, त्यांना मदत होणार आहे. 25 हजार एकर क्षेत्रामध्ये शेतकऱ्यांना ऊसाचे उत्पादन करण्यासाठी आपण मदत करणार आहात काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, केंद्र सरकार आणि राज्य सरकारने पॅकेज दिलेले आहे. त्यामध्ये विदर्भातील फक्त तीन कारखाने बसतात. त्यांना पंधरा वर्षाचे पॅकेज दिलेले आहे. 20 वर्षाच्या पॅकेजमध्ये वैनगंगा सहकारी साखर कारखाना बसतो. बाकीच्या कारखान्यांनी 30 वर्षाचे पॅकेज द्यावे,अशाप्रकारची विनंती पंतप्रधानांना केलेली आहे. खाजगी साखर कारखान्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

डॉ.पतंगराव कदम (पुढे सुरु...

संदर्भामध्ये जेवढा ऊस उपलब्ध आहे, तेवढे साखर कारखाने चालू आहेत. खाजगी कारखान्यांच्या क्षेत्रामध्ये ऊस लावण्याचा खास कार्यक्रम घेतलेला होता. या संदर्भाने सन्माननीय राज्य मंत्री महोदयांनी सांगितलेले आहे.

श्री.नितीन गडकरी : खाजगी कारखान्यांच्या संदर्भात काही सांगितलेले नाही.

डॉ.पतंगराव कदम : खाजगी कारखान्यांच्या क्षेत्रातील शेतकऱ्यांनी ऊस उत्पादन करण्याच्या संदर्भातील निर्णय अद्याप झालेला नाही. या संदर्भातील निर्णय आम्ही घेऊ.

सभापती : आता प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाबाबत.

सभापती : सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर,मधुकर सरपोतदार, नितीन गडकरी, दिवाकर रावते, विनोद तावडे वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराच्या तासानंतर सदनाचे कामकाज बाजूला ठेवून या ठिकाणी शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या अनुषंगाने गेल्यावेळी राज्य सरकारने मदत केली असली तरी शेतकऱ्यांच्या आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढलेले आहे, या अनुषंगाने प्रस्ताव दिलेला आहे. मी हा प्रस्ताव स्वीकारण्याचे ठरविलेले आहे. या प्रस्तावाची चर्चा आपण तातडीने करु, पण त्या अगोदर आजचे जे शासकीय कामकाज आहे ते पूर्ण करु या.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, असे करु नका. या सभागृहाची प्रतिष्ठा राहावी म्हणून आम्ही प्रस्तावामध्ये "प्रश्नोत्तराच्या तासानंतर" असा उल्लेख केलेला आहे. विधानसभा सभागृहात तर प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन चर्चा सुरु केलेली आहे. आजचे शासकीय कामकाज उद्या घ्यावे.

सभापती : ठीक आहे. आजचे कामकाज उद्या घेण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आमचे जे औचित्त्याचे मुद्दे आहेत ते सुध्दा उद्या घ्यावेत.

सभापती : ठीक आहे. आजचे औचित्याचे मुद्दे उद्या घेण्यात येतील. या प्रस्तावावरील चर्चा आज होईल. आता 3 वाजून 10 मिनिटे झालेली आहेत. या प्रस्तावावरील चर्चा 3 वाजून 30 मिनिटांनी सुरु होईल. या अल्पकालीन चर्चेला अडीच तासाचा वेळ देण्यात येईल. आता मी 20 मिनिटांकरिता सभागृहाचे कामकाज तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दु. 3.10 ते 3.30 वाजेपर्यंत स्थगित झाली)

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

स्थगितीनंतर

सभापतीस्थानी माननीय उपसभापती

श्री. नितीन गडकरी : माननीय उपसभापती महोदय, सभागृहामध्ये अतिशय महत्वाच्या विषयावर चर्चा सुरु होत असताना सभागृहामध्ये माननीय कृषीमंत्री हजर नाहीत. शेतकरी आत्महत्या करीत आहेत, त्याचे गांभीर्य या सरकारला आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : खालच्या सभागृहामध्येही शेतक-यांच्या आत्महत्येच्या विषयावर चर्चा सुरु आहे. माननीय कृषी मंत्री या सभागृहामध्ये येत आहेत.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.दिवाकर रावते : उपसभापती महोदय, मी मघाशी औचित्याच्या मुद्याद्वारे दोन बिघा जमिनीचा प्रश्न उपस्थित केला होता. त्यासंबंधी सन्माननीय सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम हे उत्तर द्यायला तयार होते. हा प्रश्न पटलावर आला आहे. तो अर्धवट राहिला असल्यामुळे त्याचे उत्तर येणे आवश्यक आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सभापती-तालिका निर्देशित करणे.

उपसभापती : मी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 8 च्या पोटनियम (1) अन्वये खालील सदस्यांची सभापती तालिकेवर नामनियुक्ती करतो :-

1) श्रीमती सुधा जोशी.
2) श्री.विलास अवचट.
3) श्री.विनोद तावडे.
4) श्री.गुरुनाथ कुळकर्णी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण.

मु.शी.: राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे वाढते प्रमाण या विषयावर सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व दिवाकर रावते, विनोद तावडे, वि.प.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

उपसभापती : या अल्पकालीन चर्चेसंबंधी औपचारिक प्रस्ताव मांडता येणार नाही. या चर्चेसाठी मी 2 तास 30 मिनिटे वेळ दिलेला आहे. सूचना देणारे सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर आपली सूचना वाचतील आणि भाषण करतील.

श्री.पांडुरंग फुंडकर (विरोधी पक्षनेता) : महोदय, मी नियम 97 अन्वये आपल्या अनुमतीने पुढील विषयावर अल्पकालीन चर्चा उपस्थित करतो :-

"ज्याअर्थी, राज्य शासनाने गत नागपूर अधिवेशनात आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी 1075 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले, आणि,

ज्याअर्थी, हे पॅकेज जाहीर केल्यानंतर पॅकेजमधील कलमांची अंमलबजावणी केलेली नाही, आणि,

ज्याअर्थी, शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्जपुरवठा करण्याची केवळ घोषणा केली आणि त्याची कार्यवाही अद्याप झाली नाही, आणि,

ज्याअर्थी, एकरकमी कर्ज परतफेडीचा निर्णय घेऊन त्याचीही अंमलबजावणी केलेली नाही, आणि,

ज्याअर्थी, या सर्व फसव्या घोषणामुळे राज्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढलेले आहे, आणि,

ज्याअर्थी, या सर्व परिस्थितीस राज्य शासन प्रामुख्याने जबाबदार आहे,

त्याअर्थी, या अतिशय गंभीर व तातडीच्या विषयाबाबत चर्चा करण्यासाठी प्रश्नोत्तरानंतरचे सभागृहाचे सर्व कामकाज बाजुला ठेवून चर्चा करण्यात यावी."

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

माननीय उपसभापती महोदय, मागील डिसेंबर महिन्याच्या नागपूर अधिवेशनामध्ये विदर्भातील 6 जिल्हयातील शेतक-यांसाठी या शासनाने एक पॅकेज जाहीर केले होते. आता त्या पॅकेजची प्रत माझ्या हातात आहे. हे पॅकेज शासन जाहीर करीत आहे त्यामुळे आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या संदर्भात शासनाची प्रामाणिक भावना आहे, शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या पाहिजेत असे शासनाला वाटत असेल असे आम्हाला सुरुवातीला वाटले. परंतु शासनाने पॅकेज जाहीर करुन सुध्दा राज्यामध्ये आणि विदर्भामध्ये शेतक-यांच्या आत्महत्येचे सत्र अजून चालूच आहे. विरोधीपक्षाच्या वतीने मागच्या बजेट सेशनमध्ये शेतक-यांच्या आत्महत्या संदर्भातील चर्चा या सभागृहात झालेली आहे. प्रथम शेतकरी आत्महत्या करीत आहेत हे शासन मान्य करीत नव्हते, महाराष्ट्राचे सरकार दाद देत नव्हते. शेतक-यांचे मानसिक संतुलन बिघडलेले आहे असे माननीय उप मुख्यमंत्री यांचे वक्तव्य लोकमत या वर्तमान पत्रातून छापून आले होते. शेतक-यांच्या आत्महत्याच्या संदर्भात लोकमतमध्ये जो लेख छापून आला होता तो मी पूर्णपणे वाचलेला आहे. दारुच्या व्यसनामुळे शेतकरी आत्महत्या करीत आहेत अशा प्रकारचे माननीय उपमुख्यमंत्र्याचे वक्तव्य मी वर्तमान पत्रातून वाचलेले आहे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी अशा प्रकारचे स्टेटमेंट केले नव्हते. आत्महत्येला अनेक कारणे आहेत असे मी म्हणालो होतो. 14,700 शेतक-यांनी ज्या आत्महत्या केलेल्या आहेत त्याचा मी निष्कर्ष काढला होता. शेतक-यांच्या आत्महत्या या नापिकी, खासगी सावकाराकडून घेतलेले कर्ज, कर्जबाजारीपणा, पिकाला कमी मिळत असलेला भाव, कर्जपुरवठा यामुळे झालेल्या आहेत अशा प्रकारचा उल्लेख मी त्यात केला होता.

श्री. पांडुरंग फुंडकर : उपसभापती महोदय, या ठिकाणी मी माझे वैयक्तिक मत सांगितले नसून वर्तमानपत्रात जे काही छापून आले होते त्याचा मी या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. त्यावेळी शेतकरी आत्महत्या करीत आहे असे मानण्यास सरकार तयार नव्हते. परंतु शेतक-यांच्या आत्महत्येच्या संदर्भात जेव्हा टाटा इंस्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सने सर्व्हे केला त्यामध्ये स्पष्ट म्हटले होते की, 850 शेतक-यांनी आत्महत्या कर्जबाजारीपणामुळे केलेल्या आहेत . तसेच इंदिरा गांधी इंस्टिट्यूटने सर्व्हेचा रिपोर्ट दिला तेव्हा त्यात सुध्दा म्हटले होते की, शेतकरी ज्या काही

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर.....

आत्महत्या करीत आहेत त्या कर्जबाजारीपणामुळे करीत आहेत असे म्हटले होते. त्यावेळी डिसेंबरच्या अधिवेशनातील पूर्वसंध्येला, जर माझी माहिती चुकीची नसेल तर या राज्याच्या माननीय मुख्यमंत्री महोदयांनी या राज्यातील 850 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत असे मान्य केले होते. ज्यावेळी 850 शेतक-यांनी आत्महत्या केल्या त्यावेळी विरोधी पक्षाच्या वतीने मागणी करण्यात आली की, आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना तुम्ही आर्थिक मदत देणार आहात की, नाही? परंतु त्यावेळी 850 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या असतांना 150 आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत देण्यात आली. नागपूरमध्ये या शासनाने जे पॅकेज जाहीर केले होते त्या पॅकेजमध्ये सांगण्यात आले होते की, 850 शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत हे आम्हाला मान्य आहे परंतु आम्ही 850 शेतक-यांच्या कुटुंबियांना मदत करणार नाही परंतु कमिशनर स्तरावरुन आणि कलेक्टर स्तरावरुन यासंदर्भात पुन्हा चौकशी करुन मदत देऊ. पॅकेज जाहीर झाल्यानंतर अनेक गोष्टी जाहीर करण्यात आल्या त्या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या ठिकाणी करणार नाही कारण या विषयावर माझे सहकारी आपले विचार मांडणारच आहेत. या ठिकाणी मी फक्त शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या मुद्याच्या संदर्भातच माझे विचार व्यक्त करणार आहे. या राज्याच्या माननीय सहकारमंत्र्यांनी जाहीर केले होते की, 1 जूनपासून या राज्यातील शेतक-यांना 6 टक्के दराने कर्जपुरवठा केला जाईल. तसेच देशाच्या कृषीमंत्र्यांनी सुध्दा जाहीर केले होते की, 6 टक्के दराने शेतक-यांना कर्जपुरवठा केला जाईल. 25 हजारापर्यंत कर्ज घेतलेल्या शेतक-याचे व्याज माफ केले जाईल, त्याच्या कर्जाचे पुनर्वसन केले जाईल, शेतक-याचे कर्जाचे जेवढे लिमिट आहे तेवढे कर्ज दिले जाईल असे जाहीर करण्यात आले होते

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

श्री.पतंगराव कदमसाहेब शेतकऱ्यांचे 25 हजार रुपयांवरील व्याज पूर्णपणे माफ झाले आहे का ? हे व्याज अजून माफ झालेले नाही. 25 हजार रुपयांपेक्षा जास्त कर्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या कर्जाचे अजून पुनर्वसन झालेले नाही. नॅशनल बँकांची गोष्ट आपण समजू शकतो. परंतु शेतकरी जेव्हा जिल्हा सहकारी बँकाकडे कर्ज मागायला गेले तेव्हा जिल्हा सहकारी बँकेच्या मॅनेजरने शेतकऱ्यांना हाकलून दिले. त्यांनी सांगितले की, तुम्ही 30 टक्के, 40 टक्के, 50 टक्के कर्ज घ्या, परंतु तुम्हाला 100 टक्के कर्ज मिळणार नाही. एखाद्या शेतकऱ्याने जर 40 हजार रुपये कर्ज घेतले असेल तर त्याला सांगितले जाते की, तुम्हाला 25 हजार रुपयांपर्यंत व्याज माफ आहे आणि 15 हजार रुपयांचे व्याज भरावे लागेल. परंतु जोपर्यंत तुम्ही व्याज भरणार नाहीत तोपर्यंत तुम्हाला व्याज माफी लागू होणार नाही. निर्णयामध्ये स्पष्टता नव्हती, आदेश स्पष्ट नव्हते. त्याचा फायदा बँकांनी घेतला.

सभापती महोदय, मुंबईत धो-धो पाऊस पडत आहे. परंतु विदर्भात पेरणीसाठी देखील पाऊस झालेला नाही. शेतकऱ्यांचे बँकासमोर लोंढेच्या लोंढ उभे राहत आहेत. परंतु बँकांचे मॅनेजर त्यांना उभे करीत नाहीत. त्यांना सांगितले जाते की, तुम्ही फक्त 30 टक्के, 40 टक्के कर्ज घ्या, त्यापेक्षा तुम्हाला जास्त कर्ज मिळणार नाही. नॅशनल बँकांची गोष्ट वेगळी आहे.नॅशनल बँकांनी सांगितले की, आम्हाला अजून व्याज माफीचे आदेश मिळालेले नाहीत. आम्ही तुमच्या कर्जाचे हप्ते पाडू शकत नाही आणि तुम्हाला नव्याने कर्ज देता येणार नाही. सरकारने शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर करुन वाहवा करुन घेतली परंतु त्याचा फायदा शेतकऱ्यांना झालेला नाही. आमची मागणी होती की, जर तुम्हाला खरोखर आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल तर शेतकऱ्याने घेतलेले कर्ज पूर्णपणे माफ करावे, परंतु आपण कर्ज माफ केले नाही फक्त व्याज माफ केले. यामध्ये बँकाचा फायदा झाला. माननीय पंतप्रधानानी सुध्दा विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केले. त्याचा फायदा सुध्दा बँकांना झालेला आहे. ज्या शेतकऱ्याने दामदुपटीने 10 हजार रुपयांचे कर्ज घेतले असेल त्याने व्याजापोटी 30-40 हजार रुपये देऊन सुध्दा त्याच्याकडे 50 हजार रुपयांचे व्याज दाखविले आहे. तेव्हा पॅकेज जाहीर करुन बँकांचा फायदा झालेला आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

शेतकऱ्यांचा फायदा झालेला नाही. शेतकऱ्यांकडून दामदुपटीपेक्षा कर्ज वसूल करणे हा कायद्याने गुन्हा आहे असे हायकोर्टाने जाहीर करुन सुध्दा आपण शेतकऱ्यांची कर्जातून मुक्तता केलेली नाही. हा निकाल अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी आहे. शेतकऱ्याने 10 हजार रुपये कर्ज काढल्यास त्याने 50 हजार रुपये भरुन सुध्दा आजही तो कर्जमुक्त झालेला नाही. पॅकेज जाहीर होऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबलेल्या नाहीत. जानेवारी 2006 पासून आतापर्यंत जवळपास 550 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. मागच्या वर्षी हा आकडा हजाराच्या घरात होता. माननीय पंतप्रधानांनी विदर्भाला भेट दिली. त्यांनी शेतकऱ्यांसाठी एक पॅकेज जाहीर केले. त्यांनी जाहीर केलेल्या पॅकेजचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार नाही. माननीय पंतप्रधानांनी शेतकऱ्यांसाठी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्यामध्ये क्रेडीट फ्लो 1275 कोटी रुपये, कर्जाचे पुनर्वसन 1296 कोटी रुपयांचेआणि 30.6.2006 पर्यंत 712 कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर....

हे व्याज कोणाला मिळणार ? आपण याचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना देत नाही तर आपण याचा लाभ सहकारी बँका व इतर बँकांना देणार आहात. ज्या बँका अडचणीत आहेत, त्याबाबतीत वसुली होत नाही. परंतु आपण प्रत्यक्षात शेतक-यांना लाभ देणार का ? जिल्हयातील शेतक-यांना आपण 50 लाख रुपये दिले. त्याचा प्रत्यक्ष लाभ किती शेतकऱ्यांना होणार ? आपण कसल्या प्रकारची मदत आत्महत्येच्या बाबतीत करीत आहात ? आपण एक लाख रुपयांची तरतूद जाहीर केली. पंतप्रधानांनी पॅकेजची घोषणा करताना आपल्याला फार बरे वाटते. परंतु त्याची खाली अंमलबजावणी कशी होते ? जे गरीब, कर्जबाजारी, ज्यांची एकवेळ खायची सोय नाही, ज्यांची मुले उघडयावर पडलेली आहेत, ज्यांच्या मुली लग्नाच्या राहिलेल्या आहेत अशा शेतकऱ्यांना मदत देताना आपण त्यांच्या हातात 70 हजार रुपयांचे बॉंड दिले. आपण त्यांच्यासमोर 30 हजार रुपयांचा चेक घेऊन गेलात आणि त्यांना सांगितले की, आम्ही मागचे कर्जाचे 20 हजार रुपये कापून घेत आहोत. अशा प्रकारे आपण शेतकऱ्यांस प्रत्यक्षात 10 हजार रुपयेच दिले. ही असली मदत आहे का ? असे प्रकार सर्रास चालू आहेत. यामुळे आत्महत्या थांबणार आहेत का ? याबाबतीत आपल्याला शरम वाटली पाहिजे. ज्यावेळी माननीय पंतप्रधान नागपूरमध्ये आले त्याच्या दुसऱ्या दिवशी वर्धा व अमरावती जिल्हयात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. नांदगांव व खंडेश्वरमध्ये आत्महत्या झाल्या. कर्जापोटी जहर खाऊन 3 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. आज तीन हजार कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर होऊनही शेतकरी आत्महत्या करीत आहेत, याचा अर्थ काय ? अशा प्रकारे पॅकेज जाहीर करावयाचे आणि शेतकऱ्यांना काहीच मदत करावयाची नाही, हे योग्य नाही. अशा प्रकारे मदत करतेवळी आपण 1 लाख रुपयांच्या मदतीचे गोंडस नाव देता, हे बरोबर नाही. अशा प्रकारे आपण शेतकऱ्यांच्या हातात 70 हजार रुपयांचा बॉंड देता, परंतु प्रत्यक्षात त्यांना आपण फक्त 10 हजार रुपयेच देता, हे योग्य नाही. अशा मदतीने शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार आहेत काय ? ज्यावेळी माननीय पंतप्रधानांचा दौरा विदर्भात होता, त्यावेळी त्यांच्या सोबत माननीय पवार साहेब आले होते. त्यावेळी माननीय पवार साहेबांनी स्टेटमेंट दिले की, शेतीसाठी अर्थसंकल्पामध्ये फक्त अडीच टक्केच तरतूद करण्यात आलेली आहे, त्यातून आपण शेतकऱ्यांना किती पैसे देणार ? अशा प्रकारे त्यांनी स्टेटमेंट केले. भारत हा शेती प्रधान देश असून 64 टक्के जनता ही शेतीवर अवलंबून आहे, परंतु यासाठी अर्थसंकल्पात फक्त अडीच

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

टक्केच तरतूद केली जाते, मग शेतकरी जगणार कसे ? अशा प्रकारचा सवालही त्यांनी केला. देशाच्या माननीय कृषि मंत्र्यांनी अशा प्रकारचा सवाल केला. माननीय उप मुख्यमंत्री महोदय, आपण माननीय पवार साहेबांना सांगावे की, आपण शेतकऱ्यांचे मसिहा आहात. अशा प्रकारचे चित्र असेल तर माननीय कृषि मंत्र्यांनी राजीनामा दिला पाहिजे. केंद्र सरकारच्या अर्थसंकल्पामध्ये शेतकऱ्यांसाठी तरतूद होत नसेल तर कृषि खात्यावर आपण राहताच कशाला ? माननीय पवार साहेब सल्ला देतात, परंतु त्याच खात्यावर बसतात, हे कसे काय ? सभापती महोदय, या माध्यमातून शेतकऱ्यांना न्याय मिळणार नाही. आज गव्हाची, साखरेची आयात करण्यात येत आहे. परंतु आज याठिकाणच्या आत्महत्या थांबणार नाहीत. सभापती महोदय, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष आपल्या महाराष्ट्रामध्ये आले होते, त्यावेळी त्यांनी सांगितले की, महाराष्ट्राचा गेल्या तीन वर्षाचा शेतीतील विकासाचा दर हा (-)1.5 टक्के असून याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली होती. हा दर किमान 3 टक्क्यांपर्यंत नेण्याची गरज आहे, तरच शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारखे प्रश्न सोडवता येतील, असे स्पष्ट मत नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष श्री.अहुलवालिया यांनी मंगळवारी महाराष्ट्र टाईम्सला बोलताना व्यक्त केले. आत्महत्येच्या बाबतीत वरवर विचार केला जात आहे. आत्महत्येच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशामध्ये वरचा क्रमांक लागला आहे. माननीय उप मुख्यमंत्री महोदय, ही स्वाभिमानाची गोष्ट आहे काय ? आपण सांगितले की, कर्ज माफ करु. परंतु आपण अशा पध्दतीने जात आहात. माननीय उप मुख्यमंत्री आपण जाहीर केले होते की, या राज्यामध्ये जे अवैध सावकारी चालवतात त्यांना आपण कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलून काढू. किती जणांना आपण कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलून काढले ?

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखापाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

सरकारने गरीब सावकारांना पकडले परंतु जे मोठे मासे आहेत त्यांचे काय झाले ? बुलढाणा पोलीस अधिक्षकांकडे एका सावकाराबाबत जवळपास 44 प्रकरणे दाखल झाली आहेत. यापैकी किती गुन्हे रजिस्टर झाले ? राजकीय घराण्याशी संबंधित आहे म्हणून त्यांना सोडून देण्यात आले आहे काय ? या राज्यातील एका आमदाराच्या परिवाराशी हे प्रकरण संबंधित आहे. याच परिवाराविरुध्द ही 44 प्रकरणे दाखल झाली आहेत. बुलढाणा जिल्हयाचे पोलीस अधिक्षक, श्री.कृष्णप्रसाद यांनी गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न सुरु केला. परंतु, काय झाले नंतर त्याचे ? राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी बुलढाणा जिल्हाधिका-यांना बोलावून 'वर्षा' या शासकीय निवासस्थानी बैठक घेतली. ही बैठक झाल्यानंतर जिल्हाधिका-यांनी पोलीस अधिक्षक, बुलढाणा यांना पत्र लिहिले. या ठिकाणी उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील उपस्थित आहेत. मी त्यांच्या लक्षात आणून देऊ इच्छितो की, अशा प्रकारे आपल्या खात्यावर अतिक्रमण होत आहे, आपल्या खात्याच्या कारभारात हस्तक्षेप होत आहे, त्यामुळे तुम्ही सावधान राहिले पाहिजे. जिल्हाधिका-यांनी पोलीस अधिक्षकांना पाठविलेल्या पत्राची प्रत माझ्याकडे उपलब्ध आहे. मी हे पत्र या सभागृहात वाचून दाखविणार आहे. या पत्राचा विषय "माननीय आमदार श्री.दिलीपकुमार सानंदा व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरुध्द होत असलेल्या अवैध सावकारीच्या तक्रारीबाबत" असा आहे. तसेच, "मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक 01/06/2006 रोजीच्या बैठकीत दिलेले निदेश" अशा प्रकारे या पत्राला संदर्भ देण्यात आला आहे. या पत्राचा मजकूर असा आहे की, "दिनांक 01/06/2006 रोजी मा.मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी उपरोक्त विषयावर सविस्तर चर्चा झाली. या बैठकीस मा.आमदार दिलीपकुमार सानंदा यांनी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरुध्द हेतुपुरस्सरपणे खोटे आरोप लावून अवैध सावकारीच्या कारणाखाली तक्रारी केल्या जात असून या तक्रारींच्या सत्यतेबाबत छाननी न करता गुन्हे दाखल केले जात असल्याबाबत तक्रार केली आहे. या तक्रारींची माननीय मुख्यमंत्री यांनी गंभीर दखल घेतली असून अशा प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्यास मा.आमदार, श्री.दिलीपकुमार सानंदा व त्यांच्या कुटुंबातील सदस्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यापूर्वी अशा प्रकारचे प्रकरण/तक्रार अवैध सावकार प्रतिबंधक जिल्हास्तरीय समितीपुढे निर्णयासाठी ठेवावे आणि समितीने जिल्हा सरकारी वकिलांचे अभिप्राय घेतल्यानंतरच या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.....

बाबतचा निर्णय घेऊन यथोचित कारवाई करावी, असे आदेश दिले आहेत. आपणांस कळविण्यात येते की, माननीय मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निदेशाप्रमाणे सावकार प्रतिबंधक कायद्यामधील सानंदा कुटुंबाबाबतची प्रकरणे हाताळावीत." या पत्रावर श्री.गणेश ठाकूर, जिल्हाधिकारी, बुलढाणा यांची स्वाक्षरी आहे. सदरचे पत्र मी माननीय सभापतींच्या माध्यमातून उपमुख्यमंत्री महोदयांना देत आहे. केवळ हे पत्र देऊन भागले नाही तर ज्या दिवशी एक शेतकरी, श्री.राजेंद्र कवलदार याने तक्रार दाखल केली त्याच दिवशी पोलीस अधिक्षकांनी गुन्हे दाखल करण्याची कारवाई सुरु केली, याबद्दल मी पोलीस अधिक्षकांचे अभिनंदन करणार आहे. त्याचप्रमाणे गेले वर्षभर संबंधित पोलीस अधिक्षकांची बदली न होण्याबाबतचे जे संरक्षण माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी दिले त्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करणार आहे. आता मात्र माननीय उपमुख्यमंत्री महोदयांनी 'झोल' खाल्ली आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी आदेश दिले आणि तुमच्या विभागाने त्यांची बदली केली. 1 तारखेला अवैध सावकारीविरुध्द तक्रार दाखल झाली, 2 तारखेला गुन्हे रजिस्टर करण्याची कारवाई सुरु झाली. हे गुन्हे केवळ अवैध सावकारीविरुध्दच नव्हते तर दरोडेखोरी, किडनॅपिंग यांचा देखील या गुन्हयांच्या यादीत समावेश आहे. ज्या दिवशी गुन्हे दाखल झाले त्याच दिवशी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यालयातून संबंधित पोलीस निरिक्षकांना फोन करण्यात आला. माझ्याकडे पोलीस स्टेशनमधील स्टेशन डायरीची प्रत आहे. तेथील मर्द पोलीस निरिक्षक यांनी त्यांच्या स्टेशन डायरीमध्ये अशी नोंद केली आहे की, "मुख्यमंत्री कार्यालयातून फोन आला, मुख्यमंत्री महोदयांचे पी.एस. श्री.पडवळ यांनी आमदार सानंदा व त्यांच्या कुटुंबियांविरुध्द दाखल केलेल्या गुन्हयांची माहिती मागितली असता, 12.15 मिनिटांनी गुन्हे दाखल केल्याची माहिती देण्यात आली. त्यानंतर पी.एस.यांनी दाखल केलेल्या गुन्हयांची कलमे विचारली असता त्यांना त्याची माहिती देण्यात आली. यापुढे पी.एस.यांनी फोनवर असे सांगितले की, यापुढे काहीही कारवाई करु नका, असे माननीय सी.एम.साहेबांचे आदेश आहेत."

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

व पुन्हा इतर दुसरे गुन्हे नोंदवू नका असेही म्हटलेले आहे. सभापती महोदय, या दोन्ही प्रती मी आपल्या माध्यमातून माननीय गृह मंत्र्यांकडे देतो. सभापती महोदय, कोपरापासून ढोपरापर्यंत कोण कोणाला सोलणार आहे ? शेतक-यांच्या 40 तक्रारी माझ्याकडे आहेत. त्या 40 शेतक-यांनी एस.पी.कडे तक्रारी केलेल्या आहेत. एस.पी.ची गुन्हा रजिस्टर करण्याची तयारी आहे. परंतु एस.पी. काही करु शकत नाही, कारण माननीय मुख्यमंत्र्यांचे पोलीस स्टेशनला तसे आदेश आहेत. सभापती महोदय, त्या एस.पी.ची बदली करण्यात आली. सभापती महोदय, पुन्हा एक फाईल मी आपल्याकडे देतो. आबा आपण त्या एस.पी.ची बदली केली. माझ्याकडे वर्तमान पत्रातील कात्रणे आहेत. त्या एस.पी. ची बदली रद्द करण्यासाठी बुलढाणा जिल्हयामध्ये आंदोलने सुरु आहेत. एस.पी.च्या कार्यकालास एक वर्ष बाकी असतांना देखील त्यांची बदली करण्यात आली. नागपूर अधिवेशनामध्ये विधानसभेतील एका आमदाराच्या प्रश्नाला उत्तर देतांना तुम्ही सांगितले होते की, बुलढाण्याच्या एस.पी. ची बदली केली जाणार नाही. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये बुलढाणा पॅटर्न राबविण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत असे तुम्ही आश्वासन दिले हाते. काय झाले त्या आश्वासनाचे ? आबा महाराष्ट्रामध्ये तुमची प्रतिमा चांगली होती. परंतु या प्रकरणामध्ये तुम्ही माघार घेतली आहे. हे प्रकरण आता महाराष्ट्रापुरते मर्यादीत राहिलेले नाही. तुमची बदनामी दिल्ली पर्यंत झालेली आहे. दिल्लीच्या जनसत्ता वृत्तपत्रामध्ये अशी बातमी आलेली आहे की, एस.पी. ची बदली मुख्यमंत्र्यांमुळे केलेली आहे. कर्जामुळे त्रस्त झालेल्या शेतक-यांनी तक्रारी दिलेल्या आहेत. सावकारांकडून धमक्या दिल्या जात आहेत की, एस.पी.ची बदली करा. तुम्ही आमच्याकडून शेती कशी परत घेता अशा प्रकारच्या सावकारांकडून शेतक-यांना धमक्या दिल्या जातात, त्या शेतक-यांचे काय होईल ? बुलढाणा जिल्हयातून श्री.कृष्ण प्रसाद गेल्यानंतर शेतक-यांच्या आत्महत्यांमध्ये शेकडोने भर पडणार आहे, त्या शेतक-यांना तुम्ही वाचविणार आहात काय ? आत्महत्यांचा आकडा फुगू छावयाचा नसेल तर सावकारांना कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलण्याची आवश्यकता आहे. सावकाराला सोलण्याची तुमची हिंमत आहे काय ? हिंमत असेल तर ती दाखवावी. मुख्यमंत्र्यांच्या दबावाखाली गृह खाते चालू देऊ नका. त्यामुळे तुमची इमेज

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर .....

खराब होणार आहे. तुम्ही त्या एस.पी.ची बदली होऊ देणार नाही. परतु त्या पोलीस अधिका-याला तुम्ही काम करु देणार आहात की नाही ? पोलिसांचे मॉरल डाऊन होत आहे. श्री.कृष्ण प्रसाद गेल्या नंतर आमचे काय होईल ? जसे पोलिसांचे मॉरल डाऊन झालेले आहे तसेच शेतक-यांचे देखील मॉरल डाऊन झालेले आहे. शेतक-यांना बँकांचे लाभ मिळत नाहीत. माननीय पंतप्रधानांनी बजेटेड घोषणा केलेली आहे. स्प्रींकलर हा ॲटम बजेटमध्ये आलेला आहे. कर्जाचे नूतनीकरण आणि व्याज माफीचा लाभ बँकांना होणार आहे. त्याचा लाभ शेतक-यांना होणार नाही. शेतक-र्यांनी कर्जबाजारी पणामुळे आत्महत्या केलेल्या आहेत. शेतक-यांकडे जिल्हा सहकारी बँकेच्या कर्जाचे सर्टिफिकेट असेल आणि त्या शेतक-याने आत्महत्या केली असेल तर त्या शेतक-यांच्या कुटुंबातील सदस्याला शासनाने मदत करावी. शासनाने निकष ठरविलेले आहेत. शेतक-याला राहत दिली पाहिजे. महाराष्ट्र राज्यावर एक लाखाच्या वर कर्ज आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. फुंडकर ...

माझे असे म्हणणे आहे की, या कर्जबाजारी शेतकऱ्यांचे कर्ज माफ केले तर 5-7 हजार कोटी रूपये वाढतील पण या राज्यातील शेतकरी कर्जमुक्त होणार आहे. सभापती महोदय, या आत्महत्या विदर्भातील केवळ सात जिल्ह्यांमध्येच झालेल्या आहेत काय ? शेतकऱ्यांच्या मध्ये आत्महत्येचा हा रोग चिकन गुनियासारखा सर्वत्र वाढलेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या आता महाराष्ट्रभर होत आहेत. पण आपण केवळ महाराष्ट्रातील आणि त्यातही विदर्भातील 6 जिल्ह्यांसाठीच पॅकेज दिले. तसे पाहिले तर विदर्भामध्ये 11 जिल्हे आहेत. विदर्भात असलेल्या भंडारा जिल्ह्यात, गोंदिया, चंद्रपूर जिल्ह्यामध्ये आत्महत्या होत नाहीत काय ? तेथेही शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. पण त्या जिल्ह्यांना हे पॅकेज आपण दिलेले नाही. इतकेच काय पण खानदेशमध्ये देखील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. मराठवाड्यामध्ये तर 2 हजारावर शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्या सगळ्यांनाच या पॅकेजचे निकष लागू झाले पाहिजेत. पण आपण त्यांच्यासाठी हे पॅकेज लागू केलेले नाही. आपण आत्महत्या केलेल्या सर्वच भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबांसाठी, शेतकऱ्यांसाठी हे पॅकेज लागू केले असते तर महाराष्ट्रातील शेतकऱ्याला महाराष्ट्र सरकार तुमच्या पाठीमागे समर्थपणे उभे आहे याचा दिलासा मिळाला असता. परंतु आपण तसे न करता काही तरी थातुर मातूर घोषण करून, ज्याला लाभ द्यायचा आहे त्याला न देता दुसऱ्यालाच लाभ द्यायचा असा प्रकार केलला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या खरोखरी आपल्याला थांबवावयाच्या असतील तर आपण शेतकऱ्यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध करून द्या. माझी या निमित्ताने माननीय सहकार मंत्री असलेल्या डॉ. पतंगराव कदम यांना विनंती आहे की, आपण सहकार मंत्री आहात तो पर्यंत तरी शेतकऱ्यांना अल्प दराने कर्ज आपण उपलब्ध करून द्यावे. ....

(सहकार मंत्री डॉ.पतंगराव कदम खाली बसून काही बोलतात ...)

आपण घोषणा जरूर केल्या आहेत. पण आजही 14-15 टक्क्यानेच बँका कर्ज देत आहेत आणि व्याजही वसूल करीत आहेत. आपण ज्या काही घोषणा केल्यात, पण त्या बँकांपर्यंत आपले आदेश आलेलेच नाहीत. म्हणून या प्रस्तावाच्या माध्यमातून मी आपल्याला एवढीच मागणी करतो आहे की, आता नव्याने या वर्षात ज्या साडेपाचशे आत्महत्या झालेल्या आहेत त्या शेतकऱ्यांच्या परिवाराला आपण ताबडतोब मदत द्या. पुन्हा एकदा याबाबत विचार करा आणि शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी करून देऊन 6 टक्के दराने नव्याने कर्ज उपलब्ध करून द्या. सभापती महोदय, बुलढाणा

..... डब्ल्यू 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी - तालिका सभापती श्री.गुरूनाथ कुलकर्णी)

श्री. फुंडकर ....

जिल्ह्यातील अवैध सावकारीबद्दल आपण स्पष्टपणे निर्णय घ्यावा. बुलडाणा जिल्ह्यामध्ये ज्यांच्यासाठी तेथे आंदोलन आंदोलन चालू आहे त्या पोलीस अधिक्षक श्री. कृष्णप्रसाद यांची बदली केली जाणार नाही असे आपण यापूर्वी जे सांगितले होते त्यापासून आपण का मागे हटलात ? कोपरा पासून ढोपरापर्यंत सोलून काढले जाईल असे म्हणणारे आमचे गृहमंत्री, कायद्यापुढे कोणीही मोठा नाही असे सांगणारे गृहमंत्री, स्वपक्षीय असो वा दुसरा कोणीही असो त्या सगळ्यांनाच कायदा लागू होईल असे ठामपणे सांगणारे गृहमंत्री आपलाच कायदा मित्रपक्षाला का लागू करीत नाहीत ? तेव्हा त्या अवैध सावकारी करणाऱ्यांनाही, मग तो कोणीही असो, त्याला आपण कायद्याचा बडगा दाखवावा एवढे बोलून मी भाषण संपवितो.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणामध्ये माझ्या नावाचा उल्लेख झाला असल्याने मी त्या संदर्भात काही खुलासा करू इच्छितो. अर्थात त्यांनी माझा उल्लेख चांगल्या अर्थानेच केलेला आहे पण मी आपल्याला या संदर्भात सांगू इच्छितो की, देशामध्ये कोठल्याही राज्याने केलेली नाही एवढी कडक आणि धडक कारवाई आपण या राज्यामध्ये अवैध सावकारांवर केलेली आहे. ...

श्री. पांडुरंग फुंडकर : मी बुलढाणा जिल्ह्यापुरते बोललो आहे.. विशेषत: तेथील एस.पी. संबंधात बोललो आहे...

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, कधीही आणि कोठल्याही राज्याने आजवर केलेली नव्हती एवढी कारवाई आपण या राज्यातील अवैध सावकारांवर केलेली आहे ...

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय उपमुख्यमंत्री या चर्चेला उपमुख्यमंत्री म्हणून देखील उत्तर देऊ शकतात. तेव्हा त्यांनी जरूर या संबंधात बोलावे. पण या ठिकाणी माननीय विरोधी पक्षनेते श्री.फुंडकर यांनी त्यांच्या भाषणातून नेमके आरोप केलेले आहेत की, बुलढाणा जिल्ह्यातील खामगावच्या आमदारांच्या कुटुंबियांवर अवैध सावकारीसंबंधात तेथील पोलीस अधिक्षकांनी कारवाई केल्याने आता त्या एसपींची बदली केली गेली आहे. त्यांनी हे

..... डब्ल्यू 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आरोप माननीय गृहमंत्र्यांवर केलेले नाहीत. परंतु माननीय गृहमंत्र्यांनी देखील आधी कबूल केल्याप्रमाणे त्या एस.पी.ला तेथेच ठेवले नाही तर त्याची बदली केली. तेव्हा त्याबद्दल माननीय गृहमंत्र्यांना काही खुलासा करावयाचा असेल तर ते जरूर आता करू शकतात परंतु माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या एकूणच भाषणावर त्यांना खुलासेवजा उत्तर द्यावयाचे असेल तर त्यांनी ते नंतरच द्यावे.

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी लिहिलेले पत्र स्पष्टपणे वाचले तर 'कोठली कारवाई करू नका' असे ते पत्र नव्हते. तर एखाद्या आमदाराने ....

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्र दिले पण त्याचा आधार घेऊन 392 सारखे कलम केव्हा लावले जाते ? डकैती, अपहरण या सारख्या गुन्ह्यांसाठी हे कलम लावले जाते, अवैध सावकारीसाठी ते कलम लावले जात नाही. पण त्या प्रकरणामध्ये हे कलम लावण्यात आले होते. पण मुख्यमंत्र्यांचे पत्र आल्याने पोलिसांनी पुढे कारवाई केली नाही. 10 दिवस त्यामुळे आरोपी फिरत होते असे मला येथे सांगावयाचे आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .... एक्स 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी एखाद्या अधिकाऱ्याच्या संदर्भात तक्रार केल्यानंतर त्या तक्रारीची नेहमी शहानिशा केली जाते. आमदारांचे पत्र कचऱ्याच्या टोपलीमध्ये टाकले जात नाही. कोणत्याही आमदारांनी एकदा पत्र दिल्यानंतर त्यासंबंधी कठोर कारवाई करणे चुकीचे वाटत नाही....

श्री. नितीन गडकरी : कुणाच्या खांद्यावर कुणाचे ओझे, त्यांचे पाप तुम्ही कशासाठी घेता? या प्रकरणामध्ये श्री. पडवळ यांनी सांगितले की, माननीय मुख्यमंत्र्यांचे निर्देश असल्यामुळे आपण कारवाई करु नका. असे त्यांचे पत्र रेकॉर्डवर आहे.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. हे पत्र गेल्यानंतर सुध्दा त्या कुटुंबियांवर चार गुन्हयांची नोंद झाली आहे. त्यानंतर कोर्टाने अँटीसिपेटरी बेल दिल्यानंतर पोलीस काय करणार? याठिकाणी त्यांच्या बदलीचा प्रश्न उपस्थित झाला. शासनाने राज्य स्तरावर निर्णय घेतला आहे की, आय.पी.एस. अधिकाऱ्यांना जास्तीत जास्त दोन वर्षाचा टेन्युअर द्यावयाचा. जे एस.पी. आहेत त्यांच्यासाठी हा नियम लावला, त्यामध्ये हे एस.पी. बसले. या एस.पी. ची बदली करावी म्हणून गेल्या दीड वर्षात 30-1 पत्रे प्राप्त झाली. हे एस.पी. चांगले काम करीत होते म्हणून त्यांना संरक्षण देण्याचे काम मी केले. ज्यावेळी राज्य स्तरावर एस.पी. ना दोन वर्षाचा कालावधी दिला जातो त्यावेळी सर्वच एस.पी. च्या बदल्या केल्या जातात, त्यामध्ये कुणालाही अपवाद केलेला नाही...

श्री. पांडुरंग फुंडकर : परंतु जी.आर. तीन वर्षाचा आहे.

श्री. आर. आर. पाटील : खरे आहे. परंतु एस.पी. साठी दोन वर्षाचे धोरण लावले आहे. त्याप्रमाणे यावर्षी बदल्या केल्या आहेत. कोणताही पोलीस अधिकारी हा स्वत:च्या जिल्हयात राहणार नाही. त्याला जिल्हयाच्या बाहेर जावे लागेल हा नियम पाळला आहे. एका पोलीस स्टेशनला 3 वर्षापेक्षा अधिक काळ नाही, एका जिल्हयात पाच वर्षापेक्षा अधिक काळ नाही, एका रेंजमध्ये 10 वर्षापेक्षा अधिक काळ नाही अशाप्रकारचा नियम लावतांना पूर्ण महाराष्ट्रामध्ये कुणालाही अपवाद केलेला नाही.

श्री. नितीन गडकरी : मला आपल्याला एकच विनंती करावयाची आहे. तुम्ही छातीवर हात ठेवून आम्ही सर्व केले असे सांगत आहात. तुमच्या प्रामाणिकपणावर आमचा विश्वास आहे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील : माझ्या प्रामाणिकपणावर पेक्षा माझा माझ्यावर विश्वास आहे. महाराष्ट्रातील सर्व एस.पी. ना हा नियम लावला आहे हे मी मनापासून सांगतो. शेवटी आपल्या मनाप्रमाणे निर्णय घेऊन प्रशासन चालत नाही. आणि म्हणून सर्वच एस.पी. ना नियम लावून त्यांच्या बदल्या केल्या आहेत. हे पत्र गेल्यानंतर सुध्दा त्यांच्यावर चार गुन्हे नोंदविले गेले आहेत. सर्वात महत्वाची बाब अशी की, बुलढाण्याप्रमाणे अनेक जिल्हयातील सावकारांवर मोठया प्रमाणात कारवाई झाली आहे. माननीय श्री. फुंडकर साहेबांना मी विश्वास देतो की, कारवाई करतांना कुणी किती प्रतिष्ठित व्यक्ती असली तरी बघितली जाणार नाही, कोण कोणत्या पदावर आहे हे बघितले जाणार नाही. कायद्यापुढे सर्व समान आहेत. म्हणून या प्रकरणाची शहानिशा होईपर्यंत निश्चितपणे चौकशी केली जाईल. आणि ज्याप्रमाणे इतरांवर कारवाई केली आहे त्याप्रमाणे या प्रकरणात सुध्दा कारवाई केली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी श्री. पडवळ यांचेबाबत सांगावे. आपण खुलासा केला की, स्टेशन डायरीमध्ये नोंद आहे. माननीय मुख्यमंत्र्यांचे स्वीय सहाय्यक श्री. पडवळ यांनी पोलीस स्टेशनला फोन केल्यानंतर तुमच्या पी.आय. ने माननीय मुख्यमंत्र्यांचे आदेश आहेत अशाप्रकारची नोंद केली. कलम 392 खाली गुन्हा असतांना पोलीस स्टेशनने त्याला पकडले नाही. त्याला 10 वर्षे मोकळीक दिल्यानंतर त्याने अँटीसिपेटरी बेल घेतला हे खरे आहे काय?

श्री. आर. आर. पाटील : जर त्यांना पकडावयाचे नसते तर गुन्हा नोंद केला नसता. जर दबाव असता तर स्टेशन डायरीला नोंद असल्यावर सुध्दा पोलिसांनी चार गुन्हे नोंद केले नसते. याचा अर्थ असा की, पोलीस मोकळेपणे काम करीत आहेत...

श्री. नितीन गडकरी : या सरकारमध्ये तुमच्यावर आमचा विश्वास होता. परंतु तुम्ही हे स्टेटमेंट करुन गृह खात्याचे नुकसान केले. तुम्ही कारण नसतांना दुसऱ्याच्या दोषासाठी आपले बोलणे वाया घालवीत आहात.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन आहे. महाराष्ट्र विधान परिषद नियम 289 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी जो प्रस्ताव मांडला आहे. त्या संदर्भात मला थोडीशी माहिती पाहिजे की, हा जो प्रस्ताव आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव (पुढे सुरु...

तो आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांपुरता मर्यादित आहे, की महाराष्ट्रामध्ये अशाप्रकारची सदृश्य परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता आहे,अशा अन्य विषयावर चर्चा करता येईल काय, या विषयाची माहिती पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : ते नवीन सदस्य आलेले आहेत त्यांना कायदा शिकवा.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांना समज देण्याची आवश्यकता आहे. मी आपल्याकडून माहिती घेण्यासाठी बोललो. त्यावर सन्माननीय सदस्य कसे बोलू शकतात ?

श्री.दिवाकर रावते : मी आपल्याशी बोलत नाही. मी सभापतींशी बोलत आहे.

श्री.भास्कर जाधव : मी सभापती महोदयांनी पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनद्वारा विचारण्याची परवानगी दिली म्हणून मी बोलण्यासाठी उभा राहिलो. सन्माननीय सदस्य कायदा शिकण्यास सांगत आहेत, हे बरोबर नाही. मी सभापती महोदय आपली परवानगी घेतली होती.

श्री.दिवाकर रावते : माहीत नाही तर कशाला बोलायचे.

तालिका सभापती (श्री.गुरुनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांना मला सांगावयाचे आहे की, हा विषय सभापतींचा आहे.

श्री.दिवाकर रावते : आत्महत्येच्या संदर्भात माहिती नसतांना कशाला बोलायचे, असे म्हटले तर माझे काय चुकले ?

श्री.भास्कर जाधव : त्यांना मला बोलण्याचा अधिकार नाही.

श्री.दिवाकर रावते : मी सन्माननीय सदस्यांशी बोलत नाही तरी ते बोलत आहेत.

श्री.भास्कर जाधव : मी बोलण्यासाठी परवानगी घेतली होती.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांचा आज सभागृहातील पहिला दिवस आहे.

श्री.भास्कर जाधव : मी दहा वर्षे विधानसभेचा सदस्य म्हणून काम केलेले आहे. मी सभापती महोदयांच्या परवानगीने बोललो. मी चुकीचे काय बोललो ?

श्री.दिवाकर रावते : चुकीचे बोलला. माहिती नसेल तर सांगतो. ...(अडथळा)... सभापती महोदय,मला आपण बोलण्याची परवानगी दिलेली आहे.

तालिका सभापती : सन्मानीय सदस्यांना विनंती आहे की, या विषयावर अधिक चर्चा करु नये. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, या सदनामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा गंभीर विषय चर्चिला जात आहे. सभागृहामध्ये बसलेल्या सदस्यांना माहीत आहे की, महाराष्ट्रातील शेतकरी उदध्वस्त होत आहे, ही परिस्थिती आहे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांच्या भाषणाला आक्षेप घेण्यासाठी सन्माननीय सदस्य उभे राहिले. अर्थात तो त्यांचा अधिकार आहे.

श्री.भास्कर जाधव : काय आक्षेप घेतला याचा खुलासा केला पाहिजे. मी पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशनद्वारा विचारले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मला आता भाषण करण्याचा अधिकार आहे ना ? कायदा शिकण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना खाली बसण्यासाठी सांगावे. ते दोन मिनिटापूर्वी शहाणपण शिकवत होते....

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य शहाणपणाविषयी बोलत आहेत हे बरोबर नाही. तसे बोलण्याचा त्यांना अधिकार नाही.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, मी दोन मिनिटाचा खुलासा करण्यासाठी उभा राहलो. आपण मला परवानगी दिली असतांना मला किती वेळा बसायला लागले याची आपल्याला माहिती आहे. सन्माननीय सदस्यांनी पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित करुन माहिती घेण्याचा प्रयत्न केला. तसा सदस्यांना अधिकार आहे. ती माहिती घेत असतांना सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी टॉन्टींग केले. या विषयावर गंभीरपणाने आणि चांगल्या वातावरणामध्ये चर्चा होण्यासाठी हे सदस्यांनी टाळले पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : या ठिकाणी आपण गांभीर्याने चर्चा करत आहोत...

श्री.नितीन गडकरी : दोन्ही बाजूच्या सदस्यांनी हा विषय थांबवून शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या विषयावर बोलावे अशी विनंती आहे.

श्री.दिवाकर रावते : सन्माननीय सदस्य खाली बसल्यानंतर मी बोलण्यासाठी उभा राहिलेलो आहे.

तालिका सभापती: सन्माननीय सदस्यांनी मूळ विषयावर बोलावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MHM/ SBT/

श्री.दिवाकर रावते : मी मूळ विषयावर बोलत होतो. माझ्या बोलण्यामध्ये सन्माननीय सदस्यांचा अपमान करण्याचा हेतू नाही. मी बोलत असताना सन्माननीय सदस्यांनी उभे राहून माहिती घेण्याचा प्रयत्न केला, त्याला माझे ऑब्जेक्शन आहे. ते बसल्यानंतर मी माझ्या भाषणाला सुरुवात केली. त्यानंतर सन्माननीय सदस्यांना बोलण्याचा काही संबंध नाही.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ...

मी हे का म्हणालो ? महाराष्ट्रामध्ये ज्या आत्महत्या होत आहेत, कास्तकार उद्ध्वस्त होत आहेत याला हे सरकार जबाबदार आहे. या सरकारमध्ये दोन घटकपक्ष आहेत. त्यांची धोरणे आहेत. केंद्र सरकारचे कृषी धोरण आहे. केंद्र सरकारच्या कृषी धोरणाला जे संबंधित मंत्रिमहोदय जबाबदार आहेत ते या महाराष्ट्रातील सन्माननीय नेते आहेत. त्याचा जो काही परिणाम होतो तो या उद्ध्वस्त झालेल्या कास्तकारांवर होतो. ज्या ज्या वेळी सरकारवर एखादी बाजू उलटविण्याचा प्रयत्न विरोधक करतात तेव्हा सरकारमधील संबंधित पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून त्या चर्चेला वेगळे वळण देण्याचा प्रयत्न करतात. त्यातील हा प्रकार आहे. म्हणून मी त्याची नोंद केली. हा मानअपमानाचा प्रश्न नाही. जाणीवपूर्वक आपली हुशारी वापरुन पक्षामध्ये प्रतिष्ठा निर्माण करण्याकरिता, विरोधकांचा डाव कसा उलटवून लावावाचा यासाठी हा प्रयत्न केलेला आहे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्यांना असा हेत्वारोप करता येणार नाही. माझा हरकतीचा मुद्दा आपल्याला ऐकून घ्यावा लागेल. सभापती महोदय आपण निर्णय द्यावा. सन्माननीय सदस्यांना हेत्वारोप करता येणार नाही. सभागृहामध्ये सन्माननीय सदस्यांनी कसे बोलावयाचे, कसे वागावयाचे.....

(विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकदम बोलण्याचा प्रयत्न करतात)

तालिका सभाध्यक्ष (श्री. गुरुनाथ कुलकर्णी) : सन्माननीय सदस्यांचा हरकतीचा मुद्दा असा आहे की, कोणत्याही सन्माननीय सदस्यांवर हेत्वारोप करु नयेत.

ॲड. अनिल परब : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा ऐकून घ्यावाच लागेल असे सन्माननीय सदस्य म्हणाले. ते माननीय सभापतींना असे सांगू शकत नाहीत. सन्माननीय सदस्यांना समज द्यावी.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आत्महत्येचा महत्वाचा प्रश्न सभागृहासमोर चर्चेसाठी आहे. त्या विषयावर सन्माननीय सदस्यांनी बोलण्यास सुरुवात करावी अशी मी विनंती करतो.

तालिका सभाध्यक्ष : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, अशा प्रकारे समोरच्या सरकारी पक्षातील जे जे सन्माननीय सदस्य असतील, ज्यांना ज्यांना पुतना मावशीचे प्रेम येत असेल ते या महाराष्ट्रातील कास्तकारांचा अवमान करीत आहेत असे मी त्यांना नम्रपणे सांगू इच्छितो. महाराष्ट्रामध्ये "जनाची नाही तर मनाची... " अशी समजुतदार, सुजाण माणसांसाठी म्हण आहे. सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ. पंतगराव कदम यांना सांगू इच्छितो की, या सगळ्यांचा बोजा तुमच्या डोक्यावर आहे. हे सर्व निस्तरावयाचे असेल तर सक्षम सहकारमंत्री महाराष्ट्रात असेल तरच हे निस्तरले जाईल. "जनाची नाही तर मनाची....." अशी समजुतदार आणि सुशिक्षित माणसांकरिता म्हण आहे. ही चर्चा चालू असताना, 2 हजारच्या वर शेतकरी या महाराष्ट्रामध्ये गळफास लावून मरत आहेत, आत्महत्या करीत आहेत, कुटुंबे उद्ध्वस्त होत आहेत, त्यांच्या तीव्र भावना मांडत असताना थोडे शब्द उणेदुणे झाल्यानंतर आपल्याला जर एवढा क्रोध येत असेल, आपल्याला एवढी लाज वाटत असेल तर आपण ज्या पक्षामध्ये बसला आहात तो पक्ष सोडून जावे. आज महाराष्ट्रामध्ये याबाबत थोडी जाणीव ठेऊन आमदार पक्ष सोडून जाऊ इच्छित आहेत हे दाखवून द्यावे. सन्माननीय मंत्रिमहोदय श्री. छगन भुजबळ यांच्या व्यथा मी समजू शकतो. या महाराष्ट्रामध्ये मागच्या सरकारमध्ये माननीय मंत्रिमहोदय श्री. भुजबळ साहेब हे चांगले काम करीत होते.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते...)

कोकणामध्ये अशी एक म्हण आहे की, भूताला वश करायचे आणि काम नसेल तेव्हा समुद्राच्या लाटा मोजायला पाठवायचे.केन्द्रीय कृषी मंत्री माननीय श्री. शरद पवार हे नाशिकला जात असताना रस्त्यावर अडकून पडले होते. त्यामुळे माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री. छगन भुजबळ यांना हायवे बनवायला सांगितले. त्यांनी श्री. भुजबळसाहेबांना कामाला लावले. श्री. छगन भुजबळसाहेब हे शिवसेनेतील एक जबरदस्त शक्ती होती. त्यांना त्यांनी वश केले.

श्री. छगन भुजबळ : माननीय सदस्य मला बोलण्यासाठी का प्रवृत्त करीत आहेत ?

श्री. दिवाकर रावते : माननीय तालिका सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, श्री.रणजित देशमुख हे कॉग्रेसचे माजी अध्यक्ष असताना देखील त्यांनी माननीय पंतप्रधानाना फॅक्स पाठवून आणि पत्रकार परिषद घेऊन जाहीरपणे सांगितले की, विदर्भातील परिस्थितीला हे सरकार जबाबदार आहे. ते त्याच पक्षात आहेत. ते भारतीय जनता पक्षात आले का ? तर नाही. माझे मित्र माननीय सदस्य श्री. भास्करराव जाधव यांना मी सांगू इच्छितो की, शेतक-यां विषयीच्या भावना आपण जपल्या पहिजेत. शेतक-यांच्या आत्महत्या हा राजकीय विषय नाही. हा राजकीय विषय करुन त्यावर मला भाष्य करावयाचे नाही आणि आजपर्यन्त मी तसे कधी केलेले नाही. विदर्भामध्ये 32 लाख कापूस उत्पादक शेतकरी आहेत. कापसाच्या शेतीसाठी 4 हजार कोटी रु.खर्च येतो. या 4 हजार कोटी खर्चापैकी बँकाकडून फक्त 600 कोटी रु. कर्ज पुरवठा होतो. बँकांच्या नाकर्तेपणामुळे, बँका कर्जपुरवठा करण्यामध्ये अपयशी ठरल्यामुळे, प्रादेशिक परिस्थितीचा विचार डोळयासमोर न ठेवता, माणुसकी ठोकरुन लावणा-या अधिका-यांच्या उद्दाम वृत्तीमुळे आज शेतक-यांवर आत्महत्या करण्याची वेळ आलेली आहे. बँकांकडून कर्ज घेणा-या शेतक-यांची संख्या 2 लाख आहे. म्हणजे 32 लाख शेतक-यांपैकी फक्त 2 लाख शेतक-यांना बँकांकडून कर्ज मिळते. नवीन पीक कर्ज घेतलेल्या शेतक-यांची संख्या 34 हजार आहे. 32 लाख कापूस उत्पादक शेतक-यांना लागणा-या 4हजार कोटी रु.कर्जापैकी फक्त 600 कोटी रु.चे कर्ज बँका देतात. परिणामी 3400 कोटी रु. कर्जासाठी शेतक-याला सावकाराच्या दारात उभे रहावे लागते. या शासनातील विविध मंत्र्यांनी विविध पॅकेजच्या घोषणा करुन शेत-यांच्या तोंडाला कशी पाने पुसली तेही मी सांगणार आहे.

...यानंतर श्री. भोगले..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ MHM/ श्री.शिगमनंतर 16:30

श्री.दिवाकर रावते.....

34 हजार नवीन खातेदार आहेत. त्याचा परिणाम मी मागच्या भाषणात मांडला होता, तोच विषय आहे. ही अधिकृत सरकारी आकडेवारी आहे. मागचे कर्ज शिल्लक असल्यामुळे पुढे कर्ज मिळत नाही म्हणून 90 टक्के शेतकऱ्यांना दुर्दैवाने सावकारी पाशात अडकावे लागते. सावकारी पाशात अडकलेले शेतकरी सुटका करुन घेण्यासाठी आत्महत्येचा मार्ग स्वीकारतात. सरकार दरबारी राजा उदार होत नाही, नवीन कर्ज उपलब्ध होत नाही, कर्ज माफ होत नाही, अधिकाऱ्यांचा उद्दामपणा थांबत नाही यामुळे शेतकरी आत्महत्या करतात ही खरी कारणमिमांसा आहे. आपण याठिकाणी राजकीय बोलतो. आमदार असतो, भाषणामध्ये सांगितले ते योग्य असते आणि म्हणून नक्की शेतकऱ्यांचे काय होते हे पाहण्याकरीता महामहीम राज्यपाल श्री.एस.एम.कृष्णा यवतमाळला गेले. तेथील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्याकरीता त्यांना आमदार-खासदारांचे शिष्टमंडळ भेटले. राज्याचे मुख्यमंत्री त्याठिकाणी गेले, राज्यपाल महोदय गेले, पंतप्रधान आले. त्यांचे स्वागत आत्महत्येने होते. तुम्ही थोडातरी याचा विचार कराल का? राज्याचा पोशिंदा येतो, माझ्यासाठी येतो, मला दिलासा देण्याकरीता येतो, माझ्या कुटुंबाचे भवितव्य, शेतीचे भवितव्य घडविण्यासाठी येतो, मला उमेदीने उभे राहिले पाहिजे, थांबले पाहिजे, आशा ठेवली पाहिजे. परंतु तुमच्यावर शेतकऱ्यांचा विश्वास राहिलेला नाही. मुख्यमंत्री मेळाव्याला गेले. त्या 10 दिवसाच्या मेळाव्यामध्ये सामील व्हावयास गेले. सगळया शेतकऱ्यांच्या आत्महत्या या सभागृहात वाचून दाखविल्या. संपूर्ण विदर्भाचे शेतकरी अर्थसंकल्पीय अधिवेशन चालू असताना चातकासारखी वाट पहात होते. माझ्यासाठी काय होणार? त्या काळात 60 आत्महत्या झाल्या. सभागृहात रोज मी वाचून दाखविल्या. 60 शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्यानंतर शेवटी अधिवेशन संपण्यास 7 मिनिटे शिल्लक असताना माननीय मुख्यमंत्र्यांनी 6 टक्के व्याजाचे पॅकेज जाहीर केले. आम्ही विचारणा केली होती, किती देणार, कधी देणार? त्या पॅकेजवर चर्चा करता आली नाही. मी उभा राहिलो आणि स्वागत केले. परंतु अभिनंदन केले नाही. शेतकरी आत्महत्या का करतात? तुम्ही बोलला काय, मी बोललो काय, कोणी जाऊन पाहिले काय, तज्ञांना सांगावे लागते. म्हणून 18 ऑगस्ट, 2005 ला उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार टाटा इन्स्टिटस्ट्यूट ऑफ सोशल सायन्सेसकडून सत्यशोधन करण्यात आले. आत्महत्येबाबत त्यांनी शिफारशी काय केल्या? कापसाच्या किंमतीत वाढ करावी. सर्व शेतकऱ्यांना पीक कर्ज द्यावे. ग्रामीण व्यवस्थेत रोजगाराच्या संधी उपलब्ध कराव्यात.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सरकारने त्यावर काय कार्यवाही केली याचे आम्हाला उत्तर हवे आहे. त्यानंतर ऑक्टोबर, 2005 मध्ये केंद्रीय कृषि आयोगाचे अध्यक्ष डॉ.एम.एस.स्वामीनाथन यांनी दौरा केला. त्यांच्या दौऱ्यातून त्यांनी काय शिफारशी केल्या? पणनमंत्री याठिकाणी उपस्थित नाहीत. त्यांनी घोषणा केली की, केंद्र सरकार जो आधारभूत भाव देईल त्या भावाने आम्ही यावेळी कापूस खरेदी करु. सन्माननीय सदस्य सर्वश्री गणगणे, कवाडे, खतीब या ठिकाणी उपस्थित आहेत. ही सर्व मंडळी विदर्भातील आहेत. त्यांच्या मनामध्ये आहे, त्यांना वाटते की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाचविण्यासाठी दोन पैसे मिळाल्याशिवाय त्या वाचू शकत नाहीत. त्यादृष्टीने मी त्यांना बोलणार नाही. केंद्रीय कृषि आयोगाचे अध्यक्ष येतात, ते शिफारशी करतात. डॉ.स्वामीनाथन यांनी कापसाचा भाव 2500 रुपये प्रती क्विंटल करावा अशी शिफारस केली.

सभापती महोदय, आपल्याला माहिती आहे, युती शासनाने हा भाव 2500 रुपये दिला होता. तो एक वर्ष आघाडी सरकारने सुरु ठेवला आणि नंतर ती योजनाच बरखास्त केली. त्या योजनेच्या बरखास्तीवर अतिशय सुंदर विवेचन सन्माननीय सदस्य श्री.गडकरी करतात. मी त्यांना विनंती करतो, मी त्या खोलात जात नाही.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते .....

त्यांची दुसरी शिफारस अशी होती की, कापसाचे शुल्क 8 टक्क्यावरुन 7 टक्के करा. खरे म्हणजे शेतक-यांच्या गळयाला नख लावण्याचे काम केंद्रीय कृषी खात्याने केलेले आहे. मी या ठिकाणी वैयक्तिक आरोप करीत नाही परंतु त्या पदावर जो बसलेला असतो त्याच्याकडेच यासंदर्भातील जबाबदारी जात असते. आपण कापसाच्या आयात शुल्कावर मर्यादा घातली नाही परंतु आपण साखरेच्या आयातीवर जरुर निर्बंध घातलेले आहेत. कापसावरील आयातशुल्क 10 टक्के असल्यामुळे बाहेरचा कापूस येथे येतो त्यामुळे आपल्या कापूस पिकविणा-या कास्तकाराच्या कापसाला भाव मिळत नाही. केंद्रीय कृषी आयोगाचे अध्यक्ष यांनी जून 2006 मध्ये सर्व शेतक-यांना नवीन पीक कर्ज देण्यात यावे अशी शिफारस केली. नोव्हेंबर, 2005 मध्ये "यशदा" पुणे या संस्थेने शिफारस केली की, शेतक-यांच्या कापसाच्या हमीभावामध्ये वाढ करुन ग्रामीण भागातील बँकानी अधिक कर्ज द्यावे. मार्च, 2006 मध्ये केंद्रीय योजना आयोगाचे सल्लागार आदर्श मिश्रा यांच्या समितीने विदर्भाचा दौरा केला व त्यानुसार त्यांनी अशी शिफारस केली की, कापसाचा भाव तात्काळ 2500 रुपये द्यावेत व कापसावरील आयात शुल्क वाढविण्यात यावे तसेच कडधान्य लावण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन म्हणून अनुदान द्यावे अशी शिफारस करण्यात आली होती. चारही आयोगाने शेतक-यांच्या संदर्भातील केलेल्या शिफारशी पाहून आपणही काही तरी केले पाहिजे म्हणून महाराष्ट्र शासनाने गोखले इन्स्टीटयूट ऑफ पुणे यांच्याकडून सत्यशोधन केले. गोखले इन्स्टीटयूटने सांगितले की, कापसाला प्रती क्विंटल 3000 रुपये भाव द्यावा तसेच बँकांनी शेतक-यांना कर्जाचे पुनर्वसन त्वरीत करुन द्यावे. चारही आयोगाने शेतक-यांच्या संदर्भात ज्या काही शिफारशी केलेल्या आहेत त्या मी येथे सांगितलेल्या आहेत. शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात शासनाने नागपूरमध्ये एक पॅकेज जाहीर केले होते. ते पॅकेज जाहीर केल्यामुळे त्या पॅकेजची अंमलबजावणी व्हावी म्हणून विदर्भातील संपूर्ण ग्रामीण भागात संपर्क साधून पाठपुरावा केला. यासंदर्भात मी कोणत्याही प्रकारचा राजकीय अभिनिवेश आणलेला नाही. पॅकेजच्या संदर्भात सहकार आयुक्त, सहकार सचिव यांच्याशी चर्चा केली, यामध्ये ज्या काही त्रुटी होत्या त्या त्यांना सांगितल्या. विदर्भातील शेतक-यांना पीक कर्ज मिळावे म्हणून विदर्भातील प्रत्येक बँकेसमोर पीक कर्ज उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात आंदोलन केले. या आंदोलनामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते.....

शिवसैनिकांना सामावून घेतले, या आंदोलनामध्ये शिक्षित मंडळी होती, तज्ज्ञ मंडळी होती. या सर्व मंडळींना बरोबर घेऊन शेतक-यांना पीक कर्ज उपलब्ध होण्याच्या संदर्भात मी प्रयत्न केले. मागील अधिवेशन संपले तेव्हा माननीय मुख्यमंत्री महोदयांनी घोषणा केली होती की, शेतक-यांना आम्ही 6 टक्कयाने कर्ज देऊ परंतु यासंदर्भात आम्ही अशी स्लोगन तयार केले की,

"सरकार देते म्हणते
तुम्ही सहा टक्क्याने मागा
नाही दिले तर आम्हाला सांगा"
आमचा पत्ता.....

परंतु याचा परिणाम असा झाला की, बँकेतील अधिकारी वेळेवर यावयास लागले, जे अधिकारी उद्दामपणाने शेतक-यांशी वागत होते ते चांगल्या प्रकारे वागावयास लागले.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

पण खाते एवढे विस्कळीत का ? एका बॅकेमध्ये नो-डयुजसाठी 150 रुपये, 50 रुपये 25 रुपये घेत होते. मी त्या विभागाच्या सहसचिवांना धन्यवाद देतो. मी हा प्रश्न त्यांच्यापुढे मांडला आणि त्यांनी आम्हाला मदत केली. शेतकऱ्यांना कशाप्रकारे कर्ज मिळेल हे आम्ही पाहिले. आम्हाला शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवावयाच्या आहेत. त्यांच्या आत्महत्येचे राजकारण करुन त्यांच्या टाळूवरील लोणी खायचे नाही. शेतकऱ्यांना कर्ज नाकारणाऱ्या अधिकाऱ्यांना मी स्वत: भेटून विनंती करीत होतो. वेळ पडल्यास जिल्हाधिकाऱ्यांना भेटत होतो. निबंधकांना बोलावून समज देत होतो. सभापती महोदय, मी दौरा करीत असताना शेतकऱ्यांना त्यांचे म्हणणे लिहून ठेवण्यासाठी एक नोटबुक ठेवली होती. ती नोटबुक मी याठिकाणी आणलेली नाही. आपण ती नोटबुक वाचल्यास आपल्यालासुध्दा धक्का बसेल.अनेक शेतकऱ्यांनी बँकाच्या अधिकाऱ्यांनी त्यांना दिलेल्या वागणुकीबद्दल लिहिलेले आहे. मी ट्रेनमधून प्रवास करीत असताना मला एक 80 वर्षाचा शेतकरी भेटला. त्यावेळी मला सन्माननीय मंत्रिमहोदय डॉ.पंतगराव कदम यांचा फोन आला होता, त्यांना मी त्याची हकिकत सांगितली. डॉ.पंतगरावांना मी दोन-तीनदा भेटण्यास गेला होतो, परंतु त्यांची भेट झाली नाही, म्हणून त्यांनी मला फोन केला होता. त्या शेतकऱ्याने सांगितले की, त्याचे बँकेत पैसे आहेत परंतु बॅक त्याला त्याचे पैसे काढू देत नाही. त्या शेतकऱ्यावर बँकेचे सहा हजार रुपयांचे कर्ज होते. त्याचे म्हणणे होते की, बँकेचे कर्ज वजा करुन शिल्लक रक्कम त्याला देण्यात यावी. मी त्या बॅकेच्या अधिकाऱ्याला भेटलो त्याला ही सर्व परिस्थिती सांगितली. मी त्याला सांगितले की, एका तासाच्या आत त्याचे पैसे दिले पाहिजेत, नाहीतर एक तासानंतरचा मिनिट माझा असेल. त्या अधिकाऱ्याने अर्ध्यातासात शेतकऱ्याचे पैसे दिले. मी दौरा करीत असताना शासनाने काढलेले काही महत्वाचे जी.आर. घेऊन गेलो होतो. जर अधिकाऱ्याने सांगितले की, आम्हाला अजून अमूक अमूक जी.आर मिळाला नाही तर मी माझ्याकडील जी.आर.काढून त्यांना दाखवित होतो आणि शेतकऱ्यांना कशाप्रकारे लवकरात लवकर मदत मिळेल हे पाहत होतो.

सभापती महोदय, अकोला येथील एका बँकेने जाहीर केले होते की, आम्ही सहा टक्के दराने कर्ज देणार नाही. त्यावर आमचे कार्यकर्ते उसळले होते, मी त्यांना शांत केले. मी सहकार सचिवांशी फोनवर बोललो. अर्ध्यातासाने त्या बॅकेला नोटीस गेली आणि त्या बँकेने माघार घेतली. त्या बॅकेला माहीत होते त्यांनी जर माघार घेतली नसती तर त्यांचे बोर्ड बरखास्त झाले असते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याचे काम शिवसेनेने केलेले आहे. मी एका ठिकाणी उल्लेख केला की, वेळ पडल्यास हातात दगड घेण्याचे सामर्थ्य असलेला शिवसैनिक शेतकऱ्यांचे अश्रू पुसत होता.

यानंतर श्री.पुरी.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.विनोद तावडे)

श्री.दिवाकर रावते....

आपण एवढे सहकार्य करुनही शेतकऱ्यांना पैसा का मिळत नाही ? बँकेमध्ये काही ठिकाणी पैसे पोहचले नाहीत. सहकार खात्याच्या अंतर्गत ज्या सहकारी बँका आहेत त्या तरी आपण अवाक्यात आणू शकतो. राष्ट्रीयकृत बँकांचे सोडा. त्यांचा फार मोठा प्रश्न आहे. आमच्या मोरशी येथे दीड हजार शेतकरी जमले होते. त्याठिकाणी प्रचंड आंदोलन उभे केले होते. त्याठिकाणच्या बँकेच्या मॅनेजरने त्यांना सांगितले की, आम्ही आपणांस कर्ज देणार नाही. त्यावेळी दहा शेतकऱ्यांनी आत्मदहनाचा पवित्रा घेतला होता. त्यावेळी बँकेमध्ये कुठल्याही क्षणाला तोडफोड होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. त्यावेळी मी शेतकऱ्यांना आत्मदहन करण्यापासून थांबविले व त्यांना सांगितले की, आपल्या कर्जाचे नियोजन मी करतो व आपल्याला नक्की कर्ज मिळेल, असा त्यावेळी मी त्यांना धीर दिला. मी लागलीच जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलो व याबाबतीत त्यांच्याकडे तक्रार केली त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी ताबडतोब बँकेच्या मॅनेजरला व निबंधकाला बोलाविले. मंत्र्यांनी सभागृहामध्ये याबाबतीत घोषणा केल्यानंतर कर्ज थांबवता येत नाही. याबाबतीत याठिकाणी काही अधिका-यांविरुध्द हक्कभंग आणता येतो. ज्या अधिकाऱ्यांच्या बाबतीत तक्रारी आहेत त्या अधिकाऱ्यांच्या विरुध्द मी हक्कभंग आणणार आहे. या सदनामध्ये 6 टक्केप्रमाणे कर्ज मिळेल अशा प्रकारची घोषणा करण्यात आली होती. याबाबतीत आम्हाला आनंद वाटला. ज्यावेळी मी जिल्हाधिकाऱ्यांकडे गेलो त्यावेळी, संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत बँकेमार्फत शेतकऱ्यांना कर्ज देण्यात आले. अशा प्रकारे जर बँकेच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना सहकार्य केले तर शेतकरी अशा प्रकारचा आंदोलनाचा पवित्रा घेणार नाहीत. माननीय सहकार मंत्री महोदय, महाराष्ट्राच्या जनतेची आपल्यावर जबाबदारी आहे. आपण आपल्या प्रमोशनचे नंतर पहावे, आपण प्रथम महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे पहावे. महाराष्ट्रातील जनतेचे मरण कसे थांबेल ते आपण पाहिले पाहिजे व याबाबतीतील जबाबदारी दुर्दैवाने आपल्यावर आहे. सुदैवानेही मला याठिकाणी म्हणता येत नाही. आपण याठिकाणी घोषणा केली की, आम्ही शेतकऱ्यांना 6 टक्केप्रमाणे कर्ज देऊ. परंतु आपण आजपर्यंत किती शेतकऱ्यांना 6 टक्केप्रमाणे कर्ज दिले ? याठिकाणी प्रश्न होता की, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होऊ नयेत म्हणून कास्तकाराला 7/12 नुसार 25 हजार रुपये विनातारण म्हणून कर्ज द्यावयाचे. या माध्यमातून आपण किती जणांना कर्ज दिले ? आपण आपल्या

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

उत्तरामध्ये याबाबतचा उल्लेख केला तर फार बरे होईल. माननीय सहकार मंत्री महोदय, आपण हा विषय अतिशय गांभीर्याने घ्यावा. 25 हजार रुपये कर्ज देण्याच्या बाबतीत आमचे कार्यकर्त्ये 20 दिवस आंदोलन करीत होते. त्यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले की, आपण भू-विकास बँकेची एन.ओ.सी. आणावी. याबाबतीत ताबडतोबीने मी संबंधित विभागाच्या सचिवांना फोन केला व सांगितले की, आपण आजच हे निस्तारले नाही तर माननीय पंतप्रधानांच्या दौऱ्याच्यावेळी त्यांच्या समोर काही अप्रिय घटना घडू नये, म्हणून आपण याबाबतीत वेळीच दखल घ्यावी.

नंतर श्री.रोझेकर....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

विदर्भात भूविकास बँका आस्तित्वात आहेत काय ? मराठवाडयामध्ये नाबार्डअंतर्गत 4 टक्के व्याजाने भूविकास बँका कर्ज देत होत्या, भूविकास बँका या शेतक-यांचा श्वास होत्या. महाराष्ट्रामध्ये केवळ पश्चिम महाराष्ट्रामध्ये भूविकास बँका सुरु आहेत, बाकी सर्व ठिकाणच्या बँका बंद आहेत. 150 ते 160 कोटी रुपये भूविकास बँकांचे भरले तर या बँका पुन्हा चालू होतील. आपण या खात्याचे मंत्री म्हणून याचा अभ्यास का केला नाही ? आणि अभ्यास केला असेल तर त्या बँका चालू करा, अशी माझी मागणी आहे. शेतक-यांना कर्जमुक्त करा म्हणून शासन आदेश काढते, परंतु, या आदेशांची खालच्या स्तरावर पायमल्ली होते. म्हणून या चर्चेच्या माध्यमातून एक उत्तर आपल्याकडून मला निश्चित हवे आहे, माझी तशी अपेक्षा आहे कारण मी ही बाब आपल्या निदर्शनास आणली आहे. सरकारी माध्यमातून होणारी ही शेतक-यांची बनवाबनवी थांबविली गेली पाहिजे. पूर्वी पीक कर्ज किती द्यावयाचे यासाठी दीड लाख रुपयांची मर्यादा होती. आता ही मर्यादा 3 लाख रुपयांपर्यन्त वाढविली आहे. परंतु, यासाठी दीड लाखाचे जे कोष्टक पूर्वी तयार करुन ठेवले आहे हे कोष्टक 3 लाख रुपये मर्यादा झाल्यानंतर बदलण्याची आवश्यकता होती. हे कोष्टक तसेच ठेवल्यामुळे शेतक-यांना दीड लाख रुपयांपर्यन्तच कर्ज उपलब्ध होत आहे. अशा प्रकारे शेतक-यांची फसवाफसवी करुन आपण काय निर्माण करणार आहात ? ही बाब मी सहकार खात्याच्या सचिवांच्या आणि या खात्याच्या मंत्र्यांच्याही लक्षात आणून दिली आहे. सचिवांनी मला असे उत्तर दिले की, ही बाब कृषि खात्याच्या अखत्यारित येते. मला असे विचारावयाचे आहे की, कृषि खात्याच्या सचिवांनी इनिशिएटिव्ह घेऊन हे कोष्टक बदलले असते तर त्यांना कोणी अडविले होते ? ही जी तांत्रिक चूक राहिली आहे ती दुरुस्त करण्याची गरज होती किंवा नाही ? त्या ठिकाणी शेतकरी आत्महत्या करीत आहेत, उद्ध्वस्त होत आहेत आणि या ठिकाणी हे आमच्या विभागाचे काम नाही, दुस-या विभागाचे काम आहे, अशा प्रकारची उत्तरे आय.ए.एस.दर्जाच्या अधिका-यांकडून मिळत आहेत. शेतक-यांवर संकट कोसळल्यानंतर माननीय राज्यपाल धावून जातात, देशाचे पंतप्रधान विदर्भात येतात, अशा प्रकारे राष्ट्रीय प्रश्न झाल्यानंतरसुध्दा सचिवांच्या अकलेची लक्तरे वेशीवर टांगली जात असतील तर या आय.ए.एस.अधिका-यांचे करायचे काय ? हे सर्व पाहिल्यानंतर सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.नितीन गडकरी हे नेहमी त्यांच्या भाषणात आय.ए.एस.अधिका-यांबद्दल ज्या भावना व्यक्त करतात, त्या योग्य आहेत, असे वाटल्यावाचून रहात

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

नाही. राज्यकर्त्यांना जाणीव नाही, अधिका-यांना काही देणे-घेणे नाही, खालपर्यन्त पोहोचले पाहिजे अशी अपेक्षा असतांना तेथील अधिका-यांना जाण नाही आणि मग अशा परिस्थितीत आत्महत्या होतील नाही तर काय घडेल ? आजही आत्महत्या चालूच आहेत. माझ्याकडे आत्महत्येची आकडेवारी आहे. सन 2001 मध्ये यांचे सरकार आल्यापासून सन 2001 मध्ये 50, सन 2002 मध्ये 122, सन 2003 मध्ये 170, सन 2004 मध्ये कापुस एकाधिकार खरेदी योजना बंद केल्यापासून 620, सन 2005 मध्ये 572 व सन 2006 मध्ये 745 आत्महत्या झाल्या आहेत. जिल्हास्तरीय आत्महत्यांची आकडेवारी देखील माझ्याकडे उपलब्ध आहे, परंतु, ती सर्व या ठिकाणी वाचून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही. सन 2006 च्या जानेवारीपासून झालेल्या आत्महत्येची आकडेवारी मात्र मी या ठिकाणी सांगणार आहे. सन 2006 च्या जानेवारी महिन्यात 68, फेब्रुवारी महिन्यात 54, मार्च महिन्यात 77, एप्रिल महिन्यात 65, मे महिन्यात 62, जून महिन्यात 57 अशा एकूण 382 शेतक-यांनी आत्महत्या गेल्या सहा महिन्यात केल्या आहेत. किती वाईट वाटते सरकारी आकडे ऐकून. सरकारी आकडे येतात, अधिकारी सांगतात. परंतु, त्या खात्याचे मंत्री म्हणून राज्यकर्ते म्हणून आपल्याही काही जाणीवा आहेत, बांधिलकी आहे, उत्तर देण्याचे आपल्यावर बंधन आहे, जी जनता निवडून देते त्यांच्याशी काही नाते आहे, हे लक्षात घेऊन अधिकारी काय सांगतात हे तुम्ही जाणून घ्यावयास पाहिजे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

अधिकारी चुकत असतील तर त्यांचा कान पकडावयास पाहिजे. परंतु तुम्ही तसे केले नाही. सन 2001 मध्ये एकूण 289 शेतक-यांनी आत्महत्या केल्या. आत्महत्या केलेल्यांपैकी 1121 शेतकरी शासकीय मदतीस पात्र आहेत. अनेक वेळा महसूल मंत्री आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटुंबियांना भेटण्यास येतात. अनेक शेतकरी दारु पिऊन मरण पावल्याचे महसूल मंत्री सांगत असतात. शेतक-यांना मदत देऊ नका परंतु त्यांची बदनामी तरी करु नका. 1032 आत्महत्या वैयक्तीक कारणामुळे झालेल्या आहेत असे सांगत्यात आले. यापैकी आता पर्यंत चौकशीची 132 प्रकरणे प्रलंबित आहेत. कोर्टामध्ये असलेले एक प्रकरण सभागृहामध्ये उपस्थित करण्यात आले होते. ते प्रकरण मी पुन्हा मांडतो. सरकारच्या अकलेचे दिवाळे निघाले आहे. श्री.हिरामण पाटील याने त्याची बायको मेली म्हणून आत्महत्या केली असे पंचनाम्यामध्ये लिहिण्यात आले होते. परंतु ते कारण सत्य नव्हते. कारण त्याची बायको 16 वर्षापूर्वी मेली होती. हे कोर्टाच्या रेकॉर्डवर आहे. परंतु बायको मेली म्हणून त्याने आत्महत्या केली असे सरकारने सांगितले. दुसरे उदाहरण असे आहे की, एका 70 वर्षाच्या वयोवृद्ध माणसाने आत्महत्या केली होती. या केसच्या बाबतीत त्या वयोवृद्ध माणसाचे शेजारच्या 60 वर्षे वयाच्या बाईवर प्रेम होते, असे कोर्टामध्ये सांगण्यात आले, म्हणून सरकारच्या अकलेचे दिवाळे निघाले हा शब्द मी वापरला. माननीय श्री.पतंगराव कदम साहेबांना मी सांगू इच्छितो की, हे तुम्ही केलेले कर्म नाही. हे अधिका-यांनी केलेले पाप आहे. सरकार तुम्ही चालवित आहात. तुम्हाला जनतेला उत्तर द्यावयाचे आहे. तुम्ही याबाबतीत उत्तरदायी आहात. सभापती महोदय, मी अशी अनेक प्रकरणे सांगू शकतो. 1032 शेतक-यांच्या आत्महत्या व्यक्तीगत झालेल्या आहेत. शारीरिक व्याधीमुळे, व्यसनामुळे, घरगुती भांडणांमुळे आत्महत्या झालेल्या आहेत. घरामध्ये सर्व व्यवस्थित असेल तर आत्महत्या होणार नाहीत. माणूस व्यसनाधीन का होतो ? शासकीय मदतीस पात्र असणा-या 1121 शेतक-यांना आता पर्यंत 10 कोटी रुपये देण्यात आले.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेब तुमच्या भाषणास अर्धा तास झालेला आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा विषय गंभीर आहे. आपण थोडा वेळ मला बोलू द्यावे. फिल्डवर काम करीत असतांना आम्ही शेतक-यांच्या व्यथा बघितलेल्या आहेत त्या आम्ही येथे

...2/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .....

मांडत आहोत. याचा घटनाक्रम फार महत्वाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.सुधाकर गणगणे साहेब इतर मागासवर्गीयांसाठी काम करतात. त्यांना मी सांगू इच्छितो की, विदर्भातील शेतक-यांच्या अडचणी थोडया फार प्रमाणामध्ये दूर केल्या तर फार चांगले होईल. सरकारची किती लाज जावी यासाठी मर्यादा आहे. टी.व्ही. वर एक जाहीरात येते. एक माणूस आधी टोपी काढतो, नंतर जॅकेट काढतो, त्यानंतर त्याला कळते की खालचे कपडे काढले तर वांदे होतील. अशी परिस्थिती सरकारची झालेली आहे. मी टी.व्ही. वरील जाहीरात सांगितली. शेतक-यांच्या वाढत्या आत्महत्या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंड पीठापुढे विदर्भातील जनआंदोलन समितीचे श्री.किशोर तिवारी यांची जनहित याचिका सादर केली.

यानंतर श्री.सुंबरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते ....

त्यानंतर 23.2.2006 रोजी त्यावर कोर्टाने राज्याच्या मुख्य सचिवांना व इतर अधिकाऱ्यांना चार आठवड्यामध्ये त्यांची बाजू मांडण्यासाठी आदेश दिले. पण न्यायालयाच्या आदेशानंतर देखील आपल्या अधिकाऱ्यांनी उत्तर सादर केले नाही. खरे तर 3 लाख रूपये देण्याचे जे जाहीर केले होते त्यानंतर सचिवांनी ती यादी बदलावयास पाहिजे होती ती बदलली नाही. आपले अधिकारी बेदरकारपणे वागले. कारण मला माझा पगार बरोबर महिन्याला मिळतो आहे, शिवाय शासनाचे नोकर चाकरही दिमतीला मिळताहेत मग मला कसलीही फिकीर करण्याचे कारण नाही, माझे सारे काही मस्त चालले आहे. न्यायालयाने आदेश दिल असले तरी मला त्याची काहीही पर्वा नाही अशा वृत्तीने हे अधिकारी वागत असतील तर ते फार गंभीर आहे. राज्यातील गरीब शेतकरी उद्ध्वस्त होत असताना, हजारो कुटुंबे उध्वस्त होत असताना शासनाचे अधिकारी असे वागत असतील तर तुम्ही सरकारमध्ये बसलेले त्याबद्दल काय करणार आहात ? एकीकडे तुम्ही ढोपरे-कोपरे फोडण्याची भाषा करता पण प्रत्यक्षात ते आपल्याला उतरविता येत नाही. गुटखाबंदी करण्याची भाषा करता येत पण ती प्रत्यक्षात उतरविता येत नाही. बारबालांना बंद करण्याची घोषणा करता येते पण ती प्रत्यक्षात आपल्याला उतरविता येत नाही. थोडक्यात आपण घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे सामर्थ्य तुमच्यामध्ये राहिलेले नाही. त्यामुळे तुम्ही नुसत्या घोषणाच करता आहात. सभापती महोदय, मुलींची छेडछाड करण्याऱ्यांवर कडक कारवाई करण्याचा कायदा आहे किंवा नाही, नसेल तर तो कायदा केला पाहिजे हे ठीक आहे. पण आमच्या गृहमंत्र्यांना काय झाले आहे तेच कळत नाही. आताही येथे माननीय विरोधी पक्षनेते त्यांना 'आबासाहेब, आबासाहेब' असे म्हणत होते. पण त्यानेही त्यांच्यात काही फरक वाटला नाही. आता मुलींच्या छेडछाडच्या विरोधात कायदा नसेल तर किमान त्यांनी गप्प तरी बसायला पाहिजे होते, त्यावर काही भाष्य तरी करायला नको होते. पण ते जाहीर करतात की, तसा कायदा अजून केलेला नाही. सरकारचा निर्बुद्धपणाच यातून दिसून येतो आहे. आता आपल्या अधिकाऱ्यांनी न्यायालयाने आदेश देऊनही न्यायालयात उत्तर सादर केलेले नाही. 14.6.2006 ला कोर्टाने सुनावणीच्या दरम्यान राज्याच्या मुख्य सचिवांसहीत 12 अधिकाऱ्यांना उत्तर सादर न केल्याबद्दल प्रत्येकी 1 हजार रूपये दंड ठोठावला आणि दोन आठवड्यामध्ये तो दंड भरण्याचा आदेश दिला. सरकारला याचे काहीच वाटत नाही का ? कोर्टाने आपल्या 12 अधिकाऱ्यांना दंड ठोठावला आहे तेव्हा माननीय मुख्यमंत्र्यांनी, माननीय उपमुख्य

..... एचएच 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रावते .....

मंत्र्यांनी किमान त्याबद्दल त्या अधिकाऱ्यांना नोटीस तरी द्यायला पाहिजे होती की, असे का झाले याचा खुलासा करा म्हणून. पण तसे काहीही केल्याचे आमच्या तरी ऐकिवात नाही. कोर्टाने एवढा दंड ठोठावल्यामुळे घाबरलेल्या राज्याच्या मुख्य सचिव व पोलीस महासंचालकांसह या 12 सनदी अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या प्रकरणामध्ये निष्काळजीपणे अक्षम्य दुर्लक्ष केल्याबद्दलची कबुली दिली आणि त्याबद्दल कोर्टाची बिनशर्त माफी मागून दंड माफ करण्याची विनंती कोर्टाला केली. एवढे नादान अधिकारी या राज्याला मिळालेले आहेत. सिंधुदुर्ग जिल्हयात कोठल्या त्या एसपी श्री. प्रसाद ला तुम्हाला हलवायला होत नाही. परंतु आपल्या पक्षाच्या आमदाराने त्यांच्यावर अवैध सावकारी केल्याबद्दल एसपीकडून कारवाई होत असल्याची तक्रार केल्याबरोबर त्या एसपी ची बदली केली जाते. म्हणजे सिंधुदुर्गातील त्या प्रसन्नाला कोठलाही कायदा नव्हता. असे हे राज्य आणि हे राज्यकर्ते आणि त्यांनी प्रशासनावर असलेली ही पकड. मग येथील जनतेने, शेतकऱ्यांनी कोणत्या आधारावर जगायचे ? कोणत्या आधारावर थांबावयाचे ? अधिकारी आपले ऐकत नाहीत, आपल्याला जुमानत नाहीत. आता सगळ्याच अधिकाऱ्यांचा 'खोत' होणार आहे काय हा प्रश्न आहे. परंतु शेवटी ते करावेच लागेल. मग संतप्त शेतकरी उद्या तुमच्या मंत्रालयापर्यंत आला आणि तुमच्या अशा या अधिकाऱ्यांना उचलून खाली टाकून दिले तर तुम्ही त्याबद्दल राग मानू नका. ही परिस्थिती तुमच्या अधिकाऱ्यांनीच आणली आहे आणि त्याचे उत्तरदायित्व तुमचे आहे. तुम्हाला यातून हात झ टकून बाजूला होता येणार नाही. सभापती महोदय, हे सर्व सांगत असताना सावकारी पाशाचे आपण काय करणार आहात याचे उत्तर मिळालेले नाही. तुम्ही एवढे हतबल आहात का ? तुम्हाला तुमचे अधिकारी काही सांगत नाहीत का ? सभापती महोदय, मध्यंतरी माजी सभापती माननीय श्री. भारदे यांचा सत्कार झाला. त्यांच्या भाषणांच्या पुस्तकाच्या प्रकाशनाचे निमित्त होते. सहकारावर अतिशय सुंदर अशी त्यांची भाषणे आहेत. त्यांनी 1952 साली हा विषय येथे मांडला होता. सरकारने त्यावेळी जे कायदे केलेले आहेत त्या कायद्याबद्दल त्यांनी आपल्या भाषणात उल्लेख केला आहे. ....

(यानंतर श्री. सरफरे .... आयआय 1 ..

अशुद्धीत पत्र / शीघ्रलेखापाठी नोंद

श्री. दिवाकर रावते...

या सरकारला घटनेने किती अधिकार दिले आहेत? कंकरन्स लिस्टप्रमाणे आणि घटनेतील लिस्ट 2 प्रमाणे राज्य सरकारला कायदा करण्याचा अधिकार आहे. माननीय बाबासाहेब आंबेडकर यांची घटना वाचीत असतांना त्यांनी लहान लहान गोष्टींची काळजी घेतली यावरुन ते किती महान होते हे समजते. "Money lending and Money lenders. - Relief of Agricultural Indebtness." शेतकऱ्यांची कर्जामधून सुटका करण्यासाठी सावकारावर बंधन आणणारा कायदा करण्याचा राज्य सरकारला अधिकार आहे. या घटनेतील तरतुदीप्रमाणे प्रत्येक शेतकऱ्याला सावकारीतून मुक्त होण्याचा अधिकार राज्य सरकारला प्राप्त झाला आहे. शेतकरी अगतिक झाल्यावर तो सावकाराकडे जातो, सावकाराकडून कर्ज घेतो, कर्जाची परतफेड करतो. या व्यवहाराबाबत त्याची हरकत नाही. परंतु अशी एक वेळ येते ज्यावेळी तो उध्वस्त होतो त्यावेळी या कायद्याचा वापर केला पाहिजे. तुमच्या हातामध्ये घटनेने अधिकार दिले आहेत. ज्यावेळी जुना कायदा करण्यात आला त्यावेळी सावकारांमध्ये आणि शेतकऱ्यांमध्ये प्रामाणिकपणा होता. त्यावेळी सर्व व्यवहार बोलीवर व्हायचे, लिखापढीवर नसायचे. आता पिढी बदलली आहे. तेव्हा आपण हा कायदा आता दुरुस्त करणार आहात की नाही? येणाऱ्या अधिवेशनामध्ये या कायद्याला दुरुस्ती आणणार आहात की नाही हा माझा प्रश्न आहे? यासंबंधी आपण आपल्या उत्तराच्या भाषणामध्ये खुलासा करावा.

सभापती महोदय, या राज्याची किती नाचक्की होत आहे? ही नाचक्की सभागृहामध्ये मांडताना मला वाईट वाटत आहे. या राज्याची नाचक्की आता केंद्रापर्यंत गेली आहे. गेली आठ वर्षे या सरकारबाबत कुणी काहीही करु शकत नाही. माननीय पंतप्रधान या राज्यामध्ये आले. त्यावेळी शेतकऱ्याला वाटले की, आम्हाला आता काही तरी मिळेल. केवढी आशा आणि केवढा माहोल होता. माननीय पंतप्रधानानी आमच्याकडे काकुळतीने बघितले. विदर्भातील शेतकऱ्यांसाठी पॅकेज जाहीर केल्यामुळे त्यांच्यामध्ये श्वास निर्माण झाला. त्या दिवशी दूरदर्शनवरील मुलाखतीमध्ये बोलतांना मला वाईट वाटले. कॉग्रेस पक्षाच्या माननीय अध्यक्षा मला म्हणाल्या की, तुम्ही अभ्यास केला नसेल. मी म्हणालो की, मला दोन दिवसात जेवढे कळले तेवढे बोललो. त्यावर निवेदकाने सांगितले की, विरोधकांचे म्हणणे असे आहे की, तुमची बुध्दीची पातळी कुठे येऊन स्थिरावली आहे याचा गांभीर्याने विचार करा. त्यांना मी म्हटले की, माझा काही संबंध नाही. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी प्रतिक्रिया देतांना असे म्हटले की, डोगर पोखरुन उंदीर काढला. त्यांना वाटले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

की, डोंगर पोखरुन उंदीर काढला असे विरोधक म्हणत आहेत. त्यावर त्यांनी काय उत्तर द्यावे? त्यांनी पॅकेजबाबत जस्टिफाय केले असते तर मी समजलो असतो. त्यांनी आमच्या युती सरकारला झुरळ म्हटले. दूरदर्शनवर एका राष्ट्रीय पक्षाच्या प्रदेश अध्यक्षांना महाराष्ट्रातील हजारो जनता पहात आहे.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते (पुढे सुरु...

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांकडे पहाण्याचा दृष्टीकोन सरकारचा आणि सरकारी पक्षातील पदाधिकाऱ्यांचा वेगळा आहे. त्यांच्या वयाचा विचार करता, त्यांच्याबद्दल मला आदर आहे. डोंगर पोखरुन उंदीर काढणे ही म्हण आहे. आमच्या सरकारमधील उंदीर असेल तर युतीच्या काळातील झुरळ आहे, असे त्या म्हणाल्या. त्यावर मी असे म्हणू शकेन की, त्यांनी झुरळाची उपमा दिली. पण झुरळ कोठे असतात ? गटारात पाहिले तर झुरळ दिसतील. मी त्यावर काही बोललो नाही.

सभापती महोदय, पंतप्रधानांनी 3,750 कोटीचे पॅकेज जाहीर केले. 720 कोटीचे व्याज मुक्त केलेले आहे. बँकांचे सबलीकरण करण्याची योजना आहे. बुडालेल्या बँका कशा वर येतील हे पाहिलेले आहे. एन.पी.अे झालेल्या बँका परत एकदा व्यवस्थित मार्गावर आता आलेल्या आहेत. सिंचन योजनेसाठी 275 कोटी रुपयाची घोषणा केली. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी निदर्शनास आणून देतो की, त्यांची या विषयावर बोलावे. राज्यपालांच्या आदेशानंतर सरकारने 40 हजार कोटीचा विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष भरण्यासाठी यापूर्वी 4 हजार कोटी रुपये अबंटित केले होते. या घोषित केलेल्या निधीमधील पैशाचा पुनरुच्चार आहे, नवीन काही दिलेले नाही. बुलढाण्याचे पालक मंत्री रोज दूरदर्शनवरुन सांगतात की, आता सिंचनाचा अनुशेष कमी होईल. या 275 कोटी रुपयामधील 1 हजार 75 कोटी रुपये महाराष्ट्राच्या पॅकेजमधील आहेत. नंतर महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात तो निधी देण्यात आला होता. 100 कोटी रुपये कोठे जाणार आहेत ? हा प्रश्न आहे. खरोखर तुम्ही काय केले ? विकासासाठी 240 कोटी रुपयाची तरतूद केल्याची धोषणा केली. परंतु अर्थसंकल्पात ती तरतूद घोषित केलेली आहे. त्यानंतर बी-बियाणे कार्यक्रमासाठी 180 कोटीची घोषणा केली परंतु शेतकऱ्यांना प्रती हेक्टर 1 हजार रुपये ज्वारीच्या पेरणीसाठी देण्याच्या मूळ निर्णयाला बदलवून बी.टी.कॉटनचे सीड वाटण्यासाठी श्री.शरद पवारांनी राखून ठेवलेला निधी आहे. त्यामध्ये नवी काही नाही. फलोत्पादनासाठी 225 कोटीची घोषणा केली. त्यातील एकही पैसा कोणाला मिळाला नाही. पंतप्रधानांनी 1 जुलैला 3 हजार 750 कोटी रुपयाची घोषणा केली त्या संदर्भात शेतकऱ्यांची प्रतिक्रिया आली. श्रीकांत रंगराव काळबांडे, रा.निंबोरा (लाहे) जि. अमरावती...

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य आणखी किती वेळ बोलणार आहेत, याची कल्पना नाही. त्याबाबतीत बोलण्याचा हा माझा विषय नाही. मी त्यांना एवढीच

श्री.गुरुनाथ कुलकर्णी (पुढे सुरु....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आठवण करुन देतो की,हे काही विधेयक नाही, की त्यावर इतका वेळ बोलावे. ही अडीच तासाची चर्चा आहे. इतर सन्माननीय सदस्यांनाही यावर बोलायचे आहे.

श्री.दिवाकर रावते : मी सुरुवातीला बोललो, त्याबाबत वाईट वाटले. शेतकऱ्यांच्या आत्महत्याची परिस्थिती इतकी गंभीर आहे की, सरकारची यामध्ये अब्रू जात असतांना सत्ताधारी पक्षातील सदस्य मोडता घालतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्याबाबतीत बोलावे अशी विनंती करतो.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांनी मांडलेला विषय मर्यादित नाही तो संपूर्ण सभागृहाचा विषय आहे.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, श्री. विठोबा माधव हेमणे, रा. महालगाव (सुकळी), जिल्हा चंद्रपूर तसेच श्री. नारायण पोहरे, रा. उरळ या शेतकऱ्यांनी माननीय पंतप्रधान आल्यानंतर दोन दिवसात आत्महत्या केल्या. याचा विचार तुम्हा आम्हा सर्वांना करावयाचा आहे. आम्हाला कोणताही आधार नाही असे शेतकऱ्यांना वाटते. तुमच्या चारही आयोगांनी सांगितले की, कापसाला 2500 ते 3000 रुपये भाव द्या. त्यावर पहिला इलाज म्हणजे कापूस एकाधिकार योजना जशी होती तशी पुन्हा पुनरुज्जीवित करा. त्यांना किमान 2500 रुपये भाव द्या. तुमच्या स्वतःच्या कमिटीने, गोखले इन्स्टिटयूट ऑफ पुणे यांनी कापसाला 3000 रुपये भाव द्यावा असे म्हटले आहे. आपण यासंदर्भाने पूर्ण कर्ज माफ करण्याचा निर्णय केला पाहिजे. 1200 कोटी रुपयांचे कर्ज आहे. पूर्ण कर्ज माफ केले असते तर शेतकरी मोकळे झाले असते. कापसाला 2500 ते 3000 रुपये भाव द्यावा. माननीय पंतप्रधान आल्यानंतर विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी खूप पैसे मिळतील असे वाटले होते. त्यांनी जे दिलेले आहे ते पुरेसे नाही. विदर्भातील सिंचन प्रकल्पांची ससेहोलपट थांबवावी. त्यांना निधी उपलब्ध करुन द्यावा. शेतकऱ्यांच्या मुलाला 1 लाख रुपये देण्यापेक्षा शासकीय सेवेमध्ये नोकरी द्यावी. 1 लाख रुपये देताना कर्ज कापून घेतले जाते अशी ओरड चालू आहे. खाजगी सावकारीचे उच्चाटन करण्याचे माननीय श्री. आर. आर. पाटील यांनी ठरविले आहे. ढोपरापासून कोपरापर्यंत असे मी म्हणणार नाही. कंकरंट लिस्टमध्ये जे विषय आहेत त्याबाबतीत कायदा करण्याचा तुम्हाला अधिकार आहे. आपण जुना कायदा दुरुस्त करावा आणि या अधिवेशनात कायदा आणावा. राष्ट्रीयकृत बँका आणि जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून 6 टक्के एवढ्या कमी व्याजाने तातडीने कर्ज उपलब्ध करुन द्यावे. 25 हजार रुपयांचे कर्ज प्रत्येकाला विनातारण मिळेल अशा प्रकारची दवंडी सरकारमार्फत पिटावी आणि त्यांना कर्ज द्यावे. बियाणांसाठी सबसिडी देण्याची व्यवस्था करावी. छोट्या छोट्या उद्योगांना जे देण्याचे आपण ठरविले आहे ते करावे. सभापती महोदय, आमच्या टीकेची खिल्ली माननीय मुख्यमंत्र्यांनी उडवली. त्याचे वाईट वाटले नाही. त्यांनी सांगितले की, माननीय पंतप्रधानांनी जे पॅकेज दिले आहे ते विरोधकांना दिलेले नाही. माननीय मुख्यमंत्री एवढे सत्य कधी पासून बोलावयास लागले ? हे समजलेले नाही. त्यांचे म्हणणे बरोबर आहे. हे पॅकेज शेतकऱ्यांनाच दिले आहे. विरोधक आपले काम करीत आहेत. ते पॅकेज

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. दिवाकर रावते .....

तुमच्या सरकारला सुध्दा दिलेले नाही. माननीय पंतप्रधानांनी या सरकारवर अविश्वास दाखवून त्याचे पूर्ण नियंत्रण स्वत:कडे ठेवलेले आहे आणि या सरकारने ताबडतोब राजीनामा द्यावा अशा प्रकारचे संकेत दिलेले आहेत याची नोंद घ्यावी. विरोधकांची खिल्ली उडवत असताना आपल्या सरकारवरचा विश्वास उडाला याची नोंद घ्यावी. माननीय पंतप्रधानांनी सौम्य भाषेत हे सर्व नियंत्रण आपल्याकडे घेतले आणि असे सांगितले की, याबाबतचे नियंत्रण महाराष्ट्रातील केंद्रीय मंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण करणार आहेत. याची नोंद आपण घ्यावी आणि आता तरी शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आपली जागा रिकामी केली तर महाराष्ट्रामध्ये "जनाची नाही तर मनाची तरी राहिली" असे वाटेल. सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देऊन मी माझे दोन शब्द संपवितो.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP/

श्री. गुरुनाथ कुलकर्णी (नामनियुक्त) : सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य माननीय विरोधी पक्ष नेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनी नियम 289 अंतर्गत या ठिकाणी प्रामुख्याने विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यांच्या संदर्भात जो ठराव या ठिकाणी चर्चेला आणलेला आहे त्या ठरावाचे मी समर्थन करतो. सभापती महोदय, विदर्भातील शेतकऱ्यांच्या आणि प्रामुख्याने विदर्भातील 6 जिल्ह्यामधील शेतकऱ्यांच्या ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्या लोकशाही आघाडीचे सरकार आले आणि त्यानंतर या आत्महत्या होत आहेत असे काही नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांचे मी स्वागत करतो.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी..)

ते जे बोलले त्याचे मी समर्थन करतो. हा राजकीय विषय नाही, हा कोणत्या एका पक्षाच्या विषय नाही किंवा पक्षाभिनिवेषाने विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षावर कुरघोडी करण्यासारखा विषय नाही. गेल्या 10-15 वर्षापासून विदर्भातील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. या आत्महत्यांच्या पाठिमागे काही कारणे आहेत. ज्यावेळी 1995 ते 1999 या कालखंडामध्ये युतीचे सरकार सत्तेवर होते त्यावेळी सुध्दा शेतक-यांच्या आत्महत्या होत होत्या. 1999 ते 2004 पर्यन्त लोकशाही आघाडीचे सरकार सत्तेवर असताना शेतक-यांच्या आत्महत्या होत होत्या आणि त्यानंतर 2004 पासून ते आजपर्यन्त शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, विदर्भातील शेतक-यांची दयनीय अवस्था पाहून त्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी माननीय पंतप्रधानांनी विदर्भाचा दौरा केला. हा दौरा होत असतानाही शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या असून ती वस्तुस्थिती नाकारता येत नाही. हा एक राजकीय विषय या सभागृहामध्ये मांडून त्यावर आपण चर्चा करीत आहोत असे कोणी कृपा करुन समजू नये. या गंभीर प्रश्नावर कोणती उपाययोजना करावयाची हा खरा प्रश्न आहे. माननीय सदस्य श्री. भास्कर जाधव हे नव्याने निवडून आलेले असल्यामुळे त्यांचा या सदनातील पहिलाच दिवस आहे. त्यांनी पॉईण्ट ऑफ इन्फर्मेशन म्हणून अशी विचारणा केली होती की, आपण संपूर्ण महाराष्ट्रामध्ये शेतक-यांनी केलेल्या आत्महत्यांच्या संदर्भात चर्चा करीत आहोत की, केवळ विदर्भातील ज्या 6 जिल्ह्यांमध्ये शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत आणि ज्या 6 जिल्हयांसाठी शासनाने पॅकेज जाहीर केलेले आहे त्यापुरतीच चर्चा करीत आहोत ? राज्य शासनाने विदर्भातील 6 जिल्हयांसाठी जे पॅकेज जाहीर केलेले आहे त्या व्यतिरिक्त 3750 कोटी रु.चे अतिरिक्त पॅकेज माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेले असून त्यासंदर्भात आपण या सभागृहामध्ये चर्चा करीत आहोत. शेतक-यांच्या आत्महत्येच्या प्रश्नावर नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्येही गांभीर्याने चर्चा करण्यात येऊन राज्य शासनाने काही उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला. 1075 कोटी रु.पॅकेज राज्य शासनाने जाहीर केले. आता माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी आपल्या भाषणामध्ये जे काही आक्षेप आणि आरोप केले ते अनाकलनीय आणि न समजणारे आहेत. राज्य शासनाने 1075 कोटीचे पॅकेज जाहीर केले. कापूस उत्पादक शेतक-यांचे जे 3 टक्के पैसे जमा करुन ठेवले होते ते पैसे परत देण्यात आले. काही शेतक-यांना हे पैसे मिळाले तर काही शेतक-यांना ते मिळाले नाहीत असे माननीय सदस्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. गुरुनाथ कुलकर्णी...

सांगितले. मी सांगू इच्छितो की, माननीय सदस्यांनी ज्या व्यथा आणि वेदना या ठिकाणी मांडल्या त्याच व्यथा आणि वेदना आमच्या देखील आहेत. म्हणून हा राजकीय प्रश्न नसून या प्रश्नावर तुम्हा-आम्हाला ठोस असा तोडगा काढावयाचा आहे. 1075 कोटीचे पॅकेज नागपूरच्या हिवाळी अधिवेशनामध्ये जाहीर झाले. शेतक-यांना 6 टक्के व्याजाने कर्ज देण्याबाबतही चर्चा झाली. त्याप्रमाणे शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज उपलब्ध होते की नाही हे पहाण्याची जबाबदारी या सभागृहाची आणि शासनाची आहे. शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात माननीय पंतप्रधानांनी विदर्भाचा दौरा केला.

..नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

आणि त्यापूर्वी दोन दिवस कोणीतरी अधिकारी, ज्याच्या घरात आत्महत्या झालेली आहे, ज्यांना पैसा द्यायचा आहे, नुकसानभरपाई द्यायची आहे, तोपर्यंत ती मदत द्यायला त्यांना वेळ मिळत नाही परंतु पंतप्रधान येण्यापूर्वी दोन दिवस अगोदर जाऊन हा घ्या तुमचा चेक, एखाद्या भिकाऱ्याला भीक द्यावी तशा प्रकारचे चित्र दुर्दैवाने महाराष्ट्रामध्ये तुम्हा-आम्हा सर्वांना पहावयास मिळाले. पंतप्रधान आल्यानंतर ही सर्व यंत्रणा मोठया प्रमाणात कामाला लागली. हीच यंत्रणा यापूर्वी का कामाला लागली नाही याचे उत्तर राज्य शासनाच्या माध्यमातून माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी दिले पाहिजे.

सभापती महोदय, आज 1075 कोटी रुपयांच्या पॅकेजच्या संदर्भात शासनाने जे निर्णय घेतले त्याची अंमलबजावणी कुठपर्यंत झाली, किती निधीचे वाटप झाले, किती निधीचे वाटप व्हावयाचे आहे याबाबतचे उत्तर सभागृहाला उपलब्ध करुन दिले पाहिजे. मी माननीय पंतप्रधान आणि या देशाचे कृषिमंत्री माननीय श्री.शरद पवार यांचे या सभागृहात अभिनंदन करतो. काही वृत्तपत्रामध्ये बातमी वाचायला मिळाली. श्री.पवार साहेब माननीय पंतप्रधानांच्या दौ-यामध्ये सामील होणार की नाही? परंतु मी हा विषय महत्वाचा मानत नाही. परंतु विदर्भाच्या शेतकऱ्यांना पॅकेज मिळाले पाहिजे ही माननीय श्री.शरद पवार यांनी घेतलेली भूमिका, त्यामुळे त्याठिकाणी पॅकेज मंजूर करुन पंतप्रधानांसोबत दौऱ्यात ते सहभागी झाले आणि 3375 कोटी रुपयांचे पॅकेज विदर्भातील सहा जिल्हयातील शेतकऱ्यांना मिळाले आहे. यातून सर्व प्रश्न सुटणार नाहीत याची मला जाणीव आहे. आम्ही प्रामाणिकपणे या संपूर्ण पॅकेजचा उपयोग या शेतकऱ्यांना डायरेक्ट मदत पोहोचविण्यामध्ये कसे करतो, त्यातूनच संपूर्ण पॅकेजचे भवितव्य आणि भविष्य उभे राहणार आहे. सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी आणि विदर्भातील अन्य सन्माननीय सदस्य असतील, अनुशेषाच्या प्रश्नावर या ठिकाणी चर्चा होते, सिंचनाच्या प्रश्नावर चर्चा होते. पश्चिम महाराष्ट्रातील कृष्णा खोरेची कामे अर्धवट पडली आहेत, त्यांच्यासमोर काही समस्या आहेत. उत्तर महाराष्ट्रासाठी बजेटमध्ये 351 कोटी रुपयांची तरतूद केली असताना पुन्हा दुरुस्ती करण्यात आली, ती दुरुस्ती केल्यानंतर उत्तर महाराष्ट्रातील सर्व सन्माननीय आमदार माननीय राज्यपाल महोदयांकडे गेल्यानंतर 351 कोटी रुपये रिइन्स्टॉल करण्यात आले. आज कोकणाची देखील परिस्थिती बिकट आहे. सिंचनाच्या संदर्भात जास्त लक्ष देण्याची गरज आहे. विदर्भामध्ये

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी.....

कोरडवाहू शेती असताना सिंचनाची व्यवस्था नाही त्यामुळे दुसरा जोडधंदा नाही. पश्चिम महाराष्ट्रामध्ये जवळजवळ 83 तालुके दोन-तीन वर्षे दुष्काळात होरपळत होते. राज्यात 1972 मध्ये भयानक दुष्काळ पडला. त्यानंतर 2 वर्षापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात जो दुष्काळ पडला, लाखो मजूर त्याठिकाणी कामाला होते, लाखो जनावरे छावणीमध्ये आणलेली होती तरी देखील त्या भागात कोणाचा भूकबळी झाला नाही, आत्महत्या झाली नाही हे महत्वाचे आहे. विदर्भात पुढारी म्हणून काम करणे वेगळे आणि त्याठिकाणी ज्या व्यवस्था निर्माण करावयाच्या आहेत त्याबाबत विदारक असे चित्र दिसून येते. विदर्भाला मदत करीत असताना, 6 जिल्हयातील शेतकऱ्यांना मदत करीत असताना त्यांना जोडधंदा देणे, ते जोडधंदे चालतात की नाही, त्यातून त्यांना शक्ती, ताकद मिळते की नाही हे पाहण्याचे काम राज्य शासन आणि तुम्हा आम्हा सर्वांचे आहे. एका अतिशय ज्वलंत विषयावर सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी चर्चा घडवून आणली. मी त्यांचे अभिनंदन करतो. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी आक्रमकपणे आपली मते मांडली. मी काही प्रमाणात त्यांच्या मताशी सहमत होणार नाही, परंतु ते संपूर्ण परिसरात फिरतात, तेथील शेतकऱ्यांच्या गाठीभेटी घेतात.....

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुदास कुलकर्णी...

ही वस्तुस्थिती नाकारुन चालणार नाही. या ठिकाणी गंभीर अशा विषयावर जी चर्चा झालेली आहे त्यामध्ये मी वैयक्तिक आणि माझ्या पक्षाच्या वतीने भाग घेत असतांना मी या चर्चेचे समर्थन करतो व माझे दोन शब्द पूर्ण करतो.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, या चर्चेला सुरुवात करण्यापूर्वी माझी सदनाला विनंती आहे की, सुरु असलेल्या अतिशय महत्वाच्या चर्चेसाठी अडीच तासाचा वेळ देण्यात आलेला आहे परंतु या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता या चर्चेसाठी अधिक वेळ वाढवून देण्यात यावा. कारण या ठिकाणी महत्वाच्या, जिव्हाळयाच्या विषयावर चर्चा चालू आहे.

सभापती महोदय, एका अतिशय महत्वाच्या विषयावर या ठिकाणी चर्चा होत आहे. या चर्चेवर बोलतांना सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, या विषयावर, या सभागृहात एकंदर सात वेळेस चर्चा झालेली आहे. ही चर्चा एकंदर किती वेळ झालेली आहे हे मला आठवत नाही परंतु या विषयाच्या संदर्भात पाच वेळा सभात्याग करण्यात आलेला आहे हे मला चांगले आठवते. शेतक-याच्या आत्महत्येचा संबंध हा त्याच्या जातीशी, धर्माशी किंवा पंथाशी येत नाही तर आत्महत्येचा संबंध सरकारच्या आर्थिक धोरणाशी येतो. ज्या ठिकाणी शेतकरी आत्महत्या करतात त्या ठिकाणी खरे म्हणजे पाटबंधारे खात्याने 30-40 हजार कोटी रुपये देऊन पाटबंधा-याची कामे केली पाहिजेत. ज्या ठिकाणी शेतकरी आत्महत्या करतात त्या ठिकाणच्या शेतीला पाणी उपलब्ध करुन दिले पाहिजे, सिंचनाचे प्रकल्प पूर्ण केले पाहिजे तसेच सिंचनाचे जे प्रकल्प अपूर्ण अवस्थेत आहेत ते पूर्ण केले पाहिजेत. आपले सरकार पुरोगामी, प्रगतिशील आहे, हे सरकार डॉ. आंबेडकरांचे आणि शाहू-फुलेंचे नाव न घेता सभेला सुध्दा सुरवात करीत नाही परंतु या सरकारडे आपल्यासाठी 30 हजार कोटी रुपयांची विमाने घेण्यासाठी पैसे आहेत परंतु आत्महत्या केलेल्या शेतक-यांचे पुनर्वसन करण्यासाठी पैसे नाहीत अशी स्थिती आहे. काल माननीय पंतप्रधान आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या प्रश्नाच्या संदर्भात विदर्भात आले होते त्यांच्या एका एका मुद्याचा मी येथे आढावा घेणार आहे. शेतक-यांनी केलेल्या आत्महत्येच्या संदर्भात सहकार मंत्र्यांनी काही जी.आर.काढलेले आहेत. शासनाने यासंदर्भात जे काही जी.आर. काढलेले आहेत त्याच्या तारखा सुध्दा माझ्याकडे आहेत. यामध्ये 1155 प्रकरणापैकी 1120 प्रकरणांची चौकशी करण्यात आलेली आहे. यामध्ये 328 प्रकरणी पात्र ठरली असून 792 प्रकरणे अपात्र ठरलेली आहेत. आता आपण 1650 प्रकरणे अपात्र ठरवलेली आहेत. दारुचे व्यसन आणि

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी.....

मानसिक संतुलन यामुळे शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत अशा प्रकारचे शासनाने पंचनामे केलेले आहेत. सभापती महोदय, यासंदर्भात शासनाने जे काही पंचनामे तयार केलेले आहेत ते खोटे आहेत. टाटा इन्स्टीटयूट ऑफ सोशल सायन्सेस यांनी यासंदर्भात अहवाल दिलेला आहे. मला वाटते आपण हा अहवाल वाचला असता तर आपण वेगळयाच प्रकारची कार्यवाही केली असती. परंतु आपण म्हणता की हा अहवाल मी वाचलेला आहे. या अहवालातील एक प्रकरण मी आपल्याला वाचून दाखवितो. It reads as under: " Causes of Farmers Suicides in Maharashtra: An Enquiry. Final Report submitted to the Mumbai High Court - Tata Institute of Social Sciences. 3.6. Attitude of the Government. The crisis in agriculture is widespread, and the number of farmers committing suicide is on the increase. The situation only seems to be getting worse. What has been the response of the Government to the unfolding consequences of the crisis in agricultural sector? 1. Despite the letters and faxes sent by us to the District Collectors (except Mumbai) citing the order of the Honourable High Court to solicit basic information regarding the deaths only two Collectors (Jalna and Dhulia Districts) got back with a response. This is despite the director of Honourable High Court asking the TISS to submit its report on the possible causes behind the suicides of the cultivators."

contd. on OO.1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितिन गडकरी.....

हायकोर्टाच्या आदेशानंतर फक्त महाराष्ट्रातील दोन जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल पाठविला. बाकीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी अहवाल पाठविला नाही. हे शासन संवेदनहीन झाले आहे. नागपूर हायकोर्टाने मंत्रालयाच्या मुख्य सचिवांना एक हजार रुपयांचा दंड ठोठावला होता. अशा अधिकाऱ्यांना कॅबिनेटमध्ये बेंचवर उभे करण्याची शिक्षा झाली पाहिजे. एक हजार रुपये रक्कम तशी कमी आहे. खरे तर त्यांना हातात बेड्या घालून तुरुंगात पाठविले पाहिजे. संवेदनशक्ती गमाविलेले हे सरकार आहे. हे सर्व मी म्हणत नाही. हे हायकोर्टाने म्हटलेले आहे. अहवालात पुढे असे म्हटलेले आहे की, "We have received information from the Divisional Commissioner Nagpur, Commissioner Agriculture and Joint Director, APC. Otherwise, there is a general lack of sensitivity to the situation that the farmers are facing."

Mr. Panel Chairman, Sir, Tata Institute of Social Sciences Committee is appointed by the Honourable High Court and it is Report submitted by this Committee to the High Court. Sir, what they have submitted to the High Court? I read it out again. It reads as under:

"Otherwise, there is a general lack of sensitivity to the situation that the farmers are facing." It is also stated that: " In terms of the list provided by Jalna, Wardha and Nagpur districts, the information has been inadequate and incomplete."

सभापती महोदय, माझी आपल्यामार्फत मंत्रिहोदयांना हात जोडून विनंती आहे की, आपण शेतकऱ्यांच्या बाबतीत योग्य निर्णय घ्यावा. जी 1600-1800 प्रकरणे असतील त्याबाबतीत फेरविचार करण्यात यावा. टाटा इन्स्टिटयुट ऑफ सोशल सायन्सेस, इंदिरा गांधी ह्युमन रिसर्च इन्स्टीटयुट, गोखले इन्स्टिटयुट वा अन्य कोणत्याही इन्स्टीटयुटला फेरचौकशी करण्यास सांगावे.शेतकऱ्यांच्या आत्महत्या या कर्जबाजारीपणामुळे, नापिकीमुळे झालेल्या आहेत की अन्य कारणांमुळे झालेल्या आहेत याची पुन्हा एकदा तपासणी करण्यात यावी. माझी मंत्रिमहोदयांना हात जोडून विनंती आहे की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना एक-एक लाख रुपयांची मदत करावी. त्यामुळे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितिन गडकरी.....

सरकारला 15 कोटी रुपये खर्च येणार आहे. तसेच खोटे पंचनामे करु नका. सरकार एका प्रकरणी हायकोर्टात एक्स्पोज झाले. श्री.हिरामण पाटील या शेतकऱ्याच्या केसच्या बाबतीत गव्हर्मेंट प्लीडरला कोर्टाने फटकारले होते. कारण हिरामन पाटील याने केलेल्या आत्महत्येचे कारण त्याच्या पत्नीचा झालेला मृत्यू असे देण्यात आले होते. परंतु त्या इसमाची पत्नी 16 वर्षापूर्वी मयत झाली होती. माझी पुन्हा एकदा आपल्यामार्फत मंत्रिमहोदयांना विनंती आहे की, शेतकऱ्यांकडून चुका झाल्या असतील तर सरकारने मनाचा मोठेपणा दाखवून त्या माफ कराव्यात आणि आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना एक लाख रुपये द्यावेत. आता श्री.नारायण राणे तुमच्याकडे आले. परंतु ते या बाजुला असताना माननीय श्री.मनोहर जोशी, माननीय श्री.गोपीनाथ मुंडे, माननीय श्री.नारायण राणे, माननीय श्री.अनिल देशमुख मी स्वत: व अन्य मान्यवरांनी मृत कुटुंबियांच्या घरी एक-एक लाख रुपये पोहाचविले आहेत. आपण त्यांना 1 लाख रुपयांची मदत देतो, त्यापैकी 70 हजार रुपयांचे बॉंड देता आणि 30 हजार रुपये रोखीने देतो.

सभापती महोदय, बिहार राज्यातून मला बोलाविणे आले होते म्हणून मी त्याठिकाणी गेलो होतो. तेव्हा माझी बिहारच्या मुख्यमंत्र्यांबरोबर बैठक झाली. मी तेथे ॲग्रीकल्चरलवर किती टक्के आकारणी घेता याची माहिती घेतली. मला सांगण्यात आले की, राष्ट्रीय कृत बँकामार्फत ॲग्रीकल्चरलवर 8 ते 9 टक्के व्याज आकारले जाते, त्याठिकाणी सहकारी बँका नाहीत. आपल्या येथील सहकारी बँका विसर्जित केल्या पाहिजेत. त्या आमच्या मुळावर उठल्या आहेत. सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या 3750 पॅकेजपैकी 3283 कोटी रुपये सहकारी बँकांनी लाटले आहेत.

यानंतर श्री.पुरी...

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

हे कुठल्या शेतकऱ्यांचे पॅकेज आहे. शेतकऱ्यांसाठी आपण जे पॅकेज वाटणार आहात, हे कुठल्या शेतकऱ्यांसाठी आहे ? माननीय पंतप्रधानांनी कसे पैसे वाटले ते मी वाचून दाखवतो. It is stated in the Hon. Prime Minister's Long Term Measures. It reads as under: "There is a cry all round for providing relief from debt. In many cases, the overdue interest exceeds the original loan." माननीय सहकार मंत्री महोदय, हे माननीय पंतप्रधान सांगतात. याबाबतीत मी व माननीय सभापती यांनी आपल्याला कितीवेळा सांगितले ? आपण 10 हजार कर्जावर 80 हजार, 1 लाख रुपये घेता हा कुठला न्याय आहे ? टाटा, बिर्ला, अंबानी हे उद्योगपती असून त्यांना आपण 1700 कोटी रुपयांचे लोन 750 कोटी रुपयांवर सेटल केले. बी.आय.एफ.आरचे उद्योगपती असून त्यांचे आजारी उद्योग आहेत त्यांचे हजार कोटी रुपयांचे लोन आपण साडे तीनशे कोटीवर, पावणे तीनशे कोटीवर सेटल केले. परंतु आपण शेतकऱ्यांच्या 10 हजारांवर मात्र एक लाख, सव्वा लाख रुपये वसूल करता, हा कुठला न्याय आहे. एवढया मुद्दलावर आपण 10 पटीने व्याज घेता, हे योग्य नाही. आपण याठिकाणी वरुन सांगता की, आम्ही व्याज माफ करु. परंतु शेतकऱ्यांच्या बाबतीत हा कुठला न्याय आहे ? माननीय सहकार मंत्री महोदय, याबाबतीत आपण कितीवेळा बैठक घेतली व माननीय सभापती यांनी आपल्याला कितीवेळा याबाबतीत सांगितले, याची माहिती द्यावी. आपण सांगता की, हे झाले आहे. परंतु काहीच झाले नाही. आपल्या विभागाचे जी.आर. माझ्याकडे आहेत. याठिकाणी आपण सांगावे की, या महाराष्ट्रातील एका तरी शेतकऱ्यास आपण सहा टक्के दराने कर्ज दिले आहे ? आपण एका तरी शेतकऱ्यास कर्ज दिले असेल तर त्यावेळी आम्ही विरोधी पक्षातील सर्व सन्माननीय सदस्य उभे राहून आपले अभिनंदन करु. परंतु आपण एकाही शेतकऱ्याला 6 टक्के दराने कर्ज दिलेले नाही. दिले असेल तर त्याचे नाव सांगावे. आपण याठिकाणी महाराष्ट्रातील जनतेला का गुमराह करीत आहात ? आपण याठिकाणी व्याज माफी देऊ असे सांगात, परंतु ती देत नाही. 25 हजार रुपये प्रति क्विंटल कापसास भाव देऊ असे सांगता, परंतु तोही देत नाही. कर्ज माफ करतो म्हणून सांगता, परंतु कर्ज माफ करीत नाही. आता आपण 6 टक्के दराने कर्ज देऊ असे सांगता, परंतु प्रत्यक्षात देत नाहीत. आपला कशा प्रकारचा ट्रॅक रेकॉर्ड आहे ? काल माननीय मुख्यमंत्री म्हणाले की, विरोधी पक्षाचे लोक चहापानाला आले नाहीत. आपण फक्त

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी....

तारीख बदलता आणि पत्रक काढता. मागील नागपूरच्या अधिवेशनामध्ये विधानसभा व विधान परिषद सभागृहामध्ये त्यांनी सांगितले होते की, युती सरकारने ज्या प्रमाणे एक-एक लाख रुपये दिले, त्याप्रमाणे आम्हीही पैसे देऊ. परंतु प्रत्यक्षात पैसे देण्यात आले नाहीत. आपल्या पॅकेजची तर फारच दुर्दशा आहे. माझ्याकडे आपल्या विभागाचे तारीखवाईज जी.आर. आहेत. आपल्या मंत्रिमंडळातील एका तरी मंत्र्याने सांगावे की, आम्ही या या जिल्हयाचा आढावा घेतला आहे. माननीय श्री.गुरुनाथ कुलकर्णी साहेब, आपले मंत्रिमंडळ हे दोन पक्षाचे आहे. याबाबतीत आपण श्रीमती प्रभा राव व श्री.अरुण गुजराथी यांना बोलवावे व सांगावे की, आपल्या शासनाच्या जी.आर. प्रमाणे कार्यवाही झाली आहे काय ? याठिकाणी शासनाच्या जी.आर.प्रमाणे काहीच कार्यवाही होत नाही. फक्त 20-25 टक्केच कार्यवाही होते. याला जबाबदार माननीय मुख्यमंत्री वा माननीय सहकार मंत्री नाहीत. त्याला जबाबदार हे मंत्रालयामध्ये व प्रशासकीय इमारतीमध्ये बसलेले शुक्राचार्य आहेत. हे "लातों के भूत बातों से नहीं मानते" त्यासाठी धच्चोटमंत्री पाहिजेत, त्याशिवाय ते ऐकत नाहीत. हे शुक्राचार्य मंत्र्यांपुढे फक्त सर, सर करीत धावत असतात. परंतु ते अशा जी.आर.च्या बाबतीत काहीच करीत नाहीत. याबाबतीतील अनुभव आपलाही आहे व आमचाही आहे. परंतु हे भूषणावह आहे काय ? आपल्या मंत्रालयाच्या मुख्य सचिवांना व इतर अधिकाऱ्यांना नागपूर खंडपीठाने हजार रुपयाचा दंड करावा, हे भूषणावह आहे काय ?

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

हायकोर्टाच्या रिपोर्टमध्ये जिल्हाधिकारी रिस्पॉन्स देत नाहीत असे नमूद केले आहे. हे शासनाला भूषणावह आहे काय ? अशा पध्दतीचे हे सेन्सेटिव्ह, संवेदनशील प्रशासन आहे काय ? या प्रश्नाची शासन दखल घेणार आहे की नाही ? राजकारण थोडे बाजूला सारुन खरोखर संवेदनशीलता दाखवायची असेल तर 10-20 अधिका-यांना घरी पाठवावे लागेल. ती ताकद तुमच्यामध्ये आहे काय ? ही ताकद तुम्ही दाखविणार आहात काय ? म्हणून माझी विनंती आहे की, थोडे गंभीर व्हा. 712 कोटी रुपयांचे कर्ज माफ झाले, ते 10 हजार रुपयांचे कर्ज 70 हजार रुपये झाले त्यासाठीचे आहे. It has also been stated that " The overdue interest in the 6 affected districts is around Rs. 712 crores as on 30th June,2006. The entire overdue interest will be waived and all farmers will have no past interest burden as on today so that they will be immediately eligible for fresh loan from the banking system." हे 712 कोटी रुपये जिल्हा बँकांना मिळणार आहेत. " In addition to waving overdue interest, Rs.1300 crores of overdue loans as on 30th June, 2006 will also be rescheduled over a period of three to five years with a one year moratorium." हे देखील बँकांनाच दिले आहेत. म्हणजे बँकांना दिलेले पैसे किती झाले ? 1275 कोटी रुपयांचा पतपुरवठा याअंतर्गत बँकांना करण्यात आला. बँकांकडे पतपुरवठा नाही असे नाही, त्यांच्याकडे पतपुरवठा आहे, या बँका प्रायॉरिटी सेक्टरमध्ये फायनान्स करीत नाहीत म्हणून आर.बी.आय.कडे दंड भरतात, त्यांच्याकडे कॅपिटल आहे, पैसे आहेत पण देण्याची नियत नाही, कारण त्यांना हंटर दाखविणारा मंत्री मिळालेला नाही. या बँका शेतक-यांना दरवाजातसुध्दा उभे करीत नाहीत. मी स्वत: याचा अनुभव घेतला आहे. मी विद्यार्थी दशेपासून नक्षलाईट क्षेत्रामधून आलेलो आहे. त्यामुळे जी व्यवस्था न्याय देत नाही त्यांना उद्ध्वस्त केले पाहिजे. तुम्हाला कुणी अडविले आहे ? करा कारवाई. 4/2 वर्तमानपत्रात अग्रलेख लिहून येतील, परंतु, शेतक-यांना फायदा होईल. मी आत्महत्या केलेल्या 150 शेतक-यांच्या घरी गेलो त्यावेळी मला झोप लागली नाही. विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर, श्री.रामदास कदम हे बरोबर होते. एका शेतक-याच्या अंतयात्रेला गेलो, त्यांची मुले त्यावेळी पाहिली. 35/40 किलो

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी.....

या मुलांचे वजन झाले आहे, अंगाने सुकलेले आहेत, घरे कशी आहेत ? माणसे कशी आहेत ? घरात काय आहे ? हे सर्व पाहिले आहे. यवतमाळ जिल्हयातील एम.ए.पर्यन्त शिकलेल्या एका शेतक-याने आत्महत्या केली, सन्माननीय मंत्री, प्रा.वसंत पुरके यांना विचारा. सन्माननीय सदस्य, श्री.कवाडेसाहेब आणि सन्माननीय सदस्य, श्री.गणगणेसाहेब हे नेहमी ओ.बी.सी.आणि एस्.सी.या वर्गासाठी संघर्ष करीत असतात. मला त्यांच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, यातील 70 टक्के आत्महत्या एस्.सी., एस्.टी. आणि ओ.बी.सी.या वर्गातील आहेत. आज ही माणसे मानेला खाज सुटली म्हणून फासावर गेलेली नाहीत. सन्माननीय उपमुख्यमंत्री, श्री.आर.आर.पाटील या सभागृहात बोलले आहेत, मी मुद्दाम पेपर कटिंग मागविले, परंतु ते आता या सभागृहात उपस्थित नसल्याने त्याबाबत मी बोलणार नाही. दारु सगळेच पितात, मी मात्र मोरारजी देसाईंचा भक्त असल्यामुळे शिवांबू सुरु केले आहे. इथेनॉल तयार करण्याऐवजी दारु तयार करावी, अशी परिस्थिती निर्माण करुन ठेवली आहे. या राज्याचा जाणता राजा दिल्लीत आहे, त्यांच्याकडे कृषि मंत्रालय आहे. या देशाचे भूतपुर्व पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी इथेनॉल निर्मितीला संमती दिली. आम्ही इथेनॉलची निर्मिती केली परंतु दिल्लीतील सरकारने, सन्माननीय मंत्री, श्री.मणिशंकर अय्यर यांनी एक थेंबही इथेनॉल विकत घेतले नाही. अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी अशी शेतक-यांची नांवे ऐकली आहेत काय ? असेही म्हटले गेले. पण आपल्याकडे शरद पवार, उल्हास पवार, अनिल देशमुख ही शेतक-यांची नांवे आहेत, तुमचेच राज्य आहे, तुमचे शेतक-यांचे राज्य आहे मग आपण 30 हजार कोटी रुपयांची विमाने विकत घेता ? त्याकरिता तुमच्याकडे पैसे आहेत, पण पाटबंधारे खात्याकरिता निधी देण्यासाठी तुमच्याकडे पैसे नाहीत ? 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर करता. मिडियामध्ये छापून येते, मला हे कळत नाही की, टी.व्ही., पेपरवाले हे सर्व न वाचताच छापतात. यातील 382 कोटी रुपये बँकांकडे गेले, 477 कोटी रुपये विविध योजनांकरिता दिले. हॉर्टिकल्चरकरिता दिलेल्या पैशांमध्ये 25 कोटी रुपये संत्र्याकरिता दिले असे सांगितले आहे. परंतु, हे यापूर्वीच जाहीर केलेले पैसे आहेत, हे पैसे बजेट प्रोव्हिजनमधीलच आहेत.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

केंद्र सरकार पुरस्कृत योजनेतून 187 कोटी रुपये फिशरीज आणि डेअरीकरिता देण्यात आले आहेत. 2177 कोटी रुपये या सहा जिल्हयांसाठी ए.आय.बी.पी. योजनेतून मिळणार आहेत. तसेच, केंद्र सरकारकडून मदत म्हणून महाराष्ट्र राज्याला साडेचार हजार कोटी रुपये मिळतात. या सर्व बजेटमधील तरतुदी पॅकेजमध्ये दाखविण्यात आल्या आहेत आणि बजेटमधील पैसे तिकडे वळविण्यात आले आहेत. याचाच अर्थ बजेटमधील तरतुदी व्यतिरिक्त फक्त 3 कोटी रुपये पॅकेजमधून देण्यात आले आहेत. विदर्भातील 6 जिल्हयांना 50-50 लाख रुपये देण्यात आले, हे स्वागतार्ह आहे. या 6 जिल्हयातील जे शेतकरी आत्महत्या करतील त्यांच्या मुलांच्या शिक्षणाकरिता, वैद्यकीय उपचारासाठी माननीय पंतप्रधानांच्या विशेष कोषातून 50-50 लाख रुपये जिल्हाधिका-यांकडे सुपूर्द करण्यात येणार आहेत. तसेच 180 कोटी रुपये कॉटन सिडस्च्या डेव्हलपमेंटसाठी देण्यात येणार आहेत. असे 183 कोटी रुपये देण्यात आलेत. Sir, what are the direct benefits to the farmers ? In my opinion, the direct benefit to the farmers is zero. ज्या शेतक-यांनी आत्महत्या केल्या किंवा जे आजारी आहेत त्यांच्या घरामध्ये या रकमेतील एक रुपया देखील जाणार नाही. परंतु ज्यांनी 280 कोटी रुपये, 60 कोटी रुपये, 150 कोटी रुपये, 80 कोटी रुपयांचे घोटाळे केले त्या सहकारी बँकांचे मात्र या निधीतून पुनरुज्जीवन होणार आहे. मी सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांचे लक्ष वेधू इच्छितो की, शेतक-यांच्या नावावर पॅकेजमार्फत राष्ट्रवादी काँग्रेसने डाव साधला आहे. काँग्रेसचे लोक बिचारे साधे आहेत. याच पैशातून आता या 6 सहकारी बँकांचे पुनरुज्जीवन होणार आहे. सन्माननीय सदस्य, श्री.गुरुनाथ कुलकर्णी आपण हे साधले म्हणून आपण अभिनंदनास पात्र आहात. या ठिकाणी सहकार मंत्री श्री.पतंगराव कदम उपस्थित आहेत. त्यांना मी सांगू इच्छितो की, आपण केंद्र सरकारकडे जा, माननीय श्री.पवारसाहेबांना विनंती करा. आपण विरोधी पक्षाला सांगत होतात की, शासन विरोधी पक्षासह केंद्र सरकारकडे जाईल. मला माहिती आहे की, आपण आमचे हितचिंतक आहात, आमचेही मनापासून आपल्यावर प्रेम आहे. आज आपण ज्या जागेवर आहात तेथून आपला उत्कर्ष व्हावा व आपण दोन पावले पुढे जावे, अशी आमची इच्छा आहे. परंतु सन्माननीय मंत्रीमहोदय आपण हा विषय गांभीर्याने घ्यावा, अशी माझी विनंती आहे. आपली प्रगती होऊ नये म्हणून कोणती तरी यंत्रणा काम करीत असावी, अशी शंका येते. कारण आपले नेतृत्व काही लोकांना अडचणीचे असल्यामुळे आपल्याला सबोटेज करण्याचा प्रयत्न होऊ शकतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी .....

सहकार विभागाने म्हणजे मंत्रीमहोदयांनी आदेश काढले, ही बाब खरी आहे. शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज देण्यात यावे, अशा प्रकारचे आपले आदेश होते. परंतु आपल्या आदेशाचे पालन बँका करीत नाहीत. एकही डी.डी.आर.आपल्या आदेशाचा मान राखत नाही. बँकांनी किंवा खालच्या अधिका-यांनी आजपर्यन्त 6 टक्के दराने एकाही शेतक-याला कर्ज दिलेले नाही. मंत्री म्हणून आपण दणादण ऑर्डर काढता परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही. याचे कारण असे आहे की, यामध्ये काही तरी गडबड आहे. माझे आपल्याला असे आव्हान आहे की, 1 जून पर्यन्त 6 टक्के दराने कर्ज वाटप झाले आहे, अशा एका शेतक-याचे नांव आपण या ठिकाणी सांगा, आम्ही शिवसेना, भाजपतर्फे याच ठिकाणी आपले अभिनंदन करु. सभापती महोदय, कॉटन प्राईज मेकॅनिझ मसंदर्भात काहीही चर्चा करण्यात आली नाही. सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवारसाहेब मी आपल्याला सांगू इच्छितो की, एक वाईट घटना घडलेली आहे. मी इझ्रायल या देशात गेलो होतो. राज्याचे सन्माननीय मंत्री, श्री.अजित पवार व राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक मोठे नेते उपस्थित होते. सन्माननीय, श्री.शरद पवारसाहेब कार्यक्रमाचे अध्यक्ष होते. इझ्रायलचे प्रधानमंत्री, कृषिमंत्री हे देखील उपस्थित होते. त्याच ठिकाणी गुजरातचे मुख्यमंत्री, श्री.नरेंद्र मोदी आम्हाला भेटले. पहिल्या दिवशी मला सन्माननीय श्री.नरेंद्र मोदी यांच्याबद्दल आनंद वाटला नाही. कारण त्यांनी सांगितले की, गुजरातचा ग्रोथ रेट 15 टक्के आहे, गुजरातमध्ये 24 तास वीज उपलब्ध आहे, यावर्षी गुजरातने 30 हजार कोटी रुपयांचा कृषी माल निर्यात केला. नंतर ते हळूच म्हणाले की, आमच्या राज्याच्या बाजूला महाराष्ट्र राज्य हे कापूस उत्पादक राज्य आहे. तेथे गर्व्हमेंट स्पॉन्सर स्कीम चालतात. महाराष्ट्रामध्ये कापसाचे मिश्रीकरण झाल्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारामध्ये त्यांचा कापूस कोणी घेत नाही, त्यामुळे गुजरातचा फायदा झाला. तसेच, ते पुढे असेही म्हणाले की, यावर्षी गुजरातमधून 10 हजार कोटी रुपयांचा कापूस निर्यात झाला. इंदिरा गांधी ट्रस्टने देशातील यशस्वी मुख्यमंत्री म्हणून त्यांना पहिल्या क्रमांकाचे बक्षिस दिले. जातीयवादी, सांप्रदायीकवादी असे आपण त्यांच्याबाबतीत बोलता. परंतु त्यांचे राज्य प्रगती करीत आहे. गुजरातचा ग्रोथ रेट 15 टक्के आहे. परंतु पहिल्या नंबरवर असणारा आपला पुरोगामी महाराष्ट्र, छत्रपती शिवाजी महाराजांचा महाराष्ट्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा महाराष्ट्र, राजर्षी शाहू महाराजांचा महाराष्ट्र, महात्मा ज्योतीबा फुलेंचा महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावरुन सहाव्या क्रमांकावर गेला आहे.

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

त्यांची नावे वापरून वापरून मते घ्यायची आणि निवडून आल्यानंतर मेडिकल, इंजिनिअरींग वगैरे कॉलेजे उघडावयाची, दारूची दुकाने घ्यायची. प्राथमिक शाळा घ्यायच्या आणि जेथे दिसेल तेथे हात मारून राहिले आहेत. जेथे जमीन मोकळी दिसेल ती घेण्याच्या मागे लागायचे. हे मला तुमच्याबद्दल बोलावयाचे नाही. पण आता हायकोर्टाने या संबंधात श्री.अरूण भाटिया यांची समिती नेमली आहे. 1-1 रूपयांवर जागा घेतलेली आहे. आणि आता तेथे मेडिकल कॉलेजे काढून प्रवेशासाठी 40-40 लाख रूपये घेतले जात आहेत. म्हणजे हे लोक आपले खिसे भरीत आहेत आणि आमचे बिच्चारे मित्र माननीय श्री.गुरूनाथ कुलकर्णी मात्र बाजूला पडले आहेत. आता तर श्री.नारायण राणे देखील गांधीवादावर भाषणे देत आहेत. अशी ही काँग्रेस आहे. बाहेर गांधींमुळे स्वदेशी माल आणि काँग्रेसमध्ये मात्र इम्पोर्टेड माल. स्वदेशी मालाला किंमत नाही. तरीही हे पुन्हा स्वप्ने पाहू लागले आहेत. म्हणतात ना कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ. जे बाहेरून पक्षात आले ते विलासराव आणि पतंगरावांच्याही पुढे जाऊ लागले आहेत. ....

डॉ. पतंगराव कदम (खाली बसून...) : शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचा विषय आता आपल्यापुढे आहे. तुम्ही तर सारे राजकारणच येथे बोलत आहात...

श्री. नितीन गडकरी : अहो, हत्या आणि आत्महत्या हा तर तुमचा इतिहास आहे. सभापती महोदय, माझी एकच विनंती आहे की, हे जी पॅकेजेस आहेत त्यातील एका पॅकेजची तर वाट लागली आहे. आता तुमचे जे पॅकेज आहे त्याचा तरी रिपोर्ट काय आहे ते आपण आम्हाला सांगावे. तुम्ही सगळे जी.आर. जरूर काढले पण त्याच्या अमलबजावणीबाबत काय परिस्थिती आहे ? तुमच्या विभागाने शेतकऱ्यांसाठी हेल्प लाईन सुरू करावयाचा जीआर काढला पण तसे कोठेही काहीही झालेले नाही. विदर्भ पाणलोट मिशन साठी देखील जीआर काढला. हा कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाकडे 2 कोटीची मागणी या आर्थिक वर्षासोठी करण्यात आलेली आहे. पण ती प्राप्त झाली आहे का ? त्याचे पुढे काय झाले ? काहीही नाही. असे अनेक जीआर त्यांच्या क्रमांक आणि दिनांकासह मी आपल्याला सांगू शकेन की जे जीआर निघाले पण त्याचा अंमल प्रत्यक्षात दिसून आलेला नाही. कापूस पिकविणाऱ्या शेतकऱ्याला दिलासा देण्यासाठी आपण जीआर काढला. 25 कोटी रूपयोचा निधी प्राप्त झाला, त्या निधीच्या वाटपाची कारवाई सुरू आहे. त्यानंतर पतपुरवठा व्यवस्थांचे पुनरूज्जीवन करण्यासाठी देखील आपण 3.1.2006 ला जीआर काढला.

..... एसएस 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गडकरी ....

यामध्ये आपण बिगरशेती वा नागरी सहकारी पतसंस्थांमार्फत कृषी क्षेत्रासाठी करावयाच्या पत पुरवठ्याबाबत शासनाचे धोरण निश्चित केले आहे. जिल्हा स्तरावरील पतपुरवठा करणाऱ्या पतसंस्थांचे पुनरूज्जीवन करण्यात यावे व शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करण्याबाबत आवश्यक ती योग्य कार्यवाही करून संबंधित शेतकऱ्यांना 25 हजार मर्यादेपर्यंत कर्ज देण्यात यावे व किसान क्रेडिट कार्ड वाटप करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. हा जीआर 4.2.2006 ला निर्गमित झाला आहे. पण आजवर एकालाही कार्ड भेटलेले नाही वा एकालाही याचा फायदा मिळालेला नाही. थोडक्यात आपण जे काही जीआर काढले आहेत त्यांचा काहीही उपयोग होत नाही, त्यांची अमलबजावणी झालेली नाही. तसेच पीक विमा योजनेच्या हप्त्यांमध्ये सवलत देण्यासाठी देखील आपण जीआर काढला आहे. अशा प्रकारे जेवढे म्हणून आपण जीआर काढले आहेत त्यांचा सारा चार्ट माझ्याजवळ आहे, पण तो वाचून दाखवित मी आपला वेळ घेणार नाही. सभापती महोदय, या निमित्ताने माझा एक स्पेसिफिक प्रश्न आहे की, तुम्ही आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांना एक एक लाख रूपये देण्याचे म्हटले होते त्याचे काय झाले ? तसेच शेतकऱ्यांना अल्पदराने म्हणजे 6 टक्के दराने कर्ज केव्हा आपण उपलब्ध करून देणार आहात ? ज्या शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाचे 10 हजार रूपये मुद्दल फेडले आहे त्यांना आपण कर्जमुक्ती देणार आहात का ? तसेच कोरडवाहू शेतकऱ्यांना आपण कर्जमुक्त करणार आहात का ? कारण आज ते कर्जाचे मुद्दल देखील फेडू शकत नाहीत. एका एकरामध्ये 2 क्विंटल कापूस झाला ...

(यानंतर श्री. सरफरे .... टीटी 1 ...

अशुधारित प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

त्याची किंमत 3 हजार रुपये आणि एक एकरी कापसाचा उत्पादन खर्च साडे तीन हजार रुपये. माननीय सदस्य श्री. सुधाकर गणगणे यांना माहीत आहे की, अकोला जिल्हयामध्ये एफएक्यू कापूस किती झाला? त्याच्या उत्पादन खर्चाची किंमत किती ते सांगा. मला मराठवाडयातील कापसाची स्थिती माहीत नाही. मी बी.टी. कॉटन लावला. माझ्या जिल्हयातील माननीय मंत्री श्री. अनिल देशमुख बसले आहेत. त्यांना माहीत आहे की, कापसाच्या शेतीची काय अवस्था आहे? शेतकरी कोठून कर्ज फेडणार आहे? यामध्ये डिफॉल्केशनचे दोन प्रकार आहेत. एक म्हणजे बोनाफाईड आणि दुसरे नालाफाईड. बोनाफाईड असेल तर माफ करावे आणि नालाफाईड असेल तर वसूल करावे. त्या शेतकऱ्याकडे दोन-चार कोटींची मालमत्ता असेल तर त्याच्याकडून वसूली करावी, ज्याच्याकडे एखादा धंदा असेल तर त्याच्याकडून वसूली करावी. ज्याच्याजवळ द्यायला काहीही नाही, त्याच्या घरातील बकरी देखील गेली, त्याने गाय देखील कसायला विकून टाकली त्याच्याकडील मुद्दलाच्या दहा पटीने तुम्ही वसूली करता? हा तुमच्या भूविकास बँकेचा गौरवशाली इतिहास आहे, ही तुमची सहकारी चळवळ आहे. बिहारमध्ये शेतकऱ्याला साडे आठ टक्क्याने कर्ज मिळते, आम्हाला 13 टक्के दराने घ्यावे लागते. मर्सिडीज गाडी विकत घेण्यासाठी 4 टक्के दराने कर्ज मिळते आणि ट्रॅक्टर विकत घेण्यासाठी 13 ते 14 टक्के दराने कर्ज घ्यावे लागते. असा हा आपला पुरोगामी आणि प्रगतीशील महाराष्ट्र आहे? आपण ही तफावत दूर कां करीत नाही? आपण गेली सात वर्षे राज्य करीत आहात, या कालावधीत ही तफावत कां दूर केली नाही? म्हणून आपण या प्रश्नाचे उत्तर द्यावे अशी माझी आपणास विनंती आहे

सभापती महोदय, मुद्दे अनेक आहेत त्या सर्व मुद्दयांना मी स्पर्श करु इच्छित नाही. कारण त्या महत्वाच्या मुद्दयांवर देखील सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख हे अनुशेषाच्या संदर्भात बोलणार आहेत. आम्ही नेहमी ओरडतो की, संपूर्ण महाराष्ट्र आमचा आहे. माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख आणि मी असे दोघे आहोत की, याबाबत आम्ही जी भूमिका वठविली आहे ती संपूर्ण महाराष्ट्राला माहीत आहे. मराठी माणसाचा हा महाराष्ट्र आहे याबद्दल आम्हाला अभिमान आहे. माननीय राज्यपालांनी दिलेल्या निदेशानुसार यवतमाळ जिल्हयामधील बेंबळा प्रकल्प पूर्ण झाला तर जिल्हयातील साडे तीन लाख एकर जमीन पाण्याखाली येईल. परंतु तो आज अपूर्णावस्थेमध्ये आहे. विदर्भामध्ये सर्वात जास्त शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या या जिल्हयामध्ये आहेत..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी...

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विलास अवचट)

मला माहीत आहे की, सर्वच ठिकाणी प्रकल्प बंद पडले आहेत म्हणून सर्वांना समान न्याय देणार काय? तुमच्यापैकी एकाने तरी चटकन उभे राहून सांगावे की, घटनेच्या कलम 371(2) अन्वये राष्ट्रपतींना मिळालेल्या अधिकारानुसार स्थापन झालेल्या स्वायत्त महामंडळामध्ये माननीय राज्यपालांनी जे निदेश दिले त्याचे तुम्ही पालन केले नाही. त्याचे व्हायोलेशन केले हे घटनाबाहय वर्तन आहे. हे आमच्या सरकारने केले नाही असे सांगण्याची तुमच्यापैकी एकाची तरी ताकद आहे काय? ज्यावेळी कॉस्टिटयुशनली व्हायोलेशन होते त्यावेळी ते सरकार बरखास्त होते. माझी आपणास विनंती आहे की, पाटबंधारे खात्यासाठी देखील आपण निधी द्यावा. आमच्यावेळी केंद्र सरकारकडे आम्ही एक मागणी करावयास हवी होती. प्रधानमंत्री ग्रामसडक योजना सुरु करण्यात आली त्यावेळी माननीय श्री.अटलजी वाजपेयी यांना मी म्हणालो होतो की, तुम्ही ही योजना चालू केली तर हा देश तुमची आठवण ठेवील. परंतु माझी त्यावेळी चूक झाली. ज्याप्रमाणे गावातील रस्ते होणे आवश्यक होते, त्याप्रमाणे शेतकऱ्याच्या शेतीला पाणी मिळावयास हवे होते. मी त्यांना आग्रह करुन सांगणे आवश्यक होते की, तुम्ही 60हजार कोटीचे खेडयातील रस्ते करता, राष्ट्रीय महामार्ग करता त्याप्रमाणे 60 हजार कोटी खर्च पाटबंधारे योजनांवर करा. आणि त्यामध्ये एकेका प्रकल्पासाठी 50 टक्के निधी राज्याचा आणि 50 टक्के निधी केंद्राचा द्यावा. 1947 साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर 5 लाख 60 हजार कोटी रुपये गुंतवून तुम्ही हॉटेल्स, मोटेल्स काढले, स्टील फॅक्टऱ्या उघडल्या, पॉवर प्लॅंट टाकले. पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्यावर रशियाचा प्रभाव होता. डाव्या विचारसरणीचे पक्ष हे स्वत:चे वाटोळे करतात आणि दुसऱ्यांचेही वाटोळे करीत आहेत. आपणास माहीत आहे की, रशिया लंबा झाला, आणि आज लाल बावटेवाले तुम्हाला दिल्लीमध्ये त्रास देत आहेत. यामध्ये भांडवलशाही डाव नाही तर गरीब माणसाचा फायदा आहे. आपण 5 लाख 60 हजार कोटी रुपये गुंतविले त्यामधील 95 टक्के रक्कम डेड इन्व्हेस्टमेंट झाली. हा पैसा गंगा कावेरी प्रकल्पामध्ये लागला असता, हा पैसा गावातील शेतकऱ्याचे घर उभे करण्यासाठी, गावातील रस्ते करण्यासाठी आणि प्यायला पाणी देण्यासाठी खर्च झाला असता..

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीसाठी नाही

श्री.[illegible] (पुढे सुरु...

तर महाराष्ट्रातील [illegible] भा[illegible]तील 35 विधा[illegible]सभा मतदार संघ [illegible]शाला [illegible]मी झाले असते ? म्ह[illegible] जी परिस्थिती [illegible] झाली,त्याला [illegible]स-राष्ट्रवादी [illegible]सचे आर्थि[illegible] धोर[illegible] जबाबदार आहे, असे मला प्रामा[illegible] सां[illegible]वयाचे आहे. ही परिस्थिती बदलायची तुमची तयारी आहे [illegible] [illegible]ही ? हा [illegible]रा प्रश[illegible] आहे. आमचे युतीचे राज्य असता[illegible] बी,ओ.टी. तत्वावर [illegible]मे [illegible]र[illegible]याबाबत प्रयत[illegible] [illegible]र[illegible]यात आला असता, माझ्यावर टी[illegible] [illegible]र[illegible]यात येत होती. त्यावेळेला आताचे स[illegible]मानि[illegible]य मंत्री श्री.आर.आर.पाटील आ[illegible] श्री.जयंतराव पाटील यां[illegible] तुम्ही बी.ओ.टी तत्वावर शास[illegible] चालवा अशी माझ्यावर [illegible]तीतरी वेळा सभा[illegible]हात टी[illegible] [illegible]ली. बीओटी तत्वावर [illegible]मे [illegible]लीच पाहिजेत. माझी ए[illegible]च वि[illegible]ती आहे [illegible], तुम्ही तुमचे आर्थि[illegible] धोर[illegible] बदला. जोपर्य[illegible] तुम्ही आर्थि[illegible] धोर[illegible] बदल[illegible]र [illegible]ही, त्या धोर[illegible]प्रमा[illegible] [illegible]म होते [illegible] [illegible]ही याचा रिपोर्ट घे[illegible]र [illegible]ही, तोपर्य[illegible] [illegible]हीही हो[illegible]र [illegible]ही. तुम्ही ए[illegible] वेळ पैशाचे ऑडीट [illegible]रु [illegible], परंतु अधि[illegible]यांच्या [illegible]माचे परफॉम[illegible] पहा, त्याचे ऑडीट [illegible]रा. [illegible]ली अंमलबजाव[illegible] होते [illegible], [illegible]ही हे दमदारप[illegible] पाहिले तर [illegible]प दिलासा मिळेल. अ[illegible]यथा स[illegible]मा[illegible]य सदस्य श्री.रावते साहेबां[illegible] सां[illegible]ल्याप्रमा[illegible] हा आत्महत्येचा [illegible]फ वाढत जाईल. आमच्या [illegible]ळामध्ये शेत[illegible]यांच्या आत्महत्या झाल्या. त्यांची सं[illegible]या दो[illegible] आ[illegible]ड्यामध्ये होती. आता ही सं[illegible]या वाढत चालली आहे. रोज शेत[illegible]यांच्या आत्महत्या होतात. सभापती महोदय, मी शेवटचा मुद्दा सां[illegible] माझे भाष[illegible] संपवि[illegible]र आहे. स[illegible]मा[illegible]य मंत्री डॉ.पतं[illegible]राव [illegible]दम यां[illegible] विचारावयाचे आहे [illegible], आत्महत्या [illegible]लेल्या शेत[illegible]यांच्या परिवाराचे सांत्व[illegible] [illegible]र[illegible]यासाठी तुम्ही [illegible]ला आहात [illegible]य ?

डॉ.पतं[illegible]राव [illegible]दम (बसू[illegible]) : मी माझ्या भाष[illegible]मध्ये सां[illegible]

श्री.[illegible] : स[illegible]मा[illegible]य उप मु[illegible]यमंत्री श्री.आर.आर. पाटील शेत[illegible]यांच्या परिवाराचे सांत्व[illegible] [illegible]र[illegible]यासाठी [illegible]लेले दिसले [illegible]ही. स[illegible]मा[illegible]य मु[illegible]यमंत्री फक्त यवतमाळ जिल्ह्यामध्ये [illegible]ले होते. मी मा[illegible]य पंतप्रधा[illegible]चे अभि[illegible]द[illegible] [illegible]रतो [illegible], त्यांच्या हे स[illegible]ळे ल[illegible]त आलेले आहे. आपले लो[illegible] [illegible]म बरोबर [illegible]रत [illegible]हीत म्ह[illegible] त्यां[illegible] स्वत: तेथे जाऊ[illegible] भेट दिली. स[illegible]मा[illegible]य उपमु[illegible]यमंत्री श्री.आर.आर. पाटील आ[illegible] स[illegible]मा[illegible]य सदस्य श्री. [illegible]रु[illegible]थ [illegible]ल[illegible]र्गी यां[illegible] सां[illegible]यचे आहे [illegible], मा[illegible]य श्री. शरद पवार साहेब आता त्या ठि[illegible] [illegible]ल्या[illegible]र आत्महत्या [illegible]लेल्या शेत[illegible]यांच्या परिवारां[illegible] त्यांचा चेहरा पहायला मिळाला. स[illegible]मा[illegible]य [illegible]द्रीय मंत्री श्री.प्रफुल्ल पटेल यांच्या [illegible]दीया मतदार संघामध्ये [illegible]च्या [illegible]चल्या, तेथे आप[illegible] स[illegible]ळे पोहोचला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MHM/

श्री.नितीन गडकरी पुढे सुरु....

परंतु आत्महत्या □र□ाऱ्या शेत□यांच्या परिवाराचे सात्वं□ □र□यासाठी तुम्हाला वेळ मिळाला □ाही. विदर्भातील सहा जिल्ह्या□रिता पंतप्रधा□□ पॅ□ज जाहीर □ले. परंतु चद्रपूर, भंडारा, □डचिरोली, □ोंदिया या जिल्ह्यातील 350 शेत□यां□ आत्महत्या □ल्या, त्या जिल्ह्यां□ यातू□ वा□ळले. प्रत्य□ात 3750 □ोटीचे पॅ□ज जाहीर □ले असले तरी 183 □ोटी रुपये मिळ□ार आहेत. त्याचे मॉ□□टरीं□ पंतप्रधा□ाचे □ार्यालय □र□ार आहे. 183 □ोटीचे मॉ□□टरीं□ □र□याची लाय□ी या सर□ारची □ाही,अशाप्र□ारचे प्रमा□पत्र पंतप्रधा□□ दिले. यापे□ा □ाय दैवदुर्विलास आहे ? स□मानी□य मंत्री डॉ. पतं□राव □दम यां□ सां□ावयाचे आहे □ी, 33 पे□ाही □मी □ु□ मिळालेले आहेत. आता तरी तुम्ही अभ्यास □रा आ□ि परिस्थिती सुधारा. आप□ा □ाही विषय □ंभीरते□ घ्यावेत. त्यामध्ये आप□ा से□सीटिव्ह□स दा□वावा. □ोर्टाच्या □□□या□डे दुर्ल□ □ले,रिपोर्ट दिला □ाही म्ह□ू□ आपल्या मुख्य सचिवांना ए□ हजार रुपये दंड □लेला आहे. अशा या मुर्दाड प्रशास□ाला आप□ा जा□ □रा. ते ऐ□त □सतील तर त्यां□ा फट□ मारा, □ाही तर हा□लू□ द्या, शास□ाचे आर्थि□ धोर□ा बदला तरच राज्य पुढे जाईल. □ाही तर आपल्या□डे डॉ.बाबासाहेब आंबेड□र, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज यांचे □ाव घ्यायचे आ□ि जातीयवादाचे राज□र□ा □रायचे, आर□□ाच्या विरोधी आंदोल□ाला मा□ू□ सपोर्ट □रायचा हे बरोबर □ाही. स□मा□□ीय सदस्य प्रा.□वाडे साहेब हे साधे, सरळ मिळाले. त्यां□ा बरोबर घेऊ□ सात वर्षे फिरविले आ□ि □िवडु□ी□ला उभे राहिल्या□ंतर त्यां□ा पाडले, स□मा□□ीय श्री.□वाई साहेबां□ा, श्रीमती सुले□ा □ुभारे, श्री.मु□ुल वासनि□□ यां□ा □िवडु□ी□मध्ये पाडले. जेवढे दलित उमेदवार होते त्यां□ा तुम्ही पाडले. त्यांचे आमदार □िवडू□ येऊ दिले □ाहीत. स□मानी□य प्रा.□वाडे साहेबां□ा □िवडू□ दिले □ाही. ते □ी□स□डे विश्वासा□ आले,परंतु त्यांचा □ळा □पला. त्यांची मते घेतली परंतु □िवडू□ आ□ले □ाही. आता ल□ी दर्शा□ाचा □ार्य□म सुरु आहे. आप□ा आता तरी बदला, यामध्ये आता ल□ घाला, एवढी वि□ती □रु□ माझे भाष□ा संपवितो.

तालि□ा सभापती (श्री.विलास अवचट) : या प्रस्तावावरील चर्चेला दिलेला वेळ संपत आलेला आहे. तरीही सभा□ृहाच्या अ□ुमती□ या विषयावरील चर्चा संपेपर्य□ सभागृहाच्या कामकाजाची वेळ वाढवि□यात येत आहे.

या□ंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी जी चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत आणि त्या आत्महत्या होत असताना आज ज्या स्थितीमध्ये आपण आहोत त्या स्थितीचा विचार करुन त्यातून आपल्याला काही बोध घेता आला तर तो घ्यावा आणि तो बोध घेण्याचा विचार आपल्या मनामध्ये आला तर या चर्चेचे फार मोठे सार्थक झाल्यासारखे होईल. आपल्याला पुष्कळ वर्षेपर्यंत या आत्महत्येची कारणेच कळली नाहीत. या सभागृहाचे डिबेट्स पाहिले तर आपल्या अंगावरील घोंगडे झटकून टाकावे अशा पध्दतीची एका मागोमाग एक निवेदने क्रमश: येत होती आणि ही निवेदने क्रमश: येत असताना एक क्षण असा आला की, शासनाला असे वाटले आणि नंतर शासनाने हे मान्य केले. ज्या लोकांना हे मान्य करणे अडचणीचे वाटत होते त्या अधिकाऱ्यांनी सुध्दा याबाबतीत रिपोर्ट दिला. या चर्चेच्या निमित्ताने एक गोष्ट स्पष्टपणे लक्षात घेतली पाहिजे की, या आत्महत्येच्या मागे लहानमोठी अनेक कारणे असतील. त्यातील सर्वात महत्वाचे कारण जलसिंचनाच्या सुविधांचा अभाव हे आहे. हे शास्त्रीयदृष्ट्या आता सर्वांनी मान्य केले आहे. ही या सभागृहाने आणि या शासनाने लक्षात घ्यावी अशा प्रकारची उपलब्धी आहे असे मला वाटते. यापूर्वी शासनाने सभागृहामध्ये अनेक वेळा ही गोष्ट मान्य केली आहे. 6 जिल्ह्यांसाठी जे पॅकेज दिले त्यामध्ये सुध्दा ही गोष्ट आपण मान्य केली आहे. आपण जो शासन निर्णय काढला त्याच्या पहिल्या परिच्छेदामध्ये आपण ही गोष्ट मान्य केली. त्यामध्ये दांडेकर समितीचा उल्लेख आहे. त्यामध्ये अनुशेष आणि निर्देशांक समितीचा उल्लेख आहे. त्यामध्ये ह्युमन डेव्हलपमेंट रिपोर्टचा उल्लेख आहे. शासनाने ही गोष्ट मान्य केली परंतु त्याला पूर्णपणे साजेसे वर्तन झालेले नाही, ही गोष्ट मान्य केली पाहिजे. मी मुद्दाम सांगेन की, हे मान्य केल्यानंतर सुध्दा आपले वर्तन पुरेसे साजेसे झालेले नाही. देशाच्या माननीय पंतप्रधानांनी नियोजन आयोगाची एक समिती नेमली. त्या समितीने महाराष्ट्रामध्ये निरनिराळ्या भागांना भेटी दिल्या आणि जो निष्कर्ष काढला त्यामध्ये असे म्हटले आहे की, "Visiting the six acute districts namely; Wardha, Yavatmal, Akola, Buldhana, Washim and Amravati, the team found astounding

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MHM/

प्रा. बी. टी. देशमुख ....

evidence of years of continued neglect of a region and its people. Ironically, the area is protected by the Constitution of India under Article 371(2) which, essentially, enjoins a specials responsibility upon the Governor and thereby the State Government to ensure that the State provides equitable treatment." या समितीने ही गोष्ट स्पष्टपणे मान्य केली आणि असा निष्कर्ष काढला की, "suicide, and extreme expression of distress, has raised a grave question regarding not only the historical neglect of the region but also a philosophical question about the capacity of the government to be of immediate service to people din such an acute distress." म्हणजे या भागाच्या मदतीला धावून जाण्याच्या तुमच्या क्षमतेविषयी त्यांनी सरळसरळ शंका व्यक्त केलेली आहे. तुम्ही कारण मान्य केले. माननीय पंतप्रधानांच्या निवेदनामध्ये सुध्दा ते कारण मान्य करण्यात आलेले आहे. माननीय पंतप्रधानांच्या निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, "The causes of crisis seems to be many. The primary one seems to be continual crop failure, low yields, and poor irrigation." They are by-products of lack of irrigation facilities. म्हणजे माननीय पंतप्रधानांनी जाहीरपणे ही गोष्ट नुसती मान्य केली नाही तर स्पष्टपणे सांगितले. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी त्यांच्या पध्दतीने तो विषय मांडला. मला त्या वाक्याबद्दल जरुर माननीय पंतप्रधानांना धन्यवाद दिले पाहिजेत. त्या वाक्यामध्ये माननीय पंतप्रधानांनी असे म्हटले आहे की, "I do realize that the success of this project depends on the implementation. In addition to state and local implementation and monitoring mechanism, my office will monitor implementation of the package of relief measure. I have already asked my Principal Secretary to take meeting of the officers concerned to avoid bureaucratic delays."

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख पुढे सुरु...)

माननीय पंतप्रधानांनी जे वाक्य वापरलेले आहे तेच आम्ही याठिकाणी गेली 6 वर्षे सांगत आलो आहोत. घटनेच्या अनुच्छेद 371(2) चा उल्लेख माननीय पंतप्रधानांनी केलेला आहे. आता केन्द्रामध्ये आणि राज्यामध्ये त्यांच्याच पक्षाचे सरकार आहे. माननीय पंतप्रधानांचे बोलणे हे प्रेमाचे नाही. माननीय पंतप्रधानानी कायदेशीर अधिकाराच्या अंमलबजावणीचा उल्लेख केलेला आहे. घटनेच्या अनुच्छेद 371(2)ची अंमलबजावणी ज्या दिवशी सुरु झाली त्याच दिवशी त्यांनी हस्तक्षेप करायला हवा होता, पण तो त्यांनी केला नाही हे आमचे अपयश आहे. चार-पाच-सहा वर्षानंतर आम्हाला थोडे फार यश आले. "There is a crying demand all around for improving irrigation. We are allocating Rs.2177 crores from the Central Government for completion of major, medium and minor projects in these districts over the next three years." त्यामध्ये अेआयबीपी शब्द नाही. वर्तमानपत्रामध्ये अेआयबीपी असा शब्द आलेला आहे. अेआयबीपीचा निधी आल्यानंतर विदर्भ आणि मराठवाड्यातील प्रकल्पांसाठी तीन तीन वर्षे निधी आला नाही. आज तशी स्थिती येणार नाही याची काळजी माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी घ्यावी अशी माझी त्यांना विनंती आहे. एका गोष्टीचा स्पष्ट उल्लेख केला पाहिजे की, जलसिंचनाच्या असुविधा हे या आत्महत्यांच्या मुळाशी असलेले कारण आहे. एखाद दुसरी आत्महत्या वेगळया कारणामुळे झालेली असेलही. परंतु मी ठामपणे सांगू इच्छितो की, आत्महत्यांचे प्रमाण हे ढोबळमानाने सिंचनाच्या अनुशेषाच्या प्रमाणात आहे. जेथे जलसिंचनाचा महत्तम अनुशेष आहे तेथे महत्तम आत्महत्या झालेल्या आहेत. मी मोर्च्यांचे फोटो पाहिलेले आहेत. जेथे सिंचनाचा अजिबात अनुशेष नाही तेथील लोकांनी मोर्चे काढलेले आहेत. एवढ्या मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असताना देखील आमच्या प्रकल्पाकडे शासन पहात नाही अशा भावनेतून सिंचनाचा अजिबात अनुशेष नसलेल्या भागातील लोकांनी मोर्चे काढलेले आहेत. जून 2004च्या सरासरीवर 18889 कोटीचा अधिकृत अनुशेष आहे. 2 हजार कोटीचा अनुशेष असलेले तीन जिल्हे या 6 जिल्हयातील आहेत. 1500 कोटीच्या वर अनुशेष असलेले 6 जिल्हे आहेत. या 6 जिल्हयांमधील दोन जिल्हे मराठवाड्यातील आहेत. आमचे म्हणणे असे आहे की, राज्य शासनाने याबाबतीत धोरणात्मक निर्णय घेतला पाहिजे. जे काही आर्थिक सहाय्य करावयाचे आहे ते

....2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ MHM/ SBT/

(प्रा. बी.टी.देशमुख...)

अनुशेषापुरते केले पाहिजे आणि ते करीत असताना त्यामध्ये होणारी लूटमार बंद झाली पाहिजे. "लूटमार" हा शब्द मी जाणूनबुजून वापरलेला आहे. ही लूटमार बंद झाली पाहिजे आणि ती बंद व्हायची असेल तर जे मागे राहिलेले आहेत त्यांना विशेष वागणूक दिली पाहिजे. नाना प्रकारची कारणे काढून त्यांना द्यावयाच्या वागणुकीमध्ये अडसर आणणा-यांनी इतिहास समजून घेतला पाहिजे. लोकांना जोपर्यन्त समजत नाही तोपर्यन्त ठीक आहे. एक फारच साधी गोष्ट मी सांगतो. माननीय सहकार मंत्री डॉ. पतंगराव हे या चर्चेला उत्तर देणार आहेत. माननीय राज्यपालांनी डायरेक्शन काढून शासनाला असे सांगितले की, हे जे मागासलेले भाग आहेत त्यांना प्रशासकीय मान्यतेचे अधिकार रिजनल लेव्हलला द्या.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

15 डिसेंबर, 2001 ला डायरेक्टिव्हज काढले. त्याच्या पॅरा 7.13 मध्ये हे डायरेक्टिव्हज आहेत. कृष्णा खोऱ्यासाठी असे अधिकार होते. तापी खोऱ्याला असे अधिकार होते. सुधारित प्रशासकीय मान्यता आणि प्रशासकीय मान्यता देताना फाईल मुंबईला आली नाही. पहिल्या 2-3 महिन्यांमध्ये सर्व प्रशासकीय मान्यता तुम्ही दिल्या. आज राज्यपालांनी आदेश देऊन सुध्दा 2001 पासून या क्षणापर्यंत राज्यपालांचे ते निदेश तुम्ही मानले नाही. 6 मार्च, 2003 ला पुन्हा राज्यपालांनी निदेश दिले. त्याच्या पॅरा 7.10 मध्ये पुन्हा त्यांनी सांगितले, प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार हे रिजनल लेव्हलला द्या. परंतु तुम्ही दिले नाही. तुम्ही नकटीच्या लग्नाला सतराशे विघ्न आणणारी भूमिका घेऊन 29 नोव्हेंबर, 2005 रोजी एक जी.आर.काढला. सभापती महोदय, जी.आर.काय काढला? प्रशासकीय मान्यतेचे अधिकार तेथे देणे राहिलेच, पण प्रशासकीय मान्यता देण्याचे पाटबंधारे विभागाचे अधिकार सुध्दा काढून घेतले. 5 कोटी रुपयांच्या वरचा प्रकल्प असेल तर वित्त विभागाला अधिकार दिले. फायनान्सचे अधिकारी घटना वाचतात की नाही, 371(2) त्यांना माहिती आहे की नाही, पंतप्रधान कोण आहेत हे त्यांना माहिती आहे की नाही, राष्ट्रपतींचे आदेश त्यांना माहिती आहे की नाही, राज्यपाल राज्याचे उच्च पदाधिकारी आहेत हे त्यांना माहिती आहे की नाही? ते बसून तेथे कारकुनी काड्या करतात. त्यांचे स्वरुप काय असते हे वाचून दाखवितो. इथे अनुशेष शिल्लक आहे का? हे फाईलवर लिहिले आहे. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी पहावे. ज्या 6 जिल्हयांबाबत देशाचे पंतप्रधान काय सांगतात ते वाचून दाखवितो. त्या 6 जिल्हयातील लहान लहान प्रकल्प आहेत. या वित्त विभागाने हे थर्डक्लास शेरे, थर्डक्लास मनोवृत्तीचे दर्शन करणारे शेरे मारले. "इथे अजून अनुशेष शिल्लक आहे का याचा पाटबंधारे विभागाने खुलासा करावा. निधीचे thin spread होऊ नये." वित्त विभागाचे हे अधिकारी वर्ग.1 चे असावे. निधीचे thin spread होऊ नये असा शेरा मारला आहे. हे लहान लहान प्रकल्प आहेत. त्या अधिकाऱ्यांची इज्जत ठेवून याठिकाणी बोलले पाहिजे. त्यांची सुध्दा अब्रू आहे. अकोला जिल्हयातील सुकळी नावाचा लघुपाटबंधारे प्रकल्प आहे. जलसिंचन विभागाने सांगितले की, ताबडतोब निधी दिला पाहिजे, बॅकलॉगमधील 5.53 कोटीचे काम आहे. सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांनी 4.53 कोटीचा करुन हे काम काढून घेतले असते. परंतु विदर्भातील प्रामाणिक अधिकारी, त्यांनी 5.53 कोटीचा प्रकल्प केला, तो अडून पडला आहे. यवतमाळ

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

जिल्हयातील बाणगाव हा प्रकल्प 5.34 कोटी रुपयांचा आहे. अधिकारी किती काटेकोर काम करतात? बाहेगाव 14 कोटी, खरगा 23 कोटी, बुलढाणा जिल्हयातील दिग्रस लघुपाटबंधारे प्रकल्प 7.06 कोटी, डोंगर शेवडी 5.35, मैलाडोह, वांगनदी, अमरावती जिल्हयातील पांग, वाशिम जिल्हयातील करंजगाव, नागठाणा 2, निम्नचारगड, सिंदी बोर्डीनाला बंधारा हे सर्व लघुपाटबंधारे प्रकल्प आहेत. त्या जी.आर.मध्ये एक वाक्य नमूद केले पाहिजे. नशापाणी न करता जी.आर.काढण्यात आला आहे. कोण आहे तो वित्त विभागाचा अधिकारी याचे उत्तर द्यावे. त्याला विचारले पाहिजे, काय अधिकार आहे तूला, राज्याच्या राज्यपालांनी आदेश काढल्यानंतर, राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी आणि मंत्रिमंडळाने अनुशेष दूर करण्याविषयी धोरणात्मक निवेदन केल्यानंतर काय झालेले आहे? धोरणात्मक निवेदन केल्यानंतर, देशाच्या पंतप्रधानांनी त्याबाबत स्पष्टपणे भूमिका मांडली आहे. म्हणून माझे म्हणणे असे आहे की.....

(नंतर श्री.जुन्नरे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी. देशमुख.....

म्हणून माझे पहिले म्हणणे असे आहे की, महाराष्ट्रामध्ये जलसंधारणाचा विषमतोल, असमतोल विकास ही एक लज्जास्पद गोष्ट आहे. हा असमतोल वाढविण्यासाठी दिलेली सारी कारणे खिशात ठेवा. मी माननीय पंतप्रधानांचे जरुर आभार मानतो तसेच त्यांना धन्यवाद सुध्दा देऊ इच्दितो. माननीय पंतप्रधान आपल्या समवेत केंद्रीय कृषी मंत्र्यांना तसेच केंद्राच्या अनेक मंत्र्यांना आपल्या सोबत घेऊन आले. संपूर्ण भारतामध्ये फक्त महाराष्ट्रातच ही व्यवस्था आहे. अशी व्यवस्था इतर कोणत्याही राज्यात नाही. घटनेत हे कलम 1956 मध्ये आले. यासंदर्भात दोन्ही सभागृहाने 27 जुलै, 1984 मध्ये विनंती केली होती. महाराष्ट्र राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहाने एकमताने ठराव करुन माननीय राष्ट्रपतींना अशी विनंती केली की, तुम्ही आता कलम 371 (2) चे जमवा. यासंदर्भात माननीय राष्ट्रपतींचा आदेश 9 मार्च, 1994 मध्ये निघाला. हे आमचे भाग्य आणि अपयश सुध्दा आहे. 1994 मध्ये आदेश निघाल्यानंतर डायरेक्शन्स 15 डिसेंबर, 2001 मध्ये निघाले व त्याची अंमलबजावणी एकाही वर्षी झाली नाही. (अडथळा)

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, इंडिकेटर समितीचा अहवाल 1997 मध्ये युतीचे शासन सत्तेवर असतांना आला. युती शासनाचा कालावधी संपण्यापर्यंत हा अहवाल बासनात गुंडाळून ठेवण्यात आला होता. हा अहवाल बाहेर काढण्याचे काम या पुरोगामी लोकशाही आघाडी शासनाने केलेले आहे एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

प्रा.बी.टी.देशमुख : या विषयाच्या संदर्भात माननीय महादेवराव शिवणकरांचा चार वेळा निषेध करुन सभात्याग केल्यानंतर नागपूर अधिवेशनात माननीय श्री. जयंत पाटील साहेबांचा निषेध करुन सभात्याग करुन मी बाहेर पडलो होतो. आपण म्हणता त्याप्रमाणे हा रिपोर्ट युतीशासनाने मान्य केलेला आहे ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. परंतु आज तुम्ही राज्यकर्ते आहात. मी ही गोष्ट या सभागृहात वारंवार सांगितलेली आहे की, महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली तेव्हापासून आतापर्यंत एकही वर्ष असे नाही की, ज्यावर्षी अनुशेष वाढला नाही. दांडेकर समितीची शिफारस आल्यानंतर एकाही सरकाने त्यातील एकही शिफारस मान्य केली नाही. यासंदर्भात मी सभागृहात बोललो, लेखी सुध्दा दिलेले आहे. माझे एवढेच म्हणणे आहे की, तुम्ही हे किती दिवस चिवडत बसणार आहात? आता आपण सरकार आहोत याची आपण जाणीव ठेवली पाहिजे. म्हणून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. बी.टी.देशमुख...)

यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय जाहीर केला पाहिजे. यासंदर्भातील जी काही लेव्हल असेल ती तुम्ही ठरवा. माननीय पंतप्रधांनानी हायली डिस्ट्रेस्ड एरियामध्ये रिलीफ दिलेला आहे. खालच्यांना देऊ नये अशी तुम्हाला मनाई नाही. यामध्ये असे होता कामा नये की, तिकडे शेतक-यांच्या आत्महत्या होतात म्हणून इकडे, अनुशेष नसलेल्या जिल्हयांमध्ये कोणी तरी मोर्चे काढतात आणि असे सांगतात की हे काही बरोबर नाही. यासंदर्भात माननीय राष्ट्रपतींकडे,माननीय पंतप्रधांनांकडे, माननीय मुख्यमंत्र्यांकडे वारंवार मी मागणी केलेली आहे. माझे असे स्पष्ट म्हणणे आहे की, महाराष्ट्रामध्ये जलसिंचन सुविधेपासून वंचित असलेले जे विभाग आहेत.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.बी.टी.देशमुख.....

त्यांना जलसिंचन असुविधेपोटी सानुग्रह अनुदान दिले पाहिजे. आमदार आणि खासदारांच्या झालेल्या बैठकीमध्ये जो ठराव पास झाला त्याची प्रत माननीय मुख्यमंत्री आणि माननीय उपमुख्यमंत्री आणि पाटबंधारे मंत्री यांना देण्यात आलेली आहे. त्या ठरावात असे नमूद करण्यात आले होते की, "जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान देण्याची मागणी करण्यात येत आहे. जलसिंचनाच्या विकास क्षेत्रातील अद्यावत सरासरीवर 1000 कोटी रुपयांच्यावर अनुशेष असलेल्या प्रत्येक जिल्ह्यामध्ये कोरडवाहू शेतील प्रतिहेक्टरी 10 हजार रुपये व 1000 कोटी रुपयांपेक्षा कमी अनुशेष असलेल्या जिल्ह्यामध्ये 5 हजार कोटी रुपये प्रति हेक्टर हे सानुग्रह अनुदान देण्यात यावे." सभापती महोदय, आमचे असे म्हणणे आहे की, ज्यादिवशी अनुशेष संपेल त्यादिवसापासून हे सानुग्रह अनुदान बंद करावे. ही मागणी आम्ही का करीत आहोत ? जेथे 70-80 टक्के सिंचनाची क्षमता झालेली आहे त्याठिकाणी पर हेक्टरी 2-3-4-5 लाख रुपये तर काही ठिक्राणी 20 लाख रुपये दिलेले आहेत. टेंभू प्रकल्प 2100 कोटी रुपयांचा आहे. या प्रकल्पावर 700 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. पंपिंगसाठी पर हेक्टरी 46 हजार रुपये खर्च आहे असे शासन सांगत आहे. तेव्हा आपण प्रायश्चित म्हणून त्या भागातील शेतकऱ्यांना 10 हजार रुपये सानुग्रह अनुदान दिले पाहिजे. माझे तर असे म्हणणे आहे की, कोकण असो, विदर्भ असो, मराठवाडा असो वा खानदेश असो ज्याठिकाणी अनुशेष असेल त्या भागातील शेतकऱ्यांना अनुशेषाप्रमाणे सानुग्रह अनुदान दिले पाहिजे. पापक्षालन करण्याचा हा एक मार्ग आहे. अनुशेषग्रस्त भागातील काही प्रकल्प वित्त विभागात अडकून पडले आहेत ते लवकरात लवकर मार्गी लावावेत अशी, माझी आपल्यामार्फत त्यांना विनंती आहे. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख (उस्मानाबाद-बीड-लातूर स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 (अ) अन्वये अत्यंत गंभीर अशा विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे. त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यामध्ये गेल्या काही वर्षापासून शेतकरी कर्जबाजारी झाल्यामुळे मोठ्या प्रमाणावर आत्महत्या करीत आहेत. ही बाब निश्चितपणे गंभीर आहे. याठिकाणी माझ्या अगोदर मान्यवर व्यक्तींनी त्यांचे विचार आणि काही आकडेवारी सभागृहात मांडली. विदर्भात होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबत देशाचे पंतप्रधान माननीय डॉ.मनमोहन सिंग यांनी विदर्भाचा दौरा केला व शेतकऱ्यांसाठी 3750 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. यापूर्वी राज्य सरकारने देखील शेतकऱ्यांना आर्थिक मदत केलेली आहे. सभापती महोदय, आपण सर्वांनी शेतकऱ्यांच्या मूळ प्रश्नाकडे लक्ष दिले पाहिजे. आपण सर्वांनी एकत्रितपणे विचार करुन राज्य सरकारला काय सूचना देता येतील याबाबत गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. केवळ चिंता व्यक्त करुन चालणार नाही तर या विषयावर चिंतन होणे गरजेचे आहे हे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. शेतकरी कर्जबाजारी झाला म्हणून आत्महत्या करतात. ते का आत्महत्या करतात याचा आपण विचार केला पाहिजे. आपणास असे दिसून येईल की, विदर्भामध्ये 70-80 टक्के शेती ही कोरडवाहू आहे. जे पीक घेतले जाते त्यावर शेतकरी स्वत:च्या कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवू शकत नाही अशाप्रकारची परिस्थिती आहे. शेतकरी कर्ज काढून शेती करतो परंतु त्याला शेतीतून पाहिजे तसे उत्पन्न मिळत नाही.

यानंतर श्री.पुरी.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख...

म्हणून तो कर्जबाजारी होतो. याबाबतीत आपण खाजगी सावकार किंवा बँका हा विषय वेगळा ठेऊ. यामध्ये मूळ गोष्ट अशी आहे की, शेतकऱ्यांकडे शेती करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. शेतीतून कर्ज फेडण्याइतपत, त्यांच्या कुटुंबियांचा उदरनिर्वाह करण्याइतपत किंवा त्यांच्या गरजा भागविण्या इतपत उत्पन्न त्या शेतीतून निघत नाही, हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे. त्यामुळेच आपण त्यांना पॅकेजच्या माध्यमातून मदत करतो, अशा प्रकारची मदत आपण केलीच पाहिजे. परंतु अशी मदत करीत असताना याबाबतीतील जबाबदारी नेमकी कोणाची आहे, याबाबतीत एकमेकांवर आरोप करण्यामध्ये वेळ न घालवता, याबाबतीत एक समिती असणे गरजेचे आहे. याबाबतीतील मुख्यत: जबाबदारी ही राज्य सरकारची येत असल्यामुळे या मुद्दाच्या बाबतीत विरोधी पक्षाने राज्य सरकारचे लक्ष वेधने हे योग्य असून ते त्यांचे कर्तव्यच आहे. मला असे वाटते की, एवढयावरुन हा प्रश्न सुटणार नाही. आता विभक्त कुटुंबामध्ये शेती करणे सोपे राहिलेले नाही. त्यामध्ये अनेक अडचणी आहेत. आज खतांचे, बियाणांचे व मजुरीचे दर फार वाढलेले आहेत. आता शेती करणे हे एक शास्त्र झाले आहे. शेतीतून उत्पन्न मिळण्याच्या दृष्टीने शेती मालाला चांगले भाव मिळाले पाहिजेत. शेतक-यांच्या शेती मालास चांगले दिवस व मार्केट उपलब्ध करावयाचे असेल तर महाराष्ट्रामध्ये शेती प्रक्रिया करणारी कारखानदारी निर्माण झाली पाहिजे. या माध्यमातून आपण राज्याचा विचार करीत असताना प्रामुख्याने विदर्भातील 6 जिल्हयांचा विचार करीत आहोत. याठिकाणी आपल्याला दिसून येईल की, कोरडवाहू शेती असल्यामुळे शेतीतून उत्पन्न मिळत नाही. याठिकाणी माझ्या एका सहकाऱ्याने सांगितले की, आम्ही कापूस शेतीवर अवलंबून राहिलो तर आमचे शेतकरी सक्षम होणार नाहीत वा ते स्वत:च्या पायावर उभे राहू शकणार नाहीत. त्याबाबतीत आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. त्या भागामध्ये नगदी पीक घेतले जाते. नगदी पिकाचा विचार करता, आपण सोयाबीनसारखे व ऊसासारखे पीक घ्यावेत. ज्या देशाची अर्थव्यवस्था उद्योगावर आहे, ते देश श्रीमंत झाले आहेत व ज्या देशांची अर्थव्यवस्था शेतीवर आहे, त्यामध्ये जपानसारखा देश सोडला तर बाकीचे देश हे गरीब आहेत. कारण, निसर्गाच्या लहरीवर शेतीची अर्थव्यवस्था अवलंबून असल्यामुळे या संदर्भात एकेरी विचार केला पाहिजे. आपण शेतकऱ्यांना नव्याने कर्ज दिले पाहिजेत. एवढे करुनही शेतीमध्ये काहीच पिकणार नसेल तर शेतकऱ्यांनी आपल्या शेतीमध्ये

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख...

जोडधंदा निर्माण केला पाहिजे. कारखानदारी व्यवस्थित चालत नसेल तर याबाबतीत आपण विचार केला पाहिजे. मला वाटते की, या योजनेचे जर सरकारीकरण झाले नाही व सरकारी अधिकाऱ्यांमार्फत ही योजना राबवायचे ठरले तर ती योजना 100 टक्के यशस्वी होईल, असे मला वाटते नाही. आपण कितीही प्रामाणिक प्रयत्न केले तरीही असे शक्य वाटत नाही. त्यामुळे याबाबतीत सामुहिक चळवळ निर्माण होण्याच्या आवश्यकता आहे. मला वाटते की, याठिकाणी कोणी तरी शेतकऱ्यांस दिलासा देण्याची गरज आहे. आपण जर त्यांना मदत केली नाही तर हा आत्महत्येचा प्रश्न सुटणार नाही. आपण त्यांना मदत केली नाही तर आपल्याला परत या प्रश्नास सामोरे जावे लागणार आहे, त्यांच्या हक्कासाठी आपल्यालाच भांडावे लागणार आहे, प्रसंगी आपल्यालाच त्यांच्यासाठी रस्त्यावर यावे लागणार आहे. या सगळ्यांमधून एक नकारात्मक अशा प्रकारची भूमिका आज शेतकऱ्यांची झालेली आहे. यामधून त्यांच्यामध्ये अशा प्रकारचे डिप्रेशन आल्यामुळे आता आपल्यापुढे दुसरा कुठलाही पर्याय उरला नसल्याने ते मरणाचा मार्ग स्वीकारत आहेत. या परिस्थितीमध्ये त्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न झाले पाहिजेत. याबाबतीत सरकारी यंत्रणा तसे काही करु शकणार नाही. आपण सर्वांनी राजकारण बाजूला ठेऊन त्यांचे मनोबल वाढविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. दुर्दैवाने ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत, त्यांना आपण परत आणू शकत नाहीत. या माध्यमातून प्रत्येक कुटुंबांना आपण एक लाख रुपये मदत करतो. तो काही आत्महत्या थांबवण्याचा प्रकार नाही.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / शीघ्रलेखापी नाही

श्री.दिलीप देशमुख.....

भविष्यात या राज्यातील शेतक-यांच्या आत्महत्या टाळावयाच्या असतील तर एक इंटिग्रेटेड स्किम तयार करावी लागेल. कुठे तरी नैसर्गिक आपत्ती ओढवली, एखादी घटना घडली म्हणजे केवळ चिकटपट्टी लावून हे प्रश्न सुटणार नाहीत. म्हणून माझी विनंती राहणार आहे की, हे केवळ सरकारचे काम नाही. या ठिकाणी या चर्चेच्या निमित्ताने विरोधी पक्षातील नेत्यांनी अतिशय पोटतिडकीने भूमिका मांडली, प्रश्न मांडले. परंतु, केवळ चर्चेने हा प्रश्न सुटणारा नाही. विरोधी पक्षातील नेत्यांची, शासनातील मंत्र्यांची मिळून एक समिती नेमा. वर्तमानपत्र वाचल्यानंतर आणि आता या ठिकाणी सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकल्यानंतर एक गोष्ट माझ्या लक्षात आली की, या प्रश्नाचे श्रेय कोणी घ्यायचे, याबाबतचा प्रयत्न सुरु आहे. विरोधी पक्ष म्हणून त्यांनी सरकारच्या उणिवा या ठिकाणी मांडल्या, विरोधी पक्षाचे ते कर्तव्य आहे, त्यांनी जरुर बोलावे. परंतु, माझ यासारख्या सामान्य कार्यकर्त्याला असे वाटते की, चर्चेतून, आरोप-प्रत्यारोपातून हा प्रश्न सुटेल, विदर्भातील प्रश्न सुटेल अशी कल्पना आपण करीत असाल तर ती कल्पना अपूर्ण आहे. एकत्रितपणे या प्रश्नाच्या संदर्भात प्रयत्न करणे गरजेचे आहे. विरोधी पक्षाच्या मित्रांना विश्वासात घेऊन एक समिती नेमण्यात यावी, ही समिती आरोप-प्रत्यारोपासाठी नव्हे तर यासंदर्भातील त्यांच्या ज्या सूचना असतील, त्यांच्या काही कल्पना असतील, सरकारकडून आणखी काय करणे अपेक्षित आहे, यासंदर्भात समिती असणे आवश्यक आहे. सरकारने मध्यंतरी काही चांगले निर्णय घेतले. मागच्या कालखंडात सातत्याने या राज्यामध्ये नैसर्गिक आपत्ती आल्या. पूरपरिस्थिती निर्माण झाली, कापसावर लाल्यासारखा रोग निर्माण झाला, गारपीट झाली. जेंव्हा जेंव्हा दुर्दैवाने या राज्यात नैसर्गिक आपत्ती आली, राज्य सरकारने करोडो रुपयांची मदत त्या ठिकाणी दिलेली आहे. सरकारने केलेल्या मदतीची आकडेवारी माझ्याकडे आहे. कदाचित मंत्रीमहोदय आपल्या उत्तरामध्ये ही आकडेवारी सांगतील. ती सांगून मी सभागृहाचा वेळ घेणार नाही.

सभापती महोदय, आत्महत्येसंदर्भातील दुसरा मुद्दा हा आहे की, शेतक-यांना मुलीच्या लग्नाचा खर्च करावा लागतो, दुर्दैवाने हुंडा पध्दत नाही म्हटले तरी समाजामध्ये आहे. यासंदर्भात सामुहिक विवाह होत असतील तर त्या जिल्हयाला 1 कोटी रुपयांची मदत देण्याचा चांगला निर्णय या सरकारने घेतला आहे आणि एक चांगले वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या माध्यमातून शासनाने केला आहे.

..2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख.....

सभापती महोदय, जिल्हा बँका आणि इतर बँकाचा उल्लेख अनेक सन्माननीय सदस्यांच्या भाषणातून झाला. कर्जमाफी जाहीर करीत असतांना ही मदत जिल्हा बँकांना होत आहे, ही वस्तुस्थिती आहे. या मदतीतून जिल्हा बँका आपली कर्जे वसूल करुन घेतील मग पुन्हा शेतक-यांना जेंव्हा मदत करण्याची वेळ येईल तेंव्हा ते कशा पध्दतीने मदत करणार आहेत, नियम कसे अडचणीचे होणार आहेत, या सगळया गोष्टींकडे गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, विदर्भामध्ये कापसाचे उत्पादन मोठया प्रमाणावर होत असेल तर त्या ठिकाणी मोठया प्रमाणावर सूतगिरण्या उभ्या राहिल्या पाहिजेत व त्या चांगल्या पध्दतीने चालल्या पाहिजेत. जेथे जे पिकते तेथे त्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग काढले तर शेतकरी कर्जबाजारी होणार नाही आणि त्यांच्यावर आत्महत्या करण्याचा प्रसंग येणार नाही, याही गोष्टी समजून घेतल्या पाहिजेत.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.बी.टी.देशमुख हे सिंचनाच्या अनुशेषाबाबत अतिशय पोटतिडकीने आपले म्हणणे सभागृहात मांडत असतात. कधी कधी नाईलाजाने सांगावे लागते की, विदर्भ, मराठवाडयावरील अन्याय या सरकारकडून कमी झालेला नाही. मंत्रीमहोदय या सगळया गोष्टींकडे लक्ष देऊन सर्व भागांना समान न्याय कसा मिळेल, हक्काचे आहे ते त्यांना कसे मिळेल याबाबत भूमिका निश्चित करतील, अशी अपेक्षा आहे. ही भूमिका राज्य सरकारने वठवावी अशा प्रकारची अपेक्षा यामाध्यमातून मी करतो.

सभापती महोदय, स्वामीनाथन् समितीने अनेक सूचना केल्या आहेत. त्या सूचनांचा देखील विचार आपल्याला करावा लागणार आहे. सध्या अशी चर्चा सुरु झाली आहे की, रिलायन्ससारख्या खाजगी कंपन्या खाजगी साखर कारखानदारीमध्ये उतरत आहेत आणि मोठया क्षमतेचे साखर कारखाने उभारणार आहेत. मंत्रीमहोदयांकडे यासंदर्भातील परवानगीसाठी या कंपन्यांना यावे लागेल. त्यावेळी त्यांना हे सांगितले पाहिजे की, एक कारखाना जर आपल्याला पश्चिम महाराष्ट्रात टाकायचा असेल तर एक कारखाना विदर्भात टाकावा लागेल, मराठवाडयात टाकावा लागेल. शेतक-यांना सक्षम करावयाचे असेल तर अशा प्रकारच्या उपाययोजना आपल्याला कराव्या लागतील. केवळ चर्चा करुन हे होणार नाही तर जिल्हया जिल्हयात पक्षनिहाय गट तयार करुन

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख.....

शेतक-यांशी कुठेतरी बोलले पाहिजे. शेतक-यांमध्ये जे डिप्रेशन निर्माण झाले आहे ते मानसोपचार डॉक्टरांकडून दूर होणार नाही तर त्यांच्याशी बोलण्याने हा प्रश्न सुटू शकेल. त्यांचे मनोबल वाढविण्याचे काम आणि त्यांच्यामध्ये निर्माण झालेल्या नकारात्मक विचारांपासून त्यांना कसे दूर करता येईल अशा प्रकारचे एक सामाजिक कार्य आपल्याला करावे लागेल, अशा प्रकारची अपेक्षा या माध्यमातून करतो.

यानंतर श्री.बोरले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिलीप देशमुख .....

माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग हे संवेदनक्षम पंतप्रधान आपल्याला लाभलेले आहेत. त्यांनी विदर्भातील गरीब शेतक-यांच्या भावना समजून घेतल्या. जे पीडित आहेत, ज्यांच्या घरामध्ये आत्महत्या झाल्या त्यांच्या कुटुंबियांना ते भेटले आणि त्यांचे म्हणणे ऐकून घेतले आणि चांगले पॅकेज दिले. अंमलबजावणी कोण करणार आहे हा महत्वाचा मुद्दा नाही. काहीही करुन आत्महत्या थांबल्या पाहिजेत एवढेच मला सांगावयाचे आहे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी नियम 289 अन्वये शेतक-यांच्या आत्महत्यांच्या प्रश्नासंबंधी जो प्रस्ताव मांडलेला आहे, त्यावर मी माझे विचार मांडण्यासाठी उभी आहे. समाजामध्ये असो किंवा विधान परिषदेमध्ये असो महिला म्हटले की, महिला विकासाच्या प्रश्नावर बोलणे अपेक्षित असते. परंतु आपण सर्व आकडेवारी आणि महाराष्ट्राची आर्थिक पाहणी अहवाल बघितला तर शेतक-यांच्या श्रमाच्या तासापैकी 2/3 श्रमाचे तास स्त्रियांचे आहेत. ही राज्यातील नव्हे तर जगातील आकडेवारी आहे. त्यातील किती मोलमजुरी स्त्रियांना मिळते ? एकूण मिळणा-या उत्पन्नापैकी 1/5 मजुरी स्त्रियांना मिळते. पती आणि पत्नी दोघांनीही आत्महत्या केल्याच्या घटना काही ठिकाणी घडलेल्या आहेत. काही ठिकाणी पत्नीला नांगराला बांधून शेती करण्याची देखील उदाहरणे घडलेली आहेत. काही ठिकाणी किडणी विकून चरितार्थ चालविण्याची देखील उदाहरणे आहेत. अशा प्रकारच्या शेतक-यांची यादी तयार केलेली आहे. कुटुंबातील विपन्नावस्था म्हणजे एका बाजूला कर्जाचा डोंगर आणि दुस-या बाजूला कुटुंबातील ताणतणाव या पार्श्वभूमीवर अहवालाचा विधिमंडळामध्ये वारंवार उल्लेख होतो. इंदिरा गांधी रिसर्च इन्स्टीटयुट, गोखले इन्स्टीटयुट, टाटा इन्स्टीटयुट ऑफ सोशल सर्व्हिस, यशदा, डॉ.स्वामीनाथन कमिटी व दै.सकाळ असे 6 अहवाल शेतक-यांच्या प्रश्नांवर सादर झालेले आहेत. आपण त्यासंदर्भात वारंवार विधिमंडळामध्ये चर्चा करतो. या विषयावर विरोधी पक्षाने प्रत्येक अधिवेशनात प्रस्ताव सादर करावयाचा आणि तो स्वीकृत झाला नाही तर मग आरडा ओरड करावयाची, नंतर शासनाने तो प्रस्ताव स्वीकृत करुन त्यावर उत्तर द्यावयाचे. मला असे वाटते की, रस्त्यामध्ये बंद पडलेल्या ट्रेलरसारखी सरकारची अवस्था झालेली आहे. स्वत: माननीय पंतप्रधान दौ-यासाठी येतात त्यावेळी शासनाची जबाबदारी आहे की, विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहाचे एक दिवसाचे एकत्र सत्र घेऊन 6 समित्यांच्या शिफारशी काय होत्या, शासनाने त्या शिफारशींची अंमलबजावणी केली आहे की नाही, कोणत्या विभागाने त्यावर कोणती कार्यवाही केली व किती लाभधारक किती जिल्हयांमध्ये आहेत याबाबत 6 समित्यांच्या शिफारशी विचारात घेऊन त्यासंबंधीची माहिती दिली पाहिजे. कार्यकर्त्यांनी आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या कुटुंबाची विचारपूस केली पाहिजे. शासनाचे जे अधिकारी आहेत त्यांच्याकडून कर्ज वसुलीचा तगादा शेतक-यांकडे होत असतो. परंतु शेती किफायतशीर

...3/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे .....

नसल्यामुळे आत्महत्या वाढत आहेत, असे हे चित्र आहे. सन 2001 मध्ये पश्चिम विदर्भामध्ये आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 50 होती ती सन 2006 मध्ये 220 च्यावर पोहोचली. सन 2002 मध्ये नागपूर विभागामध्ये आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 26 होती ती आज 73 वर पोहोचलेली आहे. सन 2001 मध्ये औरंगाबाद विभागामध्ये आत्महत्या करणा-या शेतक-यांची संख्या 2 होती ती सन 2005 मध्ये 50 च्यावर पोहोचली व आज सन 2006 साली 300 पर्यंत पोहोचली. नाशिक विभागामध्ये 9 शेतक-यांनी आत्महत्या केल्या होत्या. सन 2004 मध्ये ही संख्या वाढत गेल्याचे दिसून येते.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि आता 300 पर्यंत वाढती कमान आहे. नाशिक विभागामध्ये देखील सुरूवातीस 9 संख्या होती ती आता 2004 मध्ये वाढत गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रात 2001 पासून पाहिले तर सुरूवातीस 64 आणि आता 2005 अखेर 527 आणि आता 2006 च्या अर्धवर्षामध्ये त्याहीपुढे आकडा गेलेला आहे. कापूस उत्पादकांबरोबरच आता कांदा उत्पादक शेतकरी आणि इतर प्रत्येक ठिकाणी शेतकरी हा आंदोलनाच्या पवित्र्यामध्ये आहेत म्हणून महाराष्ट्राच्या विकासाचा चेहरा कुपोषण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या यामुळे मलीन झालेला आहे हे आपण आर्थिक पाहणीचा अहवाल पाहिल्यानंतर दिसून येते. या संदर्भात आपण कॉंक्रीट सजेशन्स आणि विचार मांडावेत म्हणून सांगण्यात येते. सभापती महोदय, आत्महत्या करणारे हे शेतकरी दारिद्र्यरेषेखालील होते काय ? दारिद्र्यरेषेखालील नसतील तर आपण त्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत अन्नधान्य देतो आहोत तर त्यामध्ये असे दिसते की, 1 टक्क्यापेक्षाही कमी लोक या व्यवस्थेचा फायदा घेतात. एका बाजूला आपण म्हणतो की, लोकांना नको म्हणून ते रेशनमधील धान्य घेत नाहीत, रेशनमधील धान्य निकृष्ट असते, त्यात फार मोठा भ्रष्टाचार असल्याने ही व्यवस्था बरोबर नाही. या शेतकऱ्यांच्या बाबतीत बोलावयाचे तर एका बाजूला रेशन दुकानांतून मिळणारे धान्य पुरेसे आणि सकस नसते तर दुसऱ्या बाजूला त्याच्या डोक्यावरील कर्जाचा बोजा आणि तिसरी बाजू म्हणजे त्याची कौटुंबिक स्थिती. सभापती महोदय, कुमारी दिपाली कोल्हे हिने आत्महत्या केली त्यानंतर मी त्यांच्या कुटुंबियांची भेट घेतली होती. तिच्या बहिणीला शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश पाहिजे होता, इतरही आणखी कौटुंबिक समस्या होत्या त्यामुळे त्या धाकट्या दिपालीला आत्महत्या करावीशी वाटली ही वस्तुस्थिती आहे. सभापती महोदय, गेल्या नागपूर अधिवेशनामध्ये हा मुद्दा मांडला होता की, आत्महत्या करणाऱ्या माणसाच्या नावाने खातेफोड झाली नसेल तर तो माणूस शेतकरी आहे असे मानले जात नाही आणि परिणामी त्याला नुकसान भरपाई मिळत नाही. पण त्या माणसाच्या कुटुंबाला देखील पुनर्वसनासाठी मदत दिली गेली पाहिजे. ती मिळण्याच्या बाबतीत असलेले आपले निकष बदलले पाहिजेत. ...

डॉ. पतंगराव कदम : ते निकष बदलले आहेत.

डॉ. नीलम गोऱ्हे : ते निकष बदलले आहेत असे आता मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले आहे. ती चांगली गोष्ट झाली. सभापती महोदय, या बरोबरच त्याच्या शेतीला देखील संरक्षण दिले

..... 3 डी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गेले पाहिजे. तसेच त्याला सुलभतेने आणि अल्प दराने कर्ज उपलब्ध करून दिले गेले पाहिजे. त्यासाठी जिल्हा तसेच राष्ट्रीयीकृत बँकांचे नियम शिथिल केले पाहिजेत. राष्ट्रीयीकृत बँकांनी देखील 6 टक्के दराने कर्ज द्यावे म्हणून त्यांचे त्याबाबतचे निकष बदलले आहेत काय ? नसल्यास, त्यांचेही निकष बदलणे अत्यावश्यक आहे. तसेच असलेल्या कर्जाची माफी देण्यासारखे ठोस पाऊल उचलणे देखील अत्यावश्यक आहे. राज्य शासनाचे पॅकेज, आता माननीय पंतप्रधानांचे पॅकेज आदी उपाय आपण पाहतो आहोत. पण त्यामध्ये विशेष करून कर्जफेडीची रचना कशा प्रकारे असावी हेच अधिकतर सांगितलेले आहे. सभापती महोदय, आज भारतामध्ये आर्थिक दर 8 टक्के आहे आणि शेतीमध्ये तो दीड टक्का आहे. ही तफावत भरून काढण्यासाठी शेती क्षेत्राला संरक्षण मिळत नाही तोपर्यंत सावकारी पाशातून शेतकऱ्याला सुटका मिळणे मुश्कील आहे. या बाबतीत लोक डायरेक्ट काहीच बोलत नाहीत. कारण त्यातून कुटुंबाची अब्रू जाते. पण कर्जफेडीसाठी सावकार घरातील मुलीबाळींना देखील उचलून नेण्याचे प्रकार घडले आहेत. गेल्याच अधिवेशनामध्ये 2 प्रश्न, 1 लक्षवेधी सूचना आणि नियम 93 ची सूचना याद्वारे आम्ही अशा घटना येथे मांडण्याचा प्रयत्न केला होता. काही सावकार या पद्धतीने देखील गावामध्ये दहशत, दबाव निर्माण करतात. सांगलीमध्येच अशी एक घटना घडली होती. सभापती महोदय, सगळे जण बोलताना बोलतात की, शेतकऱ्यांचे समुपदेशन केले पाहिजे. त्यांचे मानसिक संतुलन सांभाळले पाहिजे. मोठमोठ्या शहरांमध्ये आपण टीव्ही वरून मोठमोठ्या मॉलच्या जाहिराती पाहतो. एका बाजूला प्रचंड सुख-चैन असल्याचे त्यातून दिसून येते. वॉटर पार्क, वेगवगेळ्या कंपन्यांच्या गाड्या, इत्यादींची चित्रे आपण त्यातून पाहतो. आणि दुसरीकडे ग्रामीण भागामध्ये घरात गेल्यावर जेवणदेखील मिळत नाही म्हटल्यावर तो माणूस दारूच्या अधीन होणार नाही तर काय करणार ? म्हणजे शेतकऱ्यांना काही द्यायचे म्हटल्यावर आखडता हात घेतला जातो त्यामुळे शेतकऱ्यांना आधार देणारे कोणी नाही असे जाणवते. त्यामुळेच या आत्महत्या मोठ्या संख्येने होत आहेत. त्यामुळेच शेतकऱ्यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला आहे, अमरावती, पुणे जिल्ह्यामध्ये त्यातूनच शेतकऱ्यांवर गोळीबार झालेले आहेत. ....

(यानंतर श्री. सरफरे .... 3इ 1 ...

अशुद्धीत पत्र / शुद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

आणि दुसऱ्या बाजूला शेतकरी आत्महत्येच्या कात्रीमध्ये सापडला आहे. माझ्या भाषणानंतर आणि माननीय सदस्यांच्या भाषणानंतर मंत्रिमहोदय उत्तर देणार आहेत. त्यावेळी मी सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे सहाही अहवालांची अंमलबजावणी झाली की नाही? याबाबत त्या अल्पभूधारकांच्या यादीसह सदनाला माहिती उपलब्ध करुन दिली पाहिजे तरच त्या उत्तरदायित्वाला अर्थ आहे असे मला वाटते. माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी मुद्दा मांडला की, एखादा जी.आर. अधिकाऱ्यांना दाखविला तर अधिकारी म्हणतात की, तो आमच्याकडे आला नाही. विशेषत: लोकांच्या होडया वाहून गेल्या असतील तर त्यांची नुकसान भरपाई दिली जाईल यासंबधी पुर्नवसन विभागाने जी.आर. काढला आहे. यासंबंधी पुणे जिल्हयातील संबंधित अधिकाऱ्यांना तो जी.आर. दाखविला असता त्यांनी हा जी.आर. आमच्याकडे आला आहे की नाही हे आम्हाला तपासून बघावे लागेल असे सांगितले. लोकांच्या होडया वाहून गेल्यामुळे त्यांच्यावर तरंगत जाण्याची वेळ आली आहे. अशाप्रकारे आपण या प्रश्नाची सोडवणूक करण्याकरीता सातत्याने किती दिवस फॉलोअप करीत राहणार आहोत? म्हणून माझे असे म्हणणे आहे की, हे निर्णय लोकांपर्यंत पोहोचण्याच्या दृष्टीने आपण रचना तयार केली पाहिजे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्तेच्या प्रश्नावर या सदनातील एक महिला सदस्य म्हणून बोलत असतांना आणि या सदनाच्या बाहेर एक सामाजिक कार्यकर्ती म्हणून वावरत असतांना मला असे वाटते की, शेतकऱ्यांच्या कुटुंबातील महिलांना निवेदन देतांना मिडियाच्या मार्फत दूरदर्शनवर दाखविले जाते. परंतु त्यांनी निवेदन दिल्यानंतर त्यांचे पुढे काय होते? शासनाच्या महिला व बाल कल्याण विभागातील, ग्राम विकास विभागातील अधिकारी व कर्मचारी हे त्या महिलांनी जेवणखाण केले आहे की नाही हे तरी बघतात काय? केवळ वस्तू म्हणून त्यांचा उपयोग करुन घेतला जातो. त्यांच्या अश्रूंचे आपण भांडवल करीत आहात असे मला वाटते. म्हणून मला असे वाटते की, सरसकटपणे ज्या ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्त्या केल्या आहेत त्यांच्या कुटुंबामधील स्त्रिया व मुलींसाठी पुनर्वसन प्रकल्प आपण हाती घेतला पाहिजे. यासंबंधी शासनाचे अधिकारी असे म्हणतात की, त्यांना पुनर्वसनाची मदत दिली तर ते जास्त प्रमाणात आत्महत्त्या करतील. परंतु आपल्याला एखादा आजार झालेला नाही अशी खोटी समजूत करुन घेण्यापेक्षा शेतकऱ्याच्या कुटुंबामध्ये सामूहिक आत्महत्त्या व्हावयाच्या नसतील तर आपल्याला याचा विचार करावा लागेल. उदा.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे....

पूर्वीच्या काळात राजस्थानमध्ये स्त्रिया सामूहिकरित्या सती जात होत्या, तशाप्रकारची परिस्थिती विदर्भामध्ये ओढवल्याशिवाय राहणार नाही. महाराष्ट्रातील गरीब शेतकऱ्यांच्या मुली-बाळींची विक्री नागपूर आणि दिल्लीच्या कोठयांमध्ये मोठया प्रमाणामध्ये होते. त्या संदर्भात शासनाने विचार करुन त्यांच्याकरीता सुरक्षित उपाययोजना केली पाहिजे. आमच्या भाषणाच्या वेळी मंत्रिमहोदयांना मुहूर्त सापडला त्याबद्दल त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. परंतु आज समाजातील स्त्रीया आणि त्यांचे कुटुंबिय ज्या आशेने या सदनाकडे बघत आहे त्या कुटुंबामधीलच एक भगिनी त्यांचे प्रश्न या सदनामध्ये मांडीत आहे. त्या भूमिकेतून त्या संबंधीचे विचार मांडण्यासाठी आपण मला संधी दिली त्याबद्दल मी सभागृहाचे आभार मानून माझे दोन शब्द संपविते.

जय महाराष्ट्र.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते श्री. भाऊसाहेब फुंडकर यांनी नियम 289 अन्वये विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्तेविषयी चर्चा उपस्थित केली आहे. त्या संदर्भात माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. गेल्या चार वर्षापासून प्रत्येक अधिवेशनामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंबंधी चर्चा उपस्थित होते आणि सरकारतर्फे आश्वासने दिली जातात. परंतु शेतकऱ्यांच्या आत्महत्तेवर प्रतिबंध येण्याऐवजी, त्याला रोक लागण्याऐवजी दिवसें दिवस शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या वाढत चालल्या आहेत. ही केवळ विरोधी पक्षाची किंवा सत्ताधारी पक्षाची चिंता नाही तर समस्य राज्यातील जनतेची चिंता आहे. या राज्यातील जनता देखील शेतकऱ्यांच्या आत्महत्तेमुळे हवालदिल झाली आहे. या देशाचे पंतप्रधान माननीय श्री. मनमोहनसिंह यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंदर्भात विदर्भाचा दौरा केला. त्या प्रसंगी या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्तेसंदर्भात जी प्रतिक्रिया दिली ती अत्यंत बोलकी आहे. शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्त्या या राज्यासाठी आणि आमच्या सरकारसाठी अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. अशाप्रकारचे वक्तव्य या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी केले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु....

यावरुन विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्याची परिस्थिती किती भयानक, विदारक आहे याची सर्वांना कल्पना येईल. सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.भाऊसाहेब फुंडकर, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, नितीन गडकरी, गुरुनाथ कुलकर्णी, प्रा.बी.टी. देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख यांनी पोटतिडकीने शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय मांडला. केवळ चर्चेसाठी चर्चा करायची नाही, तर कारणांची मिमांसा, आणि त्याचे परिणाम या संदर्भात आमच्या सरकारने आत्महत्या थांबविण्यासाठी कोणती ठोस उपाययोजना केली, हा महत्वाचा मुद्दा आहे. युती सरकारच्या काळामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत होत्या आणि ती परंपरा पुढे चालत आली. आजही शेतकऱ्यांच्या आत्महत्या सुरुच आहेत. या आत्महत्या कोठेतरी खंडित करणे आवश्यक आहे. आमचे लोकप्रतिनिधी आणि पालक मंत्री असूनही त्यांच्या जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. आमची नोकरशाही ही पंतप्रधान विदर्भाच्या दौऱ्यावर येणार आहेत, म्हणून राज्याचे मुख्य सचिव हे नागपूर येथे मुक्काम ठोकून अधिकाऱ्यांच्या बैठका घेत होते. पण या बैठका पंतप्रधान येण्याच्या अगोदर घेतल्या असत्या आणि उपाययोजना करण्यासाठी डोक्याला डोके लावून बसले असते तर गंभीरपणाने ठोसपणे कारवाई करता आली असती. पण त्यांना प्रधानमंत्री येण्यापूर्वी सवड मिळाली नाही. आमच्या राज्याची नोकरशाही मुर्दाड आणि संवेदनाहीन आहे. ही अत्यंत गंभीर अशाप्रकारची बाब आहे. मी जास्त वेळ घेणार नाही. शेतकऱ्यांनी कशा प्रकारच्या आत्महत्या केलेल्या आहेत, हे पहाणे गरजेचे आहे. पंतप्रधान विदर्भाच्या दौऱ्यावर येणार म्हणून दूरदर्शनवरुन आत्महत्येच्या संदर्भात त्याची कारणमिमांसा करणारी काही माहिती प्रसारित करण्यात आली. त्या माहितीमध्ये सांगण्यात आले की, जवळपास 2000 पेक्षाही जास्त शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. आत्महत्येच्या कारणांमध्ये पाहिले तर आज विदर्भाच्या विकासाचा अनुशेष 21 हजार कोटीचा आहे. महाराष्ट्र निर्मितीपासून विदर्भाचा सिंचनाचा अनुशेष जवळजवळ 16 हजार कोटीचा दाखविण्यात आलेला आहे. सिंचनाच्या संदर्भात सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री.नितीन गडकरी यांनी आर्टिकल 371 (2) खाली तरतूद करण्यात आली, त्या संदर्भात विदर्भ आणि मराठवाडा विभागावर कसा अन्याय करण्यात आला, याची आकडेवारी सांगितली. अनेक प्रकारचे प्रकल्प आहेत. मग त्यामध्ये गोशीखुर्द, बेंबळा, खडकपूर्णा प्रकल्प असतील, गडचिरोली जिल्हयातील, तुळतुळी प्रकल्प असेल, चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन प्रकल्प असेल, अमरावती, यवतमाळ, वर्धा इ. जिल्ह्यातील प्रकल्प असतील, विदर्भातील 11 जिल्ह्याच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ KGS/ MAP/

प्रा.जोगेंद्र कवाडे (पुढे सुरु.....

सिंचनाच्या प्रकल्पाच्या बाबतीत प्राधान्याने लक्ष द्यायला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.दिलीप देशमुख म्हणाले, त्या प्रमाणे कोरडवाहू शेती ही निसर्गाच्या लहरीवर अवलंबून असते. निसर्ग फुलला तर शेतकऱ्यांना आनंद होतो.

यानंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

आणि निसर्गाचा प्रकोप झाला तर मात्र सर्वच मुसळ केरात अशी परिस्थिती निर्माण होते. कधी टंचाईग्रस्त परिस्थिती आहे, कधी नापिकीची परिस्थिती आहे, कधी महापूर आहे तर कधी निसर्गाचे संकट आहे. निसर्गाचे संकट आले तर समजू शकतो. अस्मानी संकट आले तर समजू शकतो, परंतु सुलतानी संकटाचे काय ? सरकारच्या माध्यमातून, प्रशासनाच्या माध्यमातून, आमच्या नोकरशाहीच्या माध्यमातून आम्ही हे येणारे संकट टाळू शकतो की नाही ? या संकटाची भीषणता कमी करु शकतो की नाही ? ही संवेदना आमच्या प्रशासनामध्ये निर्माण होणार की नाही ? हायफाय कल्चरमध्ये वावरणारी आमची नोकरशाही, एअरकंडीशनमध्ये राहणारी आमची नोकरशाही, आमची प्रशासकीय यंत्रणा या मरणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल अत्यंत संवेदनाहीन आहे. शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्येबद्दल सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी एक गोष्ट सांगितली. कालपरवा पत्रकाराना देखील सांगण्यात आले की, विदर्भातील ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यामध्ये जवळजवळ 75 ते 80 टक्के शेतकरी हे अल्प भूधारक, मध्यम भूधारक, दलित, आदिवासी, ओबीसी समाजाचे आहेत. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी ही संख्या 76 टक्के असल्याचे सांगितले. ही आकडेवारी पाहून कधी कधी असे वाटते की, दलित शेतकरी मरत आहेत, आदिवासी शेतकरी मरत आहेत, ओबीसी शेतकरी मरत आहेत तर त्यांना मरु द्या, आपल्याला त्याचे काय देणे-घेणे ? अशी सापत्नभावाची वागणूक मिळत आहे. मागासवर्गीय शेतकरी मरत आहेत म्हणून अशी दुरावस्था आहे. ही शासनाची निष्क्रियता तर नाही ना असे वाटते. असे असू नये. दलित, आदिवासी, ओबीसी, मागासवर्गीय, गरीब शेतकरी मरत आहे तर मरु द्या या भूमिकेतून जर जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असेल तर मात्र सामाजिक न्यायाची भूमिका घेणाऱ्या महाराष्ट्राच्या सरकारसाठी ती लाजिरवाणी बाब असेल. असा संदेश बाहेर जाता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांनी सांगितले की, ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्यापैकी 76 टक्के शेतकरी दलित, आदिवासी, मागासवर्गीय समाजाचे आहेत. ते मरतात तर मरु द्या असा संदेश जाणे बरोबर नाही. हा अंदाज खरा नसेल तर बरे होईल. परंतु जर अशा प्रकारचा अंदाज असेल तर त्यातून काय संदेश जाणार आहे ? सन्माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचा अंदाज चुकीचा असेल तर बरेच आहे. परंतु शेतकरी मरत आहेत हे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

सत्य आहे. शेतकरी आत्महत्या करत आहेत हे सत्य आहे. यासंदर्भात आतापर्यंत अनेक समित्या, अनेक आयोग झाले. टाटा रिसर्च इन्स्टिट्यूट, इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट, स्वामीनाथन समिती, यशदा, गोखले इन्स्टिट्यूट पुणे अशा संस्था आहेत. मुंबई हायकोर्टाच्या नागपूर बेंचने आमच्या राज्याच्या मुख्य सचिवांसह काही अधिकाऱ्यांना दंड ठोठावलेला आहे. श्री. किशोर तिवारी नावाच्या एका समाजसेवकाने हायकोर्टामध्ये एक जनहित याचिका दाखल केली. त्या याचिकेच्या संदर्भामध्ये महाराष्ट्र शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांना ॲफिडेव्हिट सादर करण्यास सांगितले होते. ते ॲफिडेव्हिट मुख्य सचिवांपासून तर आमच्या नागपूरचे आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांच्या पर्यंत कोणीही वेळेत सादर करु शकले नाही. आमच्या सरकारचे अधिकारी किती सतर्क आहेत ? किती सजग आहेत ? हे यावरुन दिसून येते. आमच्या राज्याच्या मुख्य सचिवाला माफी मागावी लागली आणि झालेला दंड माफ करावा अशी हात जोडून विनंती करावी लागली ही आमच्या राज्याकरिता अत्यंत लांच्छनास्पद बाब आहे.

यानंतर श्री. शिगम ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा.जोगेंद्र कवाडे...)

शेतक-यांच्या होणा-या आत्महत्या ही राज्यकर्त्यांना लाजिरवाणी बाब तर आहेच पण आमच्या अधिका-यांनी ॲफिडेव्हिट दाखल करण्याच्याबाबतीत जी अनास्था दाखवली ती बाब माफ करण्यासारखी आहे की नाही हे माननीय मंत्री महोदयांनी ठरवावे. भारताचे माजी पंतप्रधान स्व.राजीव गांधी यांनी सांगितल्या प्रमाणे शासनाच्या तिजोरीमधून निघालेला पैसा थेट ग्रामपंचायतीपर्यन्त पोहोचला पाहिजे. 100 नया पैशांचा एक रुपया होतो. या एक रुपयातील केवळ दोन-चार इतके मोजकेच पैसे ग्रामपंचायतीपर्यन्त पोहोचतात आणि बाकीचे पैसे कुठे गडप होतात ते कळत नाही. माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे यांना मी एक उदाहरण म्हणून सांगतो. सह्याद्री अतिथीगृहावर "ट्रॅफिकिंग ऑफ चिल्ड्रेन ॲण्ड वुमेन फॉर कमर्शियल सेक्स्युअल बिझनेस" या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र झाले. त्यामधील एक उदाहरण असे आहे की, एका गरीब शेतक-याची पत्नी आजारी पडते आणि तिच्या औषधोपचारासाठी 5 हजार रु. खर्च येणार असतो. फाटका संसार असलेल्या त्या शेतक-याकडे तेवढे पैसे नसतात. तो सावकाराकडे जाऊन 5 हजार रु. कर्ज मागतो. त्यावेळी तो सावकार त्याला विचारतो की, "तू फाटका माणूस, माझे 5 हजार रु.चे कर्ज कसे काय फेडणार ?" तेव्हा तो शेतकरी सांगतो की, माझी मुलगी आता 10 वर्षाची आहे. मी जर 10 वर्षामध्ये 5 हजार रु.चे कर्ज फेडू शकलो नाही तर त्यावेळी माझी मुलगी 20 वर्षाची झालेली असेल. ती मुलगी मी तुला देऊन टाकीन. अशी या शेतक-याची अतिशय भयानक अवस्था आहे. या अवस्थेकडे शासनाने दुर्लक्ष करु नये. मी माननीय पंतप्रधानांना धन्यवाद देतो. आत्महत्या थांबत नाहीत हा संशोधनाचा विषय आहे. या आत्महत्या थांबविण्यासाठी सर्वंकष प्रयत्न होणे आवश्यक आहे. याबाबतीत जेवढी राज्य सरकारची जबाबदारी आहे तेवढीच केन्द्र सरकारची देखील आहे. विदर्भातील शेतक-यांना आत्महत्येपासून परावृत्त करण्यासाठी ज्या काही उपाययोजना करावयाच्या असतील त्या करण्याची जबाबदारी केन्द्र सरकारची देखील आहे. उशिरा का होईना, माननीय पंतप्रधानांनी या प्रश्नामध्ये लक्ष घातले. आत्महत्याग्रस्त भागामध्ये माननीय पंतप्रधान जातात, माननीय मुख्यमंत्री जातात. आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबीयांना दिलासा देतात, त्यांचे सांत्वन करतात. परंतु पालकमंत्री मात्र अशा ठिकाणी गेलेले नाहीत. आत्महत्याग्रस्त भागातील लोकप्रतिनिधींनी देखील आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या कुटुंबीयांचे त्यांच्या घरी जाऊन त्यांचे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(प्रा. जोगेंद्र कवाडे...)

सांत्वन केले नाही, त्यांना दिलासा दिला नाही, त्यांचे अश्रू पुसण्याचे प्रयत्न केले नाहीत. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, या शेतक-यांवरील संपूर्ण कर्ज माफ करुन त्यांना कर्जमुक्त करण्याची घोषणा शासनाने केली पाहिजे. 371(2) अंतर्गत सिंचनाचा तसचे विदर्भाच्या विकासाचा 2100 कोटीचा अनुशेष भरुन काढला पाहिजे. विदर्भातील शेतक-यांच्या आत्महत्या थांबल्या नाहीत तर तेथील शेतकरी नक्षलवादी चळवळीमध्ये भरती झाल्या शिवाय राहाणार नाहीत. या सतावलेल्या, दुखावलेल्या शेतक-याच्या जखमांवर फुंकर घालण्यासाठी कोणी त्यांच्या पर्यन्त जात नाही, त्यांना कोणी पुसत नाही.

...नंतर श्री.भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.जोगेंद्र कवाडे...

आणि म्हणून न्याय मिळत नाही अशा व्यवस्थेला उद्ध्वस्त करण्यासाठी ज्या काही चळवळी सुरु आहेत, तिला आपण नाव देतो आतंकवादी चळवळ, या आतंकवादी चळवळी राज्यामध्ये वाढू द्यावयाच्या नसतील, विशेषत: विदर्भामध्ये नक्षलवादी चळवळ वाढत आहे, ही चळवळ फोफावू द्यायची नसेल तर शेतकऱ्यांच्या दु:खावर डागण्या देण्याऐवजी सहानुभूतीची, प्रेमाची, मदतीची फुंकर घालण्याचे काम लोकप्रतिनिधींनी, सरकारने, विरोधी पक्षासहित सत्ताधारी पक्षाने करणे ही काळाची गरज आहे. माझी आपल्या माध्यमातून सरकारला विनंती आहे, आमच्या सरकारच्या नाकर्तेपणामुळे शेतकरी आत्महत्या करतात हे चित्र जगामध्ये, देशामध्ये जाऊ नये ही काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. सभापती महोदय, हे सर्व सांगताना, माझ्या वक्तव्याचा समारोप करताना एवढेच म्हणेन की, ही परिस्थिती पुन्हा भविष्यात उद्भवणार नाही आणि जर विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय मिळाला नाही तर यावर एकमात्र इलाज आहे, कारण जी आपुलकी पाहिजे, पश्चिम महाराष्ट्राच्या नेत्यांची त्यांच्या क्षेत्राबद्दल जी आपुलकी आहे, ती आपुलकी तेथे दिसत नाही. मराठवाडयाकरीता दिसत नाही, विदर्भाकरीता दिसत नाही. तो ओलावा नाही, ती माया नाही, करुणा नाही. त्या करुणेच्या अभावी, मायेच्या अभावी विदर्भातील शेतकरी आत्महत्या करतात. जर तुम्ही विदर्भाला अशा प्रकारचा हक्क देणार नसाल तर स्वतंत्र विदर्भ राज्य हाच शेतकऱ्यांच्या आत्महत्येवर एकमात्र उपाय आहे, इलाज आहे आणि या माध्यमातून शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी स्वतंत्र विदर्भाच्या राज्याची निर्मिती ताबडतोब करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने पुढाकार घ्यावा अशी विनंती करतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर विदर्भातील महत्वाच्या गोष्टी आपल्या निदर्शनास मागील सर्व वक्त्यांनी आणल्या आहेत. पण या सर्व आत्महत्या होण्याकरीता कारणीभूत फक्त सरकार आहे असे मी म्हणणार नाही. सरकारबरोबर समाज व्यवस्थेतील सर्व घटक कारणीभूत आहेत. विधिमंडळात आल्यानंतर सरकारने या आत्महत्या होण्यास लोक प्रवृत्त होणार नाहीत याची काळजी घ्यावयास पाहिजे होती. जो ओलावा आणि फुंकर याचा उल्लेख सन्माननीय सदस्य प्रा.कवाडे यांनी केला ती कृती करावयास पाहिजे होती. मी माननीय मंत्रीमहोदयांना सांगू इच्छितो, गेल्या दीड वर्षात राज्य सरकार म्हणजे मंत्री, अधिकारी आणि आपण सर्व लोक यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढतील अशा प्रकारची कृती आणि पावले उचलली आहेत हे दुर्दैवाने नमूद करावे लागते. मराठवाडयामध्ये 150 शेतक-यांच्या आत्महत्या सरकारच्या मदतीस अपात्र अशी फार मोठी बातमी वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली. वृत्तपत्रांनी आत्महत्येचे ग्लोरिफिकेशन केले, सरकारच्या डोळयात अंजन घातले. हा विषय वेगळया पातळीवर नेण्याचे काम वृत्तपत्रांनी केले. 150 आत्महत्या मदतीस अपात्र ठरल्या. शासनाने 19 डिसेंबर, 2005 रोजी जी.आर. काढला, त्यानुसार दुसऱ्या तातडीच्या मदतीमध्ये लिहिले होते की, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली लोकप्रतिनिधी, शेतकऱ्यांचे प्रतिनिधी, जिल्हास्तरीय संबंधित अधिकारी, सेवाभावी संस्था इत्यादींची समिती गठन करण्यात यावी. या समितीने आत्महत्यांच्या कारणांची तपासणी करावी. ज्या प्रकरणी नापिकी झाली अशा राष्ट्रीयकृत वा सहकारी बँकेच्या मान्यतेप्रमाणे सावकारांकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना 1 लाख रुपयांची मदत देण्यात यावी.

पालकमंत्र्यांना मी औरंगाबाद तालुक्यातील करमाड गावाचे उदाहरण सांगतो. शेतकऱ्याचे नाव आहे संतोष सयाजी हिरेकर, वय वर्षे 24, हा तरुण शेतकरी आहे. किसन सांडू काकडे हा अधिकृत सावकार नाही म्हणून त्याने केलेली आत्महत्या मदतीस पात्र ठरू शकत नाही असा अहवाल उपविभागीय अधिकारी, जिल्हा उप निबंधक, जिल्हा कृषि अधिकारी, निवासी उप जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक-ग्रामीण, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांनी दिला.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी....

आपण या जिल्हयाचे पालकमंत्री आहात, आपल्या पक्षाचा तेथे आमदार आहे. मी दु:खाने आणि खेदाने सांगू इच्छितो की, फक्त नापिकी झाल्यामुळे या शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. नापिकी हे आत्महत्येचे महत्वाचे कारण आहे. फक्त आपल्या अंगावर घ्यावयाचे नाही म्हणून काही तरी कारण सांगून हे प्रकरण शासन झटकत आहेत. या ठिकाणचे कलेक्टर सुध्दा चांगले आहेत. फक्त विदर्भातील आणि मराठवाडयातील शेतक-यांना पैसा मिळता कामा नये अशी सचिव मंडळीची भावना झालेली आहे. विदर्भात पैसे मिळाले तर काही तरी भानगड आहे अशा भावनेने पाहणे हे काही बरोबर नाही. आत्महत्या केलेल्या शेतक-यांपैकी 150 शेतक-यांच्या आत्महत्यांना अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. यामागील कारण आपण लोकप्रतिनिधींना शोधण्यास सांगितले तर आम्ही रायटींगमध्ये वस्तुस्थिती देऊ. खरे म्हणजे या ठिकाणच्या आत्महत्या नापिकी आणि कर्जबाजारीपणामुळेच झालेल्या आहेत. खरे म्हणजे या लोकांना सरकार कर्ज देत नाही आणि या शेतक-यांनी खाजगी लोकांकडून कर्ज घेतले म्हणून सरकार त्यांना मदत करीत नाही. सरकारकडून कर्ज घेतले असते तर सरकारने या शेतक-यांना काही मदत दिली असती. खरे म्हणजे सरकार या शेतक-यांना कर्ज देत नाही म्हणून नाईलाजाने या शेतक-यांनी खाजगी कर्ज घेतलेले आहे. या ठिकाणी ज्या सावकारांनी कर्ज दिलेले आहे त्यांच्यावर आपण ॲक्शन घ्या. परंतु मेलेल्या माणसाबद्दल अशा प्रकारचे विवेचन आणि तत्वज्ञान शिकविले जात असेल तर ते योग्य नाही. शेवटी या लोकांनी सावकाराकडून जे काही कर्ज घेतलेले आहे ते नापिकीमुळेच घेतलेले आहे. या लोकांनी हे कर्ज काही उधळपट्टी करण्यासाठी घेतले नव्हते हे आपण प्रथम लक्षात घेतले पाहिजे. सभापती महोदय, मी संभाजीनगरचा रहिवासी आहे, तेथील लोकप्रतिनिधी आहे. असे असतांना मला या ठिकाणच्या कोणत्याही बैठकीला बोलावण्यात आलेले नाही. माझे कोणाशीही खराब संबंध नाहीत किंवा मी आडमुठेपणाने राजकारण करीत नाही. परंतु या ठिकाणच्या 150 शेतक-यांनी ज्या आत्महत्या केलेल्या आहेत त्या जेन्यूईन केसेस असल्या तर शक्य तो टाळा तसेच या संख्येत वाढ होणार नाही याची काळजी घ्या असे वरुन आदेश वरुन आलेले आहेत असे समजते. 268 पैकी 150 शेतक-यांच्या आत्महत्या अपात्र ठरविण्यात आलेल्या आहेत. 20-25 वर्षाच्या शेतक-यांनी सुध्दा यामध्ये आत्महत्या केलेल्या आहेत. त्यामुळे जेन्युईन केस होऊ नये ठिकाणी करण्यात आलेले आहेत. म्हणून माझी मागणी आहे की, या ठिकाणी ज्या 268.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. श्रीकांत जोशी...)

शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्याचा परत एकदा रिव्हयू घ्यावा अशी माझी विनंती आहे. सभापती महोदय, मराठवाडयाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात आहे. खरे म्हणजे आत्महत्या केलेल्या 268 शेतक-यांपैकी 200 शेतकरी तरी यामध्ये पात्र ठरले असते. या शेतक-यांनी ज्या आत्महत्या केलेल्या आहेत त्याचे एकमेव कारण हे नापिकी आहे. बीडमध्ये 78 आत्महत्या झालेल्या आहेत. मागील वर्षी बीडमध्ये 30 लाख क्विंटल कापूस झाला होता. परंतु यावर्षी फक्त 7 लाख क्विंटल कापूस झालेला आहे. बीड जिल्हा हा आत्महत्येमध्ये पहिल्या नंबरवर आहे तर नांदेड जिल्हा हा दुस-या नंबरवर आहे तर तिस-या क्रमांकावर परभणी जिल्हा आहे. या ठिकाणी कपाशीचे कमी झालेले उत्पादन हे खरे म्हणजे आत्महत्या करण्यामागील एकमेव कारण आहे. तसेच कपाशीवर पडलेला लाल्या रोग हे सुध्दा आत्महत्येचे महत्वाचे कारण आहे. मागच्या वर्षी 3 हेक्टरवर कपाशीची पेरणी झाली होती. लाल्या रोगामुळे कपाशीचे जे नुकसान झाले होते त्यासाठी सरकारने 12 कोटी रुपये दिलेले आहेत परंतु अजून 18 कोटी रुपये देण्याचे बाकी आहे. तसेच आपण हेक्टरी 1 हजार रुपये देण्यात येतील असे सांगितलेले आहे. यासाठी सर्व्हे करण्यात आला होता परंतु अद्यापपर्यंत पैसे आलेले नाहीत. तसेच नांदेडमधील दोन जिल्हा मध्यवर्ती बँका एक वर्षापासून बंद पडलेल्या आहेत.

यानंतर श्री. अजित...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी.....

सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये 45 क्रमांकावर नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेत झालेला लाखो रुपयांचा भ्रष्टाचार या विषयावर माझा प्रश्न आहे. परंतु वेळेअभावी तो चर्चेसाठी येऊ शकला नाही. आज नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अवसायानात निघाली असताना ज्यांनी पैसे लाटले ते ही बँक चालू रहावी म्हणून, जिल्ह्याचे पालकमंत्री स्वत: त्यामध्ये रस घेत आहेत. नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, नॅशनल बँका पैसे देत नसतील तर शेतकऱ्यांनी खाजगी सावकाराकडे जावयाचे किंवा स्वत:चे जीवन संपवावयाचे असे दोनच मार्ग त्याच्यापुढे शिल्लक राहतात. एकीकडे पिकावर लाल्या रोग पडल्यामुळे पिकाचे नुकसान होत आहे. तर दुसरीकडे नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, परभणी जिल्हा सहकारी बँक बुडत चालली आहे. सरकार लोकांना खोटी आश्वासने देत आहेत. सरकारच्या वागणुकीमुळे शेतकऱ्यांच्या नैराश्यात भर पडत आहे हे मला येथे गांभीर्याने सांगावयाचे आहे. माननीय पंतप्रधानानी बियांणासाठी 180 कोटी रुपयांची घोषणा केली ही एक चांगली बाब आहे. शेतकऱ्यांना चांगल्या तऱ्हेची बियाणे न मिळाल्यामुळे पीक चांगल्याप्रकारे येत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते व त्याने काढलेले कर्ज तो फेडू शकत नाही. त्यामुळे कर्जाचा बोजा वाढल्यावर तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. हे एक शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे कारण आहे. मी स्वत: एक जिनिंग मिल काढली. तेव्हा मला समजले की, सर्वात मोठी अडचण ही क्वालिटी प्रोडक्टीव्हीटीची आहे. शेतकऱ्यांपर्यंत चांगल्या तऱ्हेचे सीडस पोहोचत नाही. राशी कंपनीचे सीड चांगल्याप्रकारचे असतात. परंतु या सीडचे मोठ्या प्रमाणावर ब्लॅक मार्केटींग होते. हा विषय कृषि विभागाशी संबंधित असला तरी या बाबत कृषि विभागाचे कान धरणार की नाही ? या विषयावर सखोल चर्चा करण्यासाठी एक दिवस खास बैठक घ्यावयास पाहिजे, परंतु तसे आपण करत नाही. आपणास जर सोशल माईंड चांगला करावयाचा असेल तर किमान खोटे बोलून, वेळ मारुन नेणे किंवा उंच उंच पंतग उडविणे हे बंद केले पाहिजे एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाच्या आणि गंभीर विषयावर चर्चा उपस्थित केलेली आहे. त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो आणि त्यांनी उपस्थित केलेल्या विषयाचे समर्थन करतो.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या आत्महत्या हा विषय कोणीही राजकीय करु नये. गेल्या हिवाळी अधिवेशनामध्ये एक चांगल्याप्रकारचा निर्णय आघाडी सरकारने घेतला आणि त्याचा लाभ आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मिळाला. विदर्भातील सहा जिल्ह्यांमध्ये शेतकरी व त्यांचे कुटुंब आर्थिक अडचणींमुळे व नापिकीमुळे स्वत:च्या मुलींचे लग्न करु शकत नव्हते.

यांनतर श्री.पुरी....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे....

अशा शेकडो कुटुंबियांना वसवण्याचे काम या सरकारने केले. त्यामध्ये आमचा जिल्हा अग्रेसर आहे. आमच्या जिल्हयामध्ये हजाराच्यावर कुटुंबांमध्ये सामुदायिक विवाह झाले. त्यामध्ये अनेक संस्था व अनेक पक्षाचे लोक सामिल झाले होते. या गोष्टी आपण सर्वांनी मान्यही केल्या. एवढेच नव्हे तर इतर पॅकेजच्या माध्यमातून त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळणे सुरु झाले. याठिकाणी मी धन्यवाद देऊ इच्छितो की, देशाच्या पंतप्रधानांनी खास करुन विदर्भामध्ये येऊन या आत्महत्येच्या निमित्ताने विदर्भातील लोकांमध्ये व शेतकऱ्यांमध्ये त्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने व आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने एक अभ्यासपूर्ण दौरा करुन एक चांगल्या प्रकारचे पॅकेज दिले. ही बाब विरोधी पक्षातील काही सन्माननीय सदस्यांनीही मान्य केली. याठिकाणी मघाशी सांगण्यात आले की, ज्या आत्महत्या झालेल्या आहेत त्यामध्ये मागासवर्गीय ओ.बी.सी.च्या लोकांचे प्रमाण जास्त आहे. याठिकाणी मी सांगू इच्छितो की, आत्महत्या करणारे हे शेतकरी होते व त्याबाबतीत कुठल्याही प्रकारचा जातींचा दृष्टीकोन न ठेवता मानवतेचा दृष्टीकोन ठेऊन या आत्महत्या रोखण्याच्या दृष्टीने त्यांवर सोल्यूशन काढणे आवश्यक आहे. याठिकाणी विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्यांनी चांगल्या सूचना केल्या. त्याचप्रमाणे आमचे सहकारी श्री.दिलीपराव देशमुख यांनी याकरिता एक समन्वय समिती निर्माण झाली पाहिजे, अशी भावना व्यक्त केली. यासाठी खरोखरच एक संघटन समिती निर्माण होणे आवश्यक आहे. त्या समितीमध्ये शासनाचे आणि विरोधी पक्षातील सदस्य असले पाहिजेत, अशीही त्यांनी सूचना मांडली. खरोखरच त्यांची सूचना स्वागतार्ह आहे. या प्रश्नाकडे आपण राजकीय हेतूने पाहून वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न केला तर हा प्रश्न अतिशय गंभीर व गुंतागुंतीचा होणार आहे. त्यामुळे या प्रश्नाची सोडवणूक होण्याच्या दृष्टीने या प्रश्नाकडे आपण मानवतेच्या दृष्टीकोनातून पाहण्याची आवश्यकता आहे व त्याच दृष्टीने हा प्रश्न आपण सोडविला पाहिजे, असे मला वाटते. याठिकाणी अनेक वक्त्यांनी अनुशेषाबाबतीत व जलसिंचनाच्या बाबतीत खंत व्यक्त केली. या दोनही बाबी अतिशय गंभीर असून विदर्भातील शेतकऱ्यांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून व त्याठिकाणचा अनुशेष दूर करण्याच्या दृष्टीकोनातून अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी आपण समिती निश्चित निर्माण करावी, अशी माझी विनंती आहे. विदर्भामध्ये कापसाला भाव मिळत नाही, त्यामुळे तेथील शेतकरी हताश व हतबल

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे....

झालेले आहेत. आज विदर्भामध्ये कोरडवाहू शेती करणारे अनेक शेतकरी असून त्यांना खऱ्याअर्थाने जीवनामध्ये नव्याने उभे करण्यासाठी ज्याप्रमाणे साखरेच्या बाबतीत इम्पोर्टचे धोरण स्वीकारले त्याप्रमाणे आपण कापसाच्या बाबतीतही धोरण स्वीकारले पाहिजे.

नंतर श्री.रोझेकर...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुधाकर गणगणे.....

कापसाची आयात होते त्यामुळे शेतक-यांच्या कापसाला भाव मिळत नाही. आज आयात शुल्क 10 टक्के आहे ते जर 7 टक्क्यांपर्यन्त खाली आणले तर निश्चितपणे देशामध्ये जो आपल्या शेतक-यांचा कापूस आहे त्याला चांगला भाव मिळाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, दुसरी मागणी मी या निमित्ताने अशी करणार आहे की, जर आयात शुल्काबाबत आपण निर्णय घेऊ शकलो नाही तर केंद्र सरकारकडे आपल्या सरकारने मागणी केली पाहिजे आणि त्यामध्येही यश आले नाही तर अमेरिकेच्या धर्तीवर आपल्या राज्यातील शेतक-यांना सबसिडी दिली पाहिजे. अमेरिकेसारखे प्रगत राष्ट्र आपल्या शेतक-यांना सबसिडी देत असल्यामुळे तेथील शेतक-यांना उत्पादन खर्च कमी येतो व त्यांच्या मालाला चांगला भाव मिळतो. म्हणून या ठिकाणी प्रति क्विंटलमागे 250 ते 300 रुपये सबसिडी देण्याची व्यवस्था केली पाहिजे. आपण आत्महत्या रोखण्याकरिता, शेतक-यांना दिलासा देण्याकरिता एवढा मोठा खर्च करतो. त्याऐवजी पीक कमी आले, नापिकी झाली तर प्रत्येक शेतक-याला क्विंटलमागे 250 ते 300 रुपयांची सबसिडी देण्याची व्यवस्था शासनाने करावी, जेणेकरुन शेतक-यांना दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य, श्री.बी.टी.देशमुख यांनी चांगल्या प्रकारे सिंचनाची बाजू या ठिकाणी मांडली. विदर्भामध्ये सिंचन व्यवस्था नसल्यामुळे आपण शेतक-यांच्या आत्महत्या टाळू शकत नाही. माझी या निमित्ताने विनंती राहील की, विदर्भामध्ये असणारे जेवढे सिंचन प्रकल्प मापदंडामुळे अडकलेले आहेत, अडचणीत आलेले आहेत, त्यांचा मार्ग मोकळा करावयाचा असेल तर या सिंचन प्रकल्पांना मापदंडातून शिथिलता दिली पाहिजे. असे केले तर विदर्भामध्ये अडचणीत सापडलेल्या शेतक-यांना, आत्महत्येपर्यन्त पोहोचलेल्या शेतक-यांना आपण वाचवू शकू. अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे दोन शब्द पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (सहकार मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी अतिशय महत्वाच्या विषयावर या सदनामध्ये चर्चा घडवून आणली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला आणि आपली मते या ठिकाणी व्यक्त केली आहेत. काही सन्माननीय सदस्यांनी स्पष्टपणे सांगितले की, राजकीय चर्चा करण्याचा हा विषय नाही, सर्वांनी मिळून या प्रश्नाला तोंड दिले पाहिजे, सर्वांनी मिळून या प्रश्नाचे आत्मचिंतन केले पाहिजे. सरकारबरोबरच आपणा सर्वांची ही जबाबदारी आहे, अशीही भूमिका काही सन्माननीय सदस्यांनी मांडली. हा प्रश्न महाराष्ट्रासारख्या राज्याला, ज्या राज्याचे संबंध देशामध्ये एक आगळेवेगळे स्थान आहे, दर्जा आहे, पुरोगामित्व आहे, देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे, अशा राज्यामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत, हे सरकारला भूषणावह नाही, राज्याला भूषणावह नाही. संबंध देशामध्ये अशा प्रकारची चर्चा सुरु आहे की, महाराष्ट्रामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या होत आहेत. याच दृष्टीकोनातून महाराष्ट्र शासनाने नागपूरच्या अधिवेशनामध्ये एक पॅकेज जाहीर केले. यासंदर्भातही काही चर्चा अपु-या माहितीवर केली गेली. असा आक्षेप घेण्यात आला की, या पॅकेजची अंमलबजावणी झाली नाही. अंमलबजावणी कशा प्रकारे झाली याची माहिती मी आपल्याला या ठिकाणी देणार आहे.

यानंतर श्री.बोरले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम .....

माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी सांगितले की, 6 टक्के दराने शेतक-यांना कर्ज उपलब्ध करुन देण्याचे काय झाले ? भारतीय जनता पक्षाचे महाराष्ट्राचे अध्यक्ष श्री.नितीन गडकरी यांनी असे सांगितले की, 6 टक्के दराने एका तरी शेतक-याला कर्ज दिलेलेले मला दाखवा. चहापानाच्या वेळी विरोधी पक्ष नेते श्री.रामदास कदम यांचे पत्र मी वाचले. त्यांची अशी मागणी होती की, 1 जून पासून शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज देण्याची अंमलबजावणी केली पाहिजे. मी आपल्याला ठामपणे सांगतो की, 17 मे रोजी मी आदेश काढलेला आहे आणि 1 एप्रिल पासून ज्या लोकांनी कर्ज घेतले आहे त्यांच्यासाठी 6 टक्क्याची योजना अंमलात आणण्याचा ठाम निर्णय घेतलेला आहे. ...(अडथळा) ....

डॉ.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. प्रथम व्याज आकारले जात नाही. व्याज हे सिक्रेट आहे. कोणी गोविंद घ्या, कोणी गोपाळ घ्या. तुम्ही शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज दिलेले आहे काय ?

श्री.पंतगराव कदम : सभापती महोदय, अमरावती जिल्हयामध्ये 37,881 शेतक-यांना 81 कोटी 14 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. आम्ही यास शंभर टक्के बांधील आहोत. अकोला जिल्हयामध्ये 44,824 शेतक-यांना 80 कोटी 39 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये 77,895 शेतक-यांना कर्ज दिलेले आहे.

डॉ.नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी पुन्हा आकडेवारी सांगावी.

श्री.पंतगराव कदम : सभापती महोदय, अमरावती जिल्हयामध्ये 37,881 शेतक-यांना 81 कोटी 14 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. अकोला जिल्हयामध्ये 44,824 शेतक-यांना 80 कोटी 39 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. बुलढाणा जिल्हयामध्ये 77,895 शेतक-यांना 120 कोटी 63 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. वाशिम जिल्हयामध्ये 44,678 शेतक-यांना 79 कोटी 89 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. यवतमाळ जिल्हयामध्ये 91,921 शेतक-यांना 163 कोटी 2 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. मी दिनांक 28 जून, 2006 पर्यंतची आकडेवारी देत आहे. वर्धा जिल्हयामध्ये 27,805 शेतक-यांना 57 कोटी 2 लाख रुपये कर्ज दिलेले आहे. अशा पद्धतीने 3,24,854 शेतक-यांना कर्ज दिलेले आहे. महाराष्ट्रातील शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज दिलेले आहे. शेतक-यांना 6 टक्के दराने कर्ज मिळाले नाही तर आम्ही संबंधित बँकांवर आणि अधिका-यांवर कार्यवाही करु.

(सभापती स्थानी माननीय सभापती)

यानंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : हे व्याज दर राष्ट्रीयीकृत बँकादेखील लावणार आहेत काय ?

डॉ. पतंगराव कदम : होय. सभापती महोदय, अशा पद्धतीने 28 जून अखेर पर्यंत 582.16 कोटी रूपयांचे कर्जवाटप झालेले आहे. या प्रश्नावर चर्चा करीत असताना सन्माननीय सदस्य श्री.गडकरी म्हणाले की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांपर्यंत राज्य सरकारातील कोणी मंत्री गेले होते का ? मी सांगू इच्छितो की, मी स्वत: आमच्या सर्व अधिकाऱ्यांच्या या संदर्भात अकोला, यवतमाळ येथे बैठका घेतलेल्या आहेत ...

श्री. पांडुरंग फुंडकर : आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या घरी आपण कोणी गेले होते का ?

डॉ. पतंगराव कदम : या सगळ्या अधिकाऱ्यांच्या बैठका घेण्याचा उद्देश तोच होता. प्रत्येक गावामध्ये त्यासाठी जावे असेही ठरविले होते पण कलेक्टरनी सांगितले की, आम्ही येथेच सगळ्यांना बोलाविले आहे. तर सांगण्याचा उद्देश असा आहे की, यासाठीच्या अटी आपण शिथिल केल्या आहेत. त्यामुळे आता कोणालाही पैसे घेण्यासाठी मंत्रालयापर्यंत यावे लागणार नाही. आम्ही कलेक्टर, डीडीआर यांना सांगितले आहे की, तुम्ही ट्रेझरीमधून थेट रक्कम काढून हे वाटप करावयाचे आहे. त्यासाठी त्यांची एक समिती देखील आपण नेमली आहे.तसेच आत्महत्या केलेल्या कुटुंबांना मदत देण्यासाठीचे विहित केलेले निकषही शिथिल करण्यात आले आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांना मी सांगू इच्छितो की, आता मंत्रालयामध्ये प्रकरण पुढे नेण्यासाठी ते कोणाच्या हाती आहे हे ठरविण्यासाठी कोणी येत नाहीत.

श्री. श्रीकांत जोशी : मराठवाड्यातील एकाही लोकप्रतिनिधींला आपण बोलाविलेले नाही. यासंबंधातील जो जीआर आहे त्यामध्ये लोकप्रतिनिधींना बोलाविण्याचे लिहिलेले आहे. आता तुम्ही पालकमंत्री असलेल्या जिल्ह्यामध्ये ...

डॉ. पतंगराव कदम : मी पालकमंत्री असलेल्या जिल्हयात आपल्या सारखे जागरूक सदस्य असल्याने तसा काही प्रश्न येत नाही. ...

(काही सन्माननीय सदस्य खाली बसून बोलतात ...)

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांना येथे केवळ राजकारण करावयाचे आहे. त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नामध्ये काहीच देणेघेणे नाही. तेव्हा मला असे सांगावयाचे आहे की, या पद्धतीचे सरकारने गांभीर्याने जे पॅकेज दिले आहे त्याची अमलबजावणी देखील झालेली नाही, ते कागदावर होते असे जे आपण म्हटले ते तितकेसे खरे नाही. सभापती महोदय, एकंदर तीन

..... 3 ओ 2 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. कदम .....

टक्क्याचे कापसाचे पैसे 407 कोटी रूपये द्यावयाचे होते त्यापैकी आपण 388 कोटी पेड केलेले आहेत. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना भरपाईपोटी 121 कोटी 72 लाख रूपये द्यावयाचे होते त्यापैकी 111 कोटी रूपये दिलेले आहेत. पीक कर्जाचे पुनर्रचित व्याज 240.98 कोटी पैकी 218.52 कोटी दिलेले आहेत. हे सारे या राज्याच्या पॅकेजमध्ये आपण दिलेले आहे. यासाठी आम्ही खात्याच्या अधिकाऱ्यांना, विभागीय आयुक्तांना पुढे केलेले आहे. सहकार खात्याच्या अधिकाऱ्यांच्या या संदर्भात बैठका घेतलेल्या आहेत आणि त्यांना सांगितले आहे की, गावागावामध्ये जाऊन तुम्ही शेतकऱ्यांच्या दारापर्यंत जा. शेतकऱ्याने कर्जासाठी बँकेमध्ये जाण्याची गरज नाही. जे जे शेतकरी सभासद नाहीत त्यांना सभासद करून घ्या. ज्या सोसायट्या गटबाजीतून कोणाला सभासद करावयास तयार नाहीत त्या सोसायट्यांच्या कमिट्या बरखास्त करा. अशा पद्धतीने जास्तीत जास्त शेतकरी सभासद झाले पाहिजेत आणि त्यांना कर्ज दिले गेले पाहिजे अशा सक्त सूचना डीडीआर यांना आपण दिलेल्या आहेत. इतकेच नव्हे तर याचा आढावा घेण्यासाठी दर 8 दिवसांनी बैठक घेण्यास देखील सांगितले आहे. त्यासाठी मी स्वत: पुणे येथे बैठक घेऊन सूचना दिल्या आहेत आणि या बाबतीत सक्त निर्णय घेतले जातील असेही सांगितले आहे. सभापती महोदय, 6 टक्क्याचे काय ? म्हणून येथे विचारले गेले आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, 6 टक्के कर्जाचे आदेश काढलेले आहेत आणि ते बँकांना अंमलात आणावे लागतील. नाबार्डचे आदेश आले होते. पण आता केंद्र सरकारचे आदेश आल्यामुळे ....

(यानंतर श्री. सरफरे ..... 3पी 1 ...

अशुधारित प्रत/शोधनासाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

आम्ही एक टक्का सबसिडी देण्याचा पहिल्यांदा निर्णय घेतला. आता नाबार्डचे आदेश आले असून अडीच टक्क्याने नाबार्ड बँकेला कर्ज देईल. राज्य सहकारी बँकेला अर्धा टक्का व्याज घेण्यास सांगितले जाईल, जिल्हा सहकारी बँकेला एक टक्का व्याज घेण्यास सांगितले जाईल. सद्य परिस्थितीत सोसायटीला ऑडिट तपासणी, रिईम्बर्समेंट करणे हे सर्व विषय करावे लागत असल्यामुळे सोसायटीने 3 टक्के व्याज घ्यावे. असे मिळून एकूण 7 टक्के व्याज होईल, आणि त्यावर एक टक्का सबसिडी शासन देईल. अशाप्रकारे 6 टक्के व्याजाचा निर्णय घेतला आहे. 1 एप्रिल पासून ज्या लोकांनी कर्ज घेतले आहे त्या सर्व लोकांना हा निर्णय लागू होईल. आणि त्याप्रमाणे कर्जाचे कॅलक्युलेशन होईल. त्यामध्ये कोणत्याही प्रकारची शंका राहणार नाही.

श्री. दिवाकर रावते : नवीन सभासदांना विना तारण 25 हजार रुपयांपर्यंत कर्ज देण्यासंबंधी आपण जी.आर. काढला. याप्रमाणे आपण किती जणांना कर्ज दिले त्याची संख्या सांगावी?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, 25 हजार रुपये देण्यासंबंधी पूर्वी निर्णय झाला होता...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, हा जाहीर केलेल्या पॅकेजपेक्षा वेगळा विषय आहे. ज्यांना कर्ज मिळत नव्हते म्हणून सावकाराकडे जावे लागत होते त्यांना विना तारण 25 हजार रुपये बँकेने उपलब्ध करुन द्यायचे. ते देत असतांना बँकेने त्यांना काहीही विचारावयाचे नाही. केवळ 7/12 चा उतारा दाखविल्यानंतर त्यांना कर्ज द्यायचे. अशाप्रकारे ज्यांना कर्ज दिले आहे त्या शेतकऱ्यांची संख्या आपण सांगावी?

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, राज्य सरकारने त्यानंतर पॅकेज जाहीर केले. या संदर्भात अकोला, यवतमाळ या ठिकाणी बैठका घेतल्यानंतर शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या होणे यामध्ये शासनाच्या इभ्रतीचा विषय बाजूला ठेवून शेतकरी आत्महत्त्या कां करीत आहेत? याचा शोध घेऊन शासनाला माहिती देण्यासंबंधी सर्व जिल्हाधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांची बैठक घेऊन त्यांना सांगितले. या संबंधी त्यांनी शोध घेतल्यानंतर असे लक्षात आले की, शेतकऱ्यांकडून एकच पिक घेतले जाते, त्याला अल्टरनेटीव्ह उद्योग नाही. माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख म्हणाले त्याप्रमाणे त्यामध्ये सिंचनाचा प्रश्न देखील समाविष्ट आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या इतर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

भागामध्ये डेअरी, पोल्ट्रीसारखे इतर अल्टरनेटीव्ह उद्योग केले जातात. परंतु या भागामध्ये एक पिक घेतले, त्याचे चांगले उत्पादन आले नाही व त्याला योग्य किंमत मिळाली नाहीतर...

श्री. दिवाकर रावते : मंत्रिमहोदय विषयाला कलाटणी देत आहेत. मी याठिकाणी अत्यंत गांभीर्याने विचारतो की, सरकारने संपूर्ण अभ्यास करुन नागपूरच्या अधिवेशनामध्ये एक पॅकेज जाहीर केले. त्यामध्ये ज्या शेतकऱ्यांना कधीही कर्ज उपलब्ध होत नव्हते त्यांना विना तारण 25 हजार रुपये देण्याचा महत्वाचा विषय समाविष्ट होता. आपण दिलेल्या आकडेवारीमध्ये आपले अपयश दिसते. संपूर्ण पश्चिम विदर्भातील 30 लाख शेतकऱ्यांपैकी 3 लाख शेतकऱ्यांना कर्ज दिले. आपण स्पेसिफिक जी. आर. काढून विना तारण 25 हजार रुपये कर्ज देण्याचा निर्णय घेतला. आणि हे कर्ज 28 जून पर्यंत देणार असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे 28 जूनपर्यंत किती लोकांना आपण कर्ज दिले त्याची आकडेवारी उपलब्ध करुन दिली पाहिजे.

डॉ. पतंगराव कदम : सभापती महोदय, 25 हजार रुपयेप्रमाणे किती शेतकऱ्यांना कर्ज देण्यात आले याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल. शासनाने केलेल्या घोषणेप्रमाणे वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनची स्थापना करण्याचा पहिला निर्णय घेतला. आणि त्या पॅकेजच्या माध्यमातून 1075 कोटी रुपयांची तरतूद करावयाची आहे. त्यानंतर इंदिरा गांधी विकास संशोधन संस्था, टाटा इंस्टिटयुट ऑफ सोशल सायन्सच्या माध्यमातून माहिती घेतल्यानंतर दोन-तीन बाबी समोर आल्या. त्यामध्ये सिंचनाचा प्रश्न सोडविणे आणि अल्टरनेटीव्ह उद्योग उपलब्ध करुन देणे यासंबंधीचा उल्लेख त्यांनी आपल्या अहवालात केला आहे. या प्रश्नावर आमचे मतभेद नाहीत.

(यानंतर श्री. किल्लेदार)

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (पुढे सुरु.....

शासनाने घोषित केलेल्या पॅकेजचा आढावा वेळोवेळी मंत्रालय व अमरावती विभागाच्या स्तरावर घेतलेला आहे. माननीय मुख्यमंत्री, मंत्री (पुनर्वसन), मंत्री,(महसूल) व मुख्य सचिव यांनी बऱ्याच बैठका घेऊन या पॅकेजमधील सर्व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेतलेला आहे. या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेऊन केंद्रीय मदतीसाठी विनंती करण्यात आली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेऊन माननीय पंतप्रधानांचा विदर्भ दौरा आयोजित करण्यात आला. आत्महत्या केलेल्या कुटुंबांना तातडीने मदत देण्यासाठी जिल्हा स्तरीय समितीची स्थापना करण्याची घोषणा करण्यात आली. या समितीवर अशासकीय सदस्य व शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींचा समावेश करण्यात आला. ही कमिटी आमदार, खासदारांची नाही. या समितीच्या शिफारशीप्रमाणे जिल्हाधिकाऱ्यांना केषानुसारातून थेट रक्कम काढून 1 लाख रुपये देण्याचे अधिकार दिलेले आहेत. अशा सर्व आत्महत्या केलेल्या कुटुंबांना मदत देण्यासाठी विहित केलेले निकष शिथिल करण्यात आलेले आहेत. आत्महत्या केलेल्या कुटुंबांना गेल्या चार महिन्यात 7.60 कोटी रुपयाचे वाटप करण्यात आलेले आहे. ही सर्व मदत त्या कुटुंबांना त्वरित देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कापूस एकाधिकार समितीसाठी भागभांडवल स्वरुपात घेण्यात आलेल्या निधीची परतफेड, यासाठी एकूण 762 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे.

श्री.श्रीकांत जोशी : माझ्याकडे यासंबंधातील जी.आर. आहे त्यामध्ये लोकप्रतिनिधी असा उल्लेख केलेला आहे.

डॉ.पंतगराव कदम : अजून निर्णय घेतलेला नाही. निर्णय घेतल्यानंतर या परिस्थितीचा विचार करण्यात येईल.

श्री.श्रीकांत जोशी : श्री.संतोष सयाजी हिरेकर या शेतकऱ्याने आत्महत्या केलेली आहे त्याच्या वारसाला मदत मिळालेली नाही. शासन निर्णयातील निकषात बसत नसल्याने जिल्हा समितीने त्यास मंजुरी दिलेली नाही.

डॉ.पतंगराव कदम : त्यांचा अहवाल तपासून घेतला जाईल.

सभापती : सन्माननीय सदस्यांनी त्यांच्याकडील कागदपत्रे मंत्री महोदयांकडे द्यावीत.

डॉ.पतंगराव कदम : कापूस एकाधिकार समितीसाठी भागभांडवल स्वरुपात घेण्यात आलेल्या निधीची परतफेड यासाठी एकूण 762 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. या रक्कमेचे वाटप चालू आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

(अ□□ स□मा□□□य सदस्य ए□चवेळी प्रश□ विचार□यासाठी हात वर □रतात)

सभापती : मंत्री महोदयांचे भाष□ संपल्या□□र सदस्यां□ प्रश□ विचार□यासाठी मी परवा□□□ दे□र आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : माझा ए□ हर□तीचा मुद्दा आहे. महाराष्ट्रातील विदर्भामध्ये शेत□यांच्या झालेल्या आत्महत्या या संदर्भात डिसेंबर महि□यामध्ये विदर्भातील सहा जिल्ह्यासाठी पॅ□ज जाहीर □र□यात आले. □ुटुंबां□ दिली जा□ारी मदत ही □□द्दी □ देता 70 हजार रुपयाचा बॉ□ड आ□ 30 हजार रुपयाचा चेक अणि त्यातून 20 हजाराचे कर्ज कापून घेणार. प्रत्यक्षात 10 हजार रुपये हातामध्ये मिळणार. यामध्ये □ती शेत□यांच्या □ुटुंबां□ मदत □लेली आहे ?

डॉ.पतं□राव □दम : सन्माननीय सदस्य 70 टक्क्याचा उल्लेख करीत आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय □ंभीर विषय आहे. 70 टक्□ आ□ 80 टक्क्याबाबत सां□ आहेत. पॅ□ज जाहीर □रु□ सहा महि□ झाले. अजू□ही शेत□यां□ मदत मिळत □ाही. ही □मे जिल्हाधि□ऱ्यां□डे दिली आहेत, परंतु ते त्या□डे फिर□ू□ही पहात □ाहीत. □ती मदत □लेली आहे ? यासंबंधीचा स्पेसिफि□ आ□डा सां□वा.

डॉ.पतं□राव □दम : यामध्ये ज्या लो□□ मदत द्यायची राहिलेली आहे त्याबाबत फेर तपास□ □र□याचे आदेश दिले आहेत.

श्री.पांडुरं□ फुंड□र : पॅ□जच्या □□□ामध्ये □ती आत्महत्या □लेले शेत□री बसतात ?

डॉ.पतं□राव □दम : आत्महत्या □लेल्या □ुटुंबे राहिलेली आहेत, त्याबाबत □या□ □□□ दिलेले आहेत. त्याप्रमा□ फेरतपास□ □र□याचे आदेश त्या त्या जिल्ह्यां□ दे□यात येतील.

या□र श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : या सदनामध्ये आपण ही अत्यंत महत्वाची चर्चा करीत आहोत. हिवाळी अधिवेशनाच्या दरम्यान शासनाने 6 जिल्ह्यांना पॅकेज दिले. ज्या जिल्ह्यांमध्ये जास्तीत जास्त लोकांच्या दुर्दैवाने आत्महत्या झाल्या त्यांना रिलीफ मिळावा या अनुषंगाने नागपूरच्या अधिवेशनामध्ये सरकारने 1025 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केले. त्या अनुषंगाने त्यानंतरच्या काळात आतापर्यंत ही केलेली सर्व तरतूद त्यांच्यापर्यंत पोहोचली काय असा हा विषय आहे. सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले तशी माहिती सुध्दा आपण द्यावी. याबाबतीत जेवढी माहिती आहे तेवढी देण्याचा प्रयत्न करावा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, नागपूरच्या अधिवेशनाच्या वेळी माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेमध्ये टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायंसेसच्या रिपोर्टच्या आधारे 750 आत्महत्या नापिकीमुळे झाल्या असे सांगितले. 330 लोकांना मदत दिली. त्या 330 लोकांना अंशत: मदत दिली. या आत्महत्या झाल्याचे शासन मान्य करते. यासंदर्भात माननीय महसूल मंत्री श्री. नारायण राणे साहेबांना मी प्रश्न विचारला होता. त्याबाबत त्यांनी सांगितले की, निकष पुन्हा तपासू आणि त्यांना 1 लाख रुपये देऊ. तरीही ते दिले गेले नाहीत. माननीय मुख्यमंत्री देत नाहीत. माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे साहेबांनी सांगितले तेही देत नाहीत. आता माननीय मंत्रिमहोदय पुन्हा तपासणी करु असे सांगत आहेत. आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या बाबतीत तीनवेळा तपासून देऊ असे सांगितले तरी देत नाहीत. माननीय सभापती महोदय, आपण याबाबत सांगावे.

सभापती : विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांचे असे मत आहे की, या सदनामध्ये त्या वेळच्या माननीय महसूल मंत्र्यांनी उत्तर दिले, किंबहुना ज्या अहवालावर आधारित पॅकेज दिले त्या अनुषंगाने ते आश्वासन पूर्ण व्हावे. अशी सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे. ते आश्वासन पूर्ण करण्याच्या दृष्टीने सरकारने प्रयत्न करणे जरुरीचे आहे. त्यादृष्टीने माननीय मंत्रिमहोदयांनी सांगावे.

डॉ. पतंगराव कदम : माननीय मुख्यमंत्री आणि माननीय महसूल मंत्री यांचे आश्वासन असेच आहे की, जे लोक राहिलेले आहेत त्यांची परत तपासणी करुन नवीन निकषाप्रमाणे त्यांना मदत केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : किती तपासले आणि किती मदत दिली ?

डॉ. पतंगराव कदम : आतापर्यंत 9 कोटी 93 लाख रुपये दिलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : ही रक्कम पहिल्या फेजमध्ये जे खरे होते त्यांना दिली. त्यानंतर आम्ही सांगितले की, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसची माहिती वेगळी आहे. त्यावेळी माननीय मंत्रिमहोदय श्री. नारायण राणे यांनी मान्य केले की, आम्ही पुन्हा सगळे तपासू. माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, 750 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. हे मान्य केल्यानंतर चौकशी होत नाही आणि त्यांना मदत दिली जात नाही. 9 कोटी रुपये ही रक्कम जुन्यांची आहे. तुम्ही आश्वासन दिल्यानंतर किती केसेस तपासल्या आणि किती दिले ?

डॉ. पतंगराव कदम : 963 केसेस मान्य झाल्या. राहिलेल्या केसेसमध्ये पंचनामे बरोबर झालेले नव्हते. निरनिराळया अडचणी आलेल्या होत्या. आता फेर तपासणी केली त्याचे आकडे सांगतो. फेर तपासणीमध्ये 375 प्रकरणे पुन्हा पात्र ठरली. आता राहिलेली प्रकरणे 511 आहेत. ती 511 प्रकरणे परत तपासू आणि जास्तीत जास्त लोकांना मदत झाली पाहिजे अशा सूचना देऊ.

श्री. पांडुरंग फुंडकर : ही मदत देत असताना 1 लाख रुपये नगदी दिलेले नाहीत. त्यामध्ये 70 टक्क्याचे एनएससीचे बॉंड, 30 टक्क्याचा चेक आणि त्या 30 टक्क्यामधून 15 हजार रुपये, 20 हजार रुपये शेतकऱ्यांचे कर्ज कापून घेतले हे खरे आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : यासंबंधीची माहिती घेतली जाईल.

श्री. पांडुरंग फुंडकर : तुमच्या आदेशाने हे सर्व चालले आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. शेतकऱ्यांना 1 लाख रुपये देण्याच्या नावाखाली फक्त 10 हजार रुपये सरकार त्यांच्या अंगावर फेकत आहे.

डॉ. पतंगराव कदम : प्रत्येकाचे 20 हजार रुपयांचे कर्ज आहे की, पाच हजार रुपयांचे कर्ज आहे याची माहिती तपासून घ्यावी लागेल.

श्री. नितीन गडकरी : युती सरकारच्या वेळी 1 लाख रुपयाचे डायरेक्ट चेक दिले होते.

डॉ. पतंगराव कदम : कोणतीही कपात करण्यात आलेली नाही अशी माहिती आलेली आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : मी सभागृहात सिध्द करुन देईन नाही तर सभागृहाची माफी मागेन.

यानंतर श्री. शिगम ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : माननीय मंत्री महोदयांनी दिलेली माहिती खरी नसेल तर आम्ही त्यांच्यावर हक्कभंग आणू.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी सुईच्या टोकावर मावेल इतकी जमीन मागितली होती. 371(2)च्या ऑर्डर्स निघाल्या. माननीय राज्यपालांच्या ऑर्डर्समध्ये अधिक्षेप करुन रिजनल लेव्हलला तुम्ही प्रशासकीय मान्यतेचे अधिकार दिले नाहीत. 15 डिसेंबरला ऑर्डर्स दिल्या. त्यानंतर 6 मार्च 2006ला ऑर्डर्स दिल्या तरी देखील प्रशासकीय मान्यतेचे अधिकार रिजनल लेव्हलला दिले गेले नाहीत. 5 कोटीच्या वरचे प्रकल्प वित्त विभागाकडे पाठविण्याचे वाईट काम केले. मी 6 जिल्ह्यातील लघु प्रकल्पांची यादी वाचून दाखविली होती. माझे म्हणणे असे आहे की, वित्त विभागाला जे अधिकार दिलेले आहेत ते उद्याच्या उद्या तुम्ही विथ्ड्रा करा. ज्या हरकती उपस्थित करण्यात आलेल्या आहेत त्या पोरकट आणि हास्यास्पद आहेत. त्याबाबतीत मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले नाही. ते उत्तर त्यांनी द्यावे.

श्री. पांडुरंग फुंडकर : केवळ 30 हजार रु.चा धनादेश दिलेला आहे.

डॉ. पतंगराव कदम : 70 हजार रु. आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या वारसाच्या नावे पोस्टाच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये ठेवलेले आहेत.

श्री. नितीन गडकरी : माननीय मंत्री महोदय आता सांगतात की, पैसे कापले नाहीत. पोस्टाच्या मासिक प्राप्ती योजनेमध्ये ठेवलेले आहेत.

श्री. दिवाकर रावते : माझा हरकतीचा मुद्दा आहे.

सभापती : हा अत्यंत जिव्हाळ्याचा आणि महत्वाचा प्रश्न असल्यामुळे माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यावर मी माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्यास परवानगी देणार आहे. माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते हे हरकतीचा मुद्दा मांडू इच्छित आहेत. त्यांनी तो मांडावा.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सदनामध्ये शेतक-यांच्या हिताचे निर्णय घेण्याच्या बाबतीत आपण आम्हाला सहकार्य करता त्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करतो. या प्रश्नाच्या बाबतीत आम्हाला जे सहकार्य केले त्या बद्दल मी आपले आभार मानतो. आपणास धन्यवाद देतो. या गंभीर आणि महत्वाच्या विषयावर माननीय मंत्री महोदय योग्य उत्तर देत नसल्यामुळे आम्हाला नाईलाजाने मध्येच उभे रहावे लागत आहे. माननीय मंत्री महोदयांनी, शेतक-यांना दिलेल्या मदतीतून काहीही रक्कम कापलेली नाही, असे सांगितले. तेव्हा मंत्री महोदय अशा प्रकारे

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

चुकीची माहिती देत असतील आणि रक्कम कापल्याचे आम्ही सिध्द केले तर माननीय मंत्री महोदयांवर आम्हाला हक्कभंग आणावा लागेल. शेतक-यांच्या आत्महत्या हा गंमतीचा आणि टिंगळटवाळीचा विषय आहे काय ? अधिकारी चुकीची माहिती देतात. त्यामुळे मंत्री महोदयांना याठिकाणी तोंडघशी पडावे लागते. एवढ्या गंभीर विषयावर अधिकारी निष्काळजीपणे आणि हलगर्जीपणे वागत असतील तर त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. ही कारवाई झाली तरच शेतक-यांना काही तरी दिलासा मिळू शकेल. मी या ठिकाणी ठणकावून सांगत आहे की, "शेतक-यांना दिलेल्या मदतीमधून काहीही पैसे कापले नाहीत" असे जे उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे ते उत्तर दुरुस्त करावे.

सभापती : माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी उपस्थित केलेल्या मुद्याचा आशय आणि माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी तसेच अन्य माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या भावना अशा आहेत की, अशा दुर्दैवी परिस्थितीमध्ये आत्महत्या केलेल्या शेतक-याच्या वारसांना सर्व रक्कम दिली असती तर ते योग्य झाले असते.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि शासनाचे म्हणणे आहे की, त्यापैकी 30 हजार रुपये विनाकपात दिलेले आहेत व 70 हजार रुपये पोस्टाच्या मासिक योजनेत वारसांच्या नावे ठेवलेले आहेत असे शासनाचे उत्तर आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, मी स्पष्टपणे सांगितले 30 हजार रुपये रोख दिले असून 70 हजार रुपये पोस्टाच्या मासिक ठेव योजनेमध्ये ठेवले आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, चुकीचे उत्तर दिले जात आहे.

सभापती : मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे, नंतर मी सन्माननीय सदस्यांना प्रश्न विचारण्याची संधी देईन.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, निर्णय सांगितलेला आहे. 70 हजार रुपये पोस्टात वारसांच्या नावे ठेवले असून महिन्याला त्याचे व्याज वारसांना मिळत आहे. या देशाचे पंतप्रधान दोन दिवसांसाठी राज्याच्या दौऱ्यावर आले होते याचे सुध्दा सन्माननीय सदस्य राजकारण करीत आहेत. तीन तास आणि दोन तास अशी 5 तास त्यांनी बैठक घेतली आणि प्रभावी अशी मदत देण्याचे ठरविले. त्यासाठी पंतप्रधान निधीतून प्रत्येक जिल्हयाला 50 लाख रुपये मदत करण्याचा निर्णय घेतला आहे. दिनांक 30 जून, 2006 रोजी सर्व थकित कर्जाच्या.....

प्रा.बी.टी.देशमुख : हे मदत करतात परंतु वित्त विभाग तुम्हाला आवरत नाही.

सभापती : मंत्रीमहोदयांचे उत्तर पूर्ण झाल्यानंतर मी सदस्यांना प्रश्न विचारण्याची अनुमती देईन.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, दिनांक 30 जून, 2006 रोजी थकित कर्जाच्या पुनर्रचनेसाठी 1296 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. सदर रक्कम नवीन कर्जासाठी पात्र शेतकऱ्यांना देण्यात येईल. नवीन कर्ज देण्यासाठी रिझर्व्ह बँक, नाबार्ड यांच्याकडून मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतील. सदर 6 जिल्हयातील 1275 कोटींच्या नवीन कर्जाची व्यवस्था नाबार्ड व लीड बँक यांनी करुन देण्याबाबत त्यांना निर्देश दिलेले आहेत. शेतकऱ्यांच्या कर्जावर थकलेल्या व्याजाची माफी. सदर माफीसाठी जो 712 कोटी रुपये खर्च येईल तो केंद्र शासन आणि राज्य शासन यांनी 50:50 या तत्वावर भरण्याचे ठरले आहे. या 6 जिल्हयात 1 कोटी 59 लाख हेक्टर जागा आश्वासित सिंचनाखाली घेण्यात येईल. यासाठी एकूण 2177.....

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माझ्याजवळ माननीय पंतप्रधानांचे स्टेटमेंट आहे. 50 हजार हेक्टरला 1 कोटी असे मंत्रीमहोदय वाचत आहेत.

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : 1.59 लाख हेक्टर असे मी वाचले आहे.

श्री.नितीन गडकरी : माननीय पंतप्रधानांनी काय वाचले ते मी सांगतो. मी पंतप्रधानांचे लेखी पत्र वाचतो. "Drip and sprinkle irrigation will be extended extensively to cover 50000 hectare in the six districts."

डॉ.पतंगराव कदम : तो विषय वेगळा आहे.

सभापती : मंत्रीमहोदयांनी आपले उत्तर पुढे सुरु करावे.

डॉ.पतंगराव कदम : यासाठी 2177 कोटी रुपये 3 वर्षाच्या कालावधीसाठी उपलब्ध करण्यात येतील. सदर रक्कम मोठया, मध्यम व लघुसिंचन प्रकल्पांसाठी उपलब्ध करुन देण्यात येईल. सदर रक्कम ग्रामीण पायाभूत विकास निधी व स्तरीय सिंचन लाभ कार्यक्रम या दोन्ही कार्यक्रमातून उपलब्ध करण्यात येईल. मोठया प्रमाणावर या 6 जिल्हयात बियाणे बदलून घेण्यासाठी 50 टक्के सबसिडी तत्वावर कार्यक्रम राबविण्यात येईल. या ठिकाणी आम्ही जे सांगू ती आमची कमिटमेंट आहे.

(नंतर श्री.जुन्नरे...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम....

बियाणे खरेदी करण्यासाठी शेतक-यांना मदत देण्याचे प्रमाण आधी अर्धा एकर होते ते आता 1 एकरापर्यंत वाढविण्यात येईल. या कार्यक्रमासाठी पुढील वर्षाच्या कालावधीत 186 कोटी रुपये उपलब्ध करण्यात येतील. तसेच जलसंधारणासाठी एकूण 240 कोटी रुपयांची तरतूद पुढील तीन वर्षात सहा जिल्हयासाठी 500 चेक बंधारे बांधण्यात येतील. प्रत्येक वर्षासाठी 60 कोटींची तरतूद तसेच प्रत्येक जिल्हयाला 15 हजार हेक्टर क्षेत्राला जलसंवर्धनाचा फायदा देण्यासाठी 54 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल. राष्ट्रीय फलोत्पादन मिशनची व्याप्ती वाढविण्यात आलेली आहे व बुलढाणा जिल्हयाचासुध्दा यामध्ये समावेश करण्यात आलेला आहे. नारंगीचे उत्पादन तसेच संरक्षण या प्रक्रीयेला चालना देण्यासाठी टेक्नॉलॉजी मिशनची स्थापना करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय नारंगी संशोधन केंद्राच्या माध्यमाने सदर कार्यक्रम राबविण्यात येईल. सर्व 6 जिल्हयाच्या सुक्ष्म सिंचन कार्यक्रमाचे आयोजन 17800 हेक्टरवर सदर कार्यक्रम राबविण्यात येईल. ठिबक व तुषार सिंचनाची व्यवस्था करण्यात येईल. या 6 जिल्हयात 3 वर्षात एकूण 53,400 हेक्टरवर तुषार व ठिबक सिंचनाची व्यवस्था करण्यात येईल. प्रत्येक जिल्हयात अधिक दूध देणा-या 1000 दुभती जनावरे या कार्यक्रमातून 50 टक्के अनुदान व उर्वरित बँक कर्ज असे उपलब्ध करुन देण्यात येईल. त्यासाठी प्रत्येक जिल्हयात 500 वासरे 50 टक्के अनुदान तत्वावर देण्यात येतील. प्रत्येक जिल्हयात जनावरांसाठी चारा डेपो व त्यासाठी 25 टक्के अनुदान देण्यात येईल. चारा उत्पादन करणा-या चार घटकांना 50 टक्के अनुदान व उर्वरित बँक कर्ज दिले जाईल. जनावरांच्या अरोगयाची काळजी घेण्यासाठी पर्याप्त सुविधा देण्यात येईल. 10 दूध शीतकरण घटकाची स्थापना करण्यात येईल. प्रत्येक जिल्हयात 100 हेक्टरवर मत्स्य उद्योग घेतले जातील. भांडवल व कच्च्या मालावर 40 टक्के अनुदान व उर्वरित रक्कम बँक कर्जाद्वारे देण्यात येईल. राज्यस्तरीय समितीवर केंद्र व राज्य शासनाचे प्रतिनिधी असतील. जिल्हास्तरिय समिती व पंचायत राज्य समितीमार्फत कार्यक्रमाची अंमलबजावणी तसेच स्थानिक स्तरावर लोकांचा सहभाग घेण्यात येईल. राज्य शासन स्वत:चा ठोस कार्यक्रम 6 जिल्हयात आखून तो राबविण्यात येईल तसेच माननीय पंतप्रधांनाचा कार्यक्रम सुध्दा राज्यशासन पूर्ण करेल. त्यामुळे माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, शेतक-यांचा प्रश्न हा अतिशय गंभीर आहे. या गंभीर प्रश्नाला सर्वांनी मिळून

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम .....

तोंड देण्याची आवश्यकता आहे. या प्रश्नामध्ये राजकारण न आणता आपण सर्वांनी मिळून काम करण्याची आवश्यकता आहे. मी माननीय बी.टी. देशमुख साहेबांना सांगू इच्छितो की, सिंचनाच्या बाबतीत 5 कोटीच्या वरील अधिकार वित्त विभागाने घेतलेले होते ते अधिकार जलसंपदा विभाग वापस घेण्याचा निर्णय घेईल. तसेच उत्तर महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा या ठिकाणी सिंचनाचा जो अनुशेष आहे तो दूर करण्यासाठी शासनाने धोरणात्मक विचार केलेला आहे. या विषयावर कॅबिनेट मिटींगमध्ये चर्चा सुध्दा झालेली आहे. या विषयावर 100 टक्के निर्णय होऊन या ठिकाणच्या सिंचनाचा अनुशेष 100 टक्के दूर करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

यानंतर श्री. अजित...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांसाठी जाहीर झालेल्या पॅकेजवर चर्चा झाली. परंतु मला असे म्हणावयाचे आहे की, याबाबतचे निकष बदलण्यात यावेत आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमून एक महिन्याच्या आत आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपये मदत द्यावी. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपयांची मदत देताना त्या रकमेतील 70 हजार रुपये पोस्टाच्या स्कीमध्ये जमा केले जातात तर उर्वरित 30 हजार रुपये रोखीने दिले जातात. परंतु या 30 हजार रुपयांमध्ये सुध्दा कर्जाची रक्कम कापून घेण्यात आलेली आहे. मी जबाबदारीने हा आरोप करीत आहे. तेव्हा ज्यांनी ही कपात केली त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या रोख मदतीमध्ये कोणतीही कपात होणार नाही, असा निर्णय घेण्यात येणार आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, शासनाने शेतकऱ्यांना देणाऱ्या येणाऱ्या मदतीमध्ये कपात करण्याचे आदेश दिलेले नाहीत. ज्यांनी कोणी अशी कपात केली असेल त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, प्रत्यक्षात 1 लाख रुपयांची मदत देणार असे जाहीर केले, परंतु काही शेतकऱ्यांना 25 हजार, 50 हजार अशी अंशत: मदत दिली गेली आहे. ज्यांना अंशत: मदत दिली गेली त्यांना शासन 1 लाख रुपये मदत देणार आहे काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आत्महत्या झालेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपये मदत देण्याचा निर्णय झालेला आहे. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या वारसाच्या नावे पोस्टाच्या मासिक योजनेमध्ये 70 हजार रुपये जमा केले आहेत. त्यामधून त्याच्या कुटुंबियाला दर महिन्याला व्याज मिळते. त्याचे कुटुंब चालावे हा त्या मागील हेतू आहे.

श्री.नितीन गडकरी :सभापती महोदय, तत्कालीन महसूल मंत्री श्री.शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांनी या सभागृहात उत्तर दिले होते की, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाला 1 लाख रुपये मदत देण्यात येईल. परंतु आता काही कुटुंबांना 50 हजार रुपये तर काही कुटुंबांना 25 हजार रुपये अशी अंशत: मदत दिली गेली आहे. वास्तविक 1 लाख रुपये मदत देण्याची घोषणा झाली होती. तेव्हा ज्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना कमी रक्कम मिळाली त्यांना 1 लाख रुपयांची मदत शासन करणार आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना 1 लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय झालेला आहे. जर एखाद्या शेतकऱ्याच्या कुटुंबाला 50 हजार वा कमी रक्कम मिळाली असेल तर उर्वरित रक्कम देण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी एक रिलेव्हंट प्रश्न विचारला होता. कृष्णा खोरे व तापी खोरे या योजनेच्या बाबतीत प्रशासकीय मान्यतेचे अधिकार रिजनल लेव्हलला दिले होते. तो आता इतिहास झालेला आहे. माननीय राज्यपालांनी आदेश दिल्यानंतर सुध्दा विदर्भाला अनुशेषाचा निधी देण्याबाबतचे आदेश शासनाने काढले नाहीत. परवाच देशाच्या पंतप्रधानांनी विदर्भातील सहा जिल्ह्यांना भेट देऊन विशेष लक्ष पुरविल्यानंतरसुध्दा सरकारने नेमका उलट जी.आर.काढला आहे. पाच कोटी रुपयांवरील प्रकल्प वित्त विभागाकडे पाठविण्याचा निर्णय घेतला तो चुकीचा आहे. प्रशासकीय मान्यतेचे अधिकार रिजनल लेव्हलवर द्यावेत अशी माझी विनंती आहे. मी मघाशी 14 लघु पाटबंधारे प्रकल्पांची नावे वाचून दाखविली. या संदर्भात वित्त विभागाला घटनेच्या विरोधात निर्णय घेता येणार नाही. पाटबंधारे विभागाने प्रकल्प सुरु केल्यानंतर वित्त विभागाचे अधिकारी संबंधित फाईलवर "त्या भागात अनुशेष आहे काय?" अशाप्रकारचे शेरे नमूद करतात. तेव्हा याबाबतीत मंत्रिमहोदय गंभीरतेने विचार करुन या संदर्भात सभागृहात उद्या किंवा परवा निवेदन करतील काय ?

डॉ.पतंगतराव कदम : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जो प्रश्न विचारला आहे, त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, माननीय वित्त मंत्री आणि माननीय जलसंधारण मंत्री यांना या संदर्भात अवगत करण्यात येईल.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

सभापती : प्रा.बी.टी.देशमुख यांनी विचालेला प्रश्न माझ्या लक्षात आलेला आहे. माननीय मंत्रिमहोदय आपण जे बोललात त्याऐवजी आपण असे म्हणा की, माननीय वित्तमंत्री आणि माननीय जलसंधारण मंत्री यांचेबरोबर चर्चा करुन काय करता येईल ते पहातो.

यानंतर श्री.पुरी.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासंबंधीचा निर्णय याच आठवडयात घेतला जाईल.

श्री.सुधाकर गणगणे : सभापती महोदय, मी माझ्या भाषणामध्ये मागणी केल्याप्रमाणे ज्याप्रमाणे साखरेवर इम्पोर्ट डयूटी आहे त्याचप्रमाणे आमच्या विदर्भामध्ये जे कापसाचे मोठे पीक येते त्यासाठी सध्या 10 टक्के इमपोर्ट डयुटी असून ती आपण 60 टक्के वाढविण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाकडे शिफारस करणार काय ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, यासाठी केंद्र शासनाकडे प्रयत्न करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी हा विषय गांभीर्याने घ्यावा व सभागृहाच्या भावनांचा विचार करावा. माननीय मंत्रिमहोदय या ठिकाणी जे उत्तर देतात, ते पटलावर येते. आपण याठिकाणी जे उत्तर देणार आहात ते महाराष्ट्रातील गोरगरीब जनतेसाठी फार आधारभूत ठरणार आहे. माननीय फुंडकर साहेबांनी अतिशय पोटतिडकीने विषय मांडला. आपल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या कागदांच्या आधारे आपण ठामपणे उत्तर दिले, ते रेकॉर्डवर आहे. त्यावेळी मी उभे राहून म्हणालो की, मंत्र्यांनी जी माहिती दिली ती बरोबर नाही म्हणून मंत्र्यांवर हक्कभंग आणेन. त्यावेळी संबंधित अधिकाऱ्याने पेपर पाठविला आणि मग आपण उत्तरामध्ये दुरुस्ती केली. त्यावेळी आपण व आपल्या अधिकाऱ्यांनी सभागृहाची दिशाभूल केलेली आहे. अधिकाऱ्यांच्याच तालावर शासन व सभागृह चालते असा मॅसेज अधिकाऱ्यांमध्ये जाता कामा नये. म्हणून अशी चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई होणे आवश्यक आहे. तसेच, आपण विनातारण 25 हजार रुपये कर्ज देणसंबंधीच्या प्रकरणांची आकडेवारी देऊ शकला नाहीत. यामध्ये आपली व आपल्या अधिकाऱ्यांची असफलता दिसून येते. विदर्भातील प्रकल्पाच्या संदर्भात रिजनल लेवलवर प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जे आपण काढून घेतले आहेत, हे योग्य नाही, त्यावरही पुनर्विचार होणे आवश्यक आहे. त्यामुळे आपण हा विषय गांभीर्याने घ्यावा. तसेच, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्याच्या दृष्टीने शासनाने ज्या योजना राबविल्या त्याचा फायदा किती शेतकऱ्यांना मिळाला, याबाबतची आकडेवारी आपण देऊ शकला नाहीत. कापसाच्या किंमतीबाबतही मागणी प्रमाणे आपण भाव देऊ शकला नाहीत. शेतकऱ्यांच्या आत्महत्ये संदर्भात पाचही संघटनांनी ज्या शिफारशी केलेल्या आहेत, त्या मी याठिकाणी वाचून दाखविल्या.

..2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

त्याबाबतही आपण काही करु शकत नाहीत. कापसाच्या बाबतीत 3 हजार रुपये भाव मिळणे आवश्यक आहे. तसेच, केंद्र सरकारने कापसावरील इम्पोर्ट डयुटी 60 टक्क्यांपर्यंत वाढविणे आवश्यक आहे. तेव्हा कापसाच्या बाबतीत आपण ठोस असे उत्तर देणार का ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, माननीय रावते साहेबांनी मांडलेले मुद्दे अतिशय महत्वाचे आहेत. माननीय पंतप्रधानांच्या समवेत जी बैठक झाली त्यावेळी मीही उपस्थित होतो. एमएसपीसंदर्भात मागे 20 रुपये वाढवून दिले होते. याबाबतीत आम्ही पुन्हा मागणी करु की, केंद्र सरकारने अधिक एमएसपी वाढवून द्यावी. एमएसपी म्हणून आम्ही 500 रुपये वाढवून मागितले होते. गेल्या वर्षी 1980 रुपये मान्य केले आहेत. 1980 रुपये हे एका व्हरायटीच्या कापसाच्या बाबतीत आहेत. सध्या कापसावर 10 टक्के इम्पोर्ट डयुटी आकारली जाते. आमच्याकडे आलेल्या माहितीच्या आधारे यावर्षी बंपर क्रॉप झाल्यामुळे अमेरिका व चीनमधील बेल्स मोठया प्रमाणात आपल्याकडे येण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणून इम्पोर्ट डयुटी 60 टक्के लावली तर ॲटोमॅटीकली आपल्याकडील कापसाचे भाव वाढतील. त्यामुळे याबाबतीतही महाराष्ट्र शासनाने केंद्र शासनाकडे मागणी केलेली असून याबाबतीत विचार करु असे माननीय पंतप्रधानांनी सांगितले आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, याबाबतीत मी स्वत: माननीय पंतप्रधानांशी बोललो असून त्यांनी हे शक्य नाही, असे मला सांगितले.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, लाल्या रोगामुळे आज अनेक शेतकरी अडचणीमध्ये आले आहेत, त्यामुळे त्यांना किती दिवसांमध्ये मदत मिळेल ? तसेच, 268 आत्महत्येपैकी 152 आत्महत्यांच्या केसेस अपात्र ठरविण्यात आल्या असून याबाबतीत पुनर्विचार किती दिवसांत पूर्ण होणार ?

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, एक महिन्यांत पूर्ण होईल.

नंतर श्री.रोझेकर....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, ज्या ज्या कुटुंबामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या आहेत त्या कुटुंबातील मुला/मुलींच्या शिक्षणासंदर्भात, विधवांच्या रोजीरोटीच्या संदर्भात एखादा प्रकल्प आराखडा शासनाने तयार करावा, अशा प्रकारचा मुद्दा मी माझ्या भाषणात उपस्थित केला होता. अशा प्रकारचा प्रकल्प शासन राबविणार आहे काय ?

श्री.हर्षवर्धन पाटील : सभापती महोदय, ज्या कुटुंबामधील शेतक-यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्या कुटुंबातील मुली किंवा विधवा स्त्रिया यांचे शिक्षण जर दहावी किंवा बारावी पर्यन्त झाले असेल तर त्यांना अंगणवाडी सेविका म्हणून थेट निवडीव्दारा सामावून घेण्याच्या संदर्भातील आदेश काढण्यात येत आहेत. ही निवड करीत असतांना कुठल्याही प्रकारची परीक्षा किंवा मुलाखत होणार नाही. केवळ दहावी किंवा बारावी शिक्षण असेल तर त्यांना थेट सामावून घेण्यात येईल. ज्यांचे शिक्षण झाले नाही अशा विधवा स्त्रियांसाठी सध्या महिला व बालविकास विभागामार्फत 500 रुपयांचे अनुदान देण्याबाबतची योजना आहे. परंतु, आता आत्महत्या झालेल्या कुटुंबातील स्त्रियांना 500 रुपयांऐवजी 5000 रुपयांपर्यन्त अनुदान देण्याबाबतची योजना महिला व बालविकास विभागाच्या माध्यमातून तयार करण्यात येत आहे, यासंदर्भातील आदेशही लवकरच काढण्यात येतील.

सभापती : सभागृहाने प्रस्तावावर विचार केला आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या, मंगळवार, दिनांक 4 जुलै, 2006 रोजी दुपारी 01.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 8 वाजून 31 मिनिटांनी, मंगळवार, दिनांक 4 जुलै, 2006 च्या दुपारी 01.00 वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही